मूल्य ३० रु./पृष्ठ १०० | जानेवारी २०१९ | वर्ष १३ वे/अंक १

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ देश का चौकीदार चोर है? | संपादकीय | ६ |
| ■ शरद पवार यांची अहमदनगर येथील पत्रकार परिषद | | |
| १) सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचा गैरवापर | शरद पवार | १० |
| ■ खंत आहे ती काळ सोकावल्याची... (उर्जित पटेल व अरुण जेटली यांच्यातील वादाविषयी विशेष लेख) | अभय टिळक | १६ |
| ■ हिंदी भाषक राज्यातील भाजपचा तिहेरी पराभव | तथागत | २६ |
| ■ प्रशांत व अपूर्व हिरे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश, समारंभ, भाषणे... | | |
| १) दत्तकाच्या जोरावर आम्ही आमचे घर चालवत नाही | शरद पवार | ३६ |
| २) नाशिक जिल्ह्यातून पवार साहेबांना मोठी ताकद देऊ | छगन भुजबळ | ४० |
| ३) जनमत असणाऱ्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी वाऱ्यावर सोडत नाही | जयंत पाटील | ४१ |
| ४) विकासापेक्षा भाजपमध्ये फक्त पैसे वाटण्याचेच काम | अपूर्व हिरे | ४३ |
| ■ 'चला देऊया मदतीचा हात' : शरद पवार वाढदिवस कार्यक्रम, भाषणे... | | |
| १) भाजपवरची नाराजी जनतेने निवडणुकीतून दाखवून दिली | अजित पवार | ४४ |
| २) जजबा है जिंदगी में परिवर्तन का | छगन भुजबळ | ५० |
| ३) महाराष्ट्रातील प्रत्येक बूथवर कार्यकर्ते उभे करण्याचे स्वप्न | जयंत पाटील | ५६ |
| ४) तीन तलाक - कावळ्याला कोंबडा म्हणून विकण्याचा प्रयत्न | फौजिया खान | ६० |
| ■ आगामी निवडणुकीची मोर्चेबांधणी, डावपेच व व्यूहरचना (दिल्ली वार्तापत्र) | आकाश | ६२ |
| ■ महिला धोरण २५ वर्षपूर्ती कार्यक्रम, भाषणे... | | |
| १) संसद व विधिमंडळात महिलांना आरक्षण द्यायला हवे | शरद पवार | ६८ |
| २) 'छेडछाडमुक्त महाराष्ट्र' हे महिलांचे मोठे योगदान ठरेल | सुप्रिया सुळे | ७४ |
| ३) शिक्षणाच्या हक्काची वयोमर्यादा १८ पर्यंत वाढवावी | वंदना चव्हाण | ७६ |
| ४) महिला धोरणामुळे स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध झाले | निर्मला सामंत | ७७ |
| ५) मानवतेच्या दिशेचा प्रवास महत्त्वाचा | श्रुती गणपते | ७८ |
| ■ पाटण तालुक्यातील पॅगोडा लोकार्पण समारंभ, भाषण | | |
| १) राज्य घटनेची मोडतोड करून मनुवाद आणण्याचा सरकारचा डाव | शरद पवार | ८० |
| ■ शरद पवार वाढदिवस समारंभ, पत्रकार परिषद | | |
| १) निवडणूका होतील त्यावेळी देशातील चित्र बदललेले असेल | शरद पवार | ८३ |
| ■ चव्हाटा (हलके-फुलके राजकीय किस्से) | घंटाकर्ण | ८५ |
| ■ संस्थात्मक ऱ्हासाची वाटचाल... व्यवस्थेवर संकट! | गहिनी नाथ | ९६ |








**संचालक**
हेमन्त टकले

**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील

**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**सजावट व मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
वार्षिक रु. ५००/-

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा
मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई-४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.
**संपादक-**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# मोदींचा कारभार विध्वंसक स्वरुपाचा

मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन मोठ्या राज्यात भाजपची सत्ता लोकांनी उलथून टाकली यावरुन जनतेच्या मनात या जातीयवादी व धर्मांध पक्षाबद्दल किती प्रचंड नाराजी आहे हे जाहीरपणे प्रकट झाले आहे. सदासर्वकाळ लोकांना आपण मूर्ख बनवू शकत नाही, फसवू शकत नाही आणि जनता खूप अडाणी व अनभिज्ञ आहे, असेही म्हणू शकत नाही हे यातून सिद्ध झाले आहे. मोदी सरकारचा पाच वर्षांचा कारभार आता जवळपास पुरा होत आला आहे. लोकसभेच्या निवडणुका अगदी तीन-चार महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीला अजून ९-१० महिन्यांचा कालावधी आहे. परंतु फडणवीस सरकारचे काही सांगता येत नाही. लोकसभेच्या बरोबरच विधानसभा निवडणुका घेण्यासंबंधीची शिफारस ते करण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोदींच्या पाठोपाठ फडणवीसही राजीनामा देऊन निवडणुकांना सामोरे जाण्याची शक्यता आहे. तेव्हा आपणही दोन्ही निवडणुकांना एकाचवेळी सामोरे जाण्याची तयारी केली पाहिजे. तशी मानसिकता कार्यकर्त्यांनी ठेवून कामाला लागले पाहिजे. काँग्रेस, शेकाप, रिपब्लिकन (कवाडेगट), स्वाभिमानी संघटना या व इतर सम विचारी पक्षांशी आघाडी करुन जागा वाटपाचा आपला प्रयत्न चालू आहे. भाजप-शिवसेनेची युती होवो ना होवो. या दोघांचाही पराभव करणे हेच आपले मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. यावेळी कोणत्याही परिस्थितीत गाफील राहायचे नाही. खोट्या जाहिराती, भूलथापा, आश्वासने यांना बळी पडायचे नाही. सोशल मिडीयाच्या सर्व साधनांचा व पैशाचा प्रचंड वापर करुन विरोधकांच्या बदनामीसाठी छोटी मोठी व खोटी खोटी माहिती प्रसूत करण्याचा भाजप निश्चित प्रयत्न करेल. त्यांचा हा खोटा व बदनामीचा प्रचार आपण हाणून पाडला पाहिजे. त्याबाबत जनतेमध्ये जागृती करुन खोट्या अफवा व प्रचाराला बळी पडू नका हे जनतेला पटवून दिले पाहिजे.

मागील वर्षात सत्तेवर येण्यापूर्वी मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जी प्रचंड आश्वासने दिली होती त्यातले एकही आश्वासन अजून पूर्ण केलेले नाही. शेतकरी व ग्रामीण भाग पूर्णपणे वाऱ्यावर सोडून दिला आहे. शेतकऱ्याचा सातबारा पूर्ण कोरा करु. त्याला शंभर टक्के कर्जमाफी देऊ. परदेशातला सगळा काळा पैसा देशात परत आणून प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये भरु. दरवर्षी दोन कोटी रोजगार नव्याने निर्माण करुन बेरोजगार कमी करु. शेतकऱ्याचे उत्पन्न दुपटीने वाढवू. स्वामिनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करुन शेतीमाल उत्पादनाचा मूळ खर्च व त्यावर ५० टक्के नफा गृहीत धरुन जी किंमत येईल ती आधारभूत किंमत म्हणून शेतकऱ्याला देऊ. हर हात को काम और हर खेत को पाणी ही तर भाजपची खूप जुनी घोषणा आहे. अशी एक ना अनेक आश्वासने जाहीरनाम्यात दिली होती. यातल्या एकाही आश्वासनाची पाच वर्षात सरकारने पूर्तता केली नाही. श्रीराम मंदिराची अयोध्येत उभारणी करण्यासंबंधी हिंदुत्ववाद्यांना व राम भाविकांना दिलेले आश्वासनही पूर्ण केले नाही. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्वहिंदु परिषद, बजरंग दल आणि अन्य हिंदुत्ववादी संघटनाही जाहीरपणाने मंदिराच्या उभारणीबाबत आग्रही बनून सरकारवर टीकेची झोड उठवित आहेत हे आपण सारेजण रोज पाहतो आहोत, वाचतो आहोत. एकंदरीत पाच वर्षे मोदी सरकारने जो कारभार केला तो विकासाचा नसून विध्वंसक स्वरुपाचा होता. प्रत्येक चांगली गोष्ट मोडून तोडून तिचे वाटोळे करण्याचा केलेला प्रयत्न हीच मोदी सरकारची कामगिरी आहे. आता या मोडतोड केलेल्या संस्था पुन्हा मजबुतीने कशा उभ्या करायच्या असा मोठा प्रश्न व नवे आव्हान देशापुढे उभे आहे.



**सुरुवातीचे**



# नितीन गडकरींच्या विधानांचे अन्वयार्थ

भारत सरकारच्या गुप्तचर विभागाने दिल्लीत एका परिसंवादाचे आयोजन केले होते. या परिसंवादात बोलण्यासाठी केंद्रीय वाहतुक व जलसंपदा मंत्री श्री. नितीन गडकरी यांना निमंत्रित करण्यात आले होते. श्री. गडकरी हे स्पष्ट व खुलेपणाने बोलण्यासाठी माहिर आहेत. हातचे काहीही राखून न ठेवता मोकळेपणाने बोलण्यामुळे त्यांची चांगले वक्ते म्हणून मोठी ख्याती आहे. मुख्य म्हणजे ते निर्भिडपणे व कोणाच्याही दबावाला बळी पडत नसल्यामुळे त्यांचे बोलणे श्रोत्यांना आवडते, हवेहवेसे वाटते. दिल्लीच्या कार्यक्रमात ते असेच मनमोकळे बोलले. पण त्यांच्या भाषणाने भाजपात बरीच खळबळ माजली. ''आमदार आणि खासदारांच्या सुमार कामगिरीची जबाबदारी ही पक्षाध्यक्षांचीच असते'' असे म्हणत त्यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अमित शहा आणि महाराष्ट्राचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे यांच्यावर नाव न घेता जो बॉम्बगोळा टाकला त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच चर्चा रंगली. पक्षाच्या अध्यक्षांनी जे काही धंदे चालविलेले आहेत त्यातून पक्षाची बांधणी तर सोडाच पण आहे ती घडी देखील विस्कटण्याचा धोका आहे याची जाणीव भाजपाचे राष्ट्रीय पक्षाध्यक्ष म्हणून काम केलेले असल्यामुळे श्री. गडकरी यांना आहे. त्यामुळेच त्यांच्या विधानांना खूप अर्थ प्राप्त होतो.

एवढे बोलून गडकरी थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले, ''मी पक्षाध्यक्ष असेन आणि माझ्या पक्षाचे आमदार, खासदार चांगली कामे करत नसतील तर त्याची जबाबदारी कुणाची असेल? ती माझीच असेल.'' पुढे गडकरी जे म्हणाले ते 'लेकी बोले सुने लागे' अशा प्रकारचे आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांचे थेट नाव न घेता पण त्यांना उद्देशून गडकरी म्हणाले,

''माणसानं विनम्र असायला हवं. नाती जपायला हवीत. तुम्ही उत्तम वक्ते असलात म्हणून निवडणुकीत विजय मिळत नाही. तुम्ही विद्वान असलात म्हणून लोक तुम्हाला मत देतीलच असे नाही. थोडा विचार केला तर आपल्याला ही चूक लक्षात येते. आत्मविश्वास आणि अहंकार यात हाच फरक असतो. आत्मविश्वास हवा पण अहंकाराला दूर ठेवा.''



या भाषणाच्या अगोदरही काही दिवसांपूर्वी म्हणजे राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड मधील विधानसभा निवडणुकीत भाजपाचा दारुण पराभव झाल्यानंतर श्री. गडकरी यांनी ''निवडणुकीतील विजय आणि पराभवाची जबाबदारी ही पक्षाच्या नेतृत्त्वाने स्वीकारली पाहिजे.'' असे सूचक विधान केले होते. अर्थात नंतर त्यांनी सारवासारव करुन याचं खापर माध्यमांवर फोडले. आपलं वक्तव्य मोडतोड करुन मिडीयाने लोकांसमोर मांडले असा खुलासा करुन 'अन्यथा जाहीरपणाने काही बोलणे अवघड होईल' असेही विधान केले. नेत्यांची विधाने मिडीया मोडतोड करुन सोयीस्करपणे दाखविते हे खरे असले तरी श्री. गडकरी यांच्या विधानांमधून जो काही अर्थ निघतो तो मोदी आणि शहा यांना गोंजारणारा व त्यांची भलावण करणारा निश्चितच नाही. तशी अपेक्षाही श्री. गडकरी यांच्याकडून नाही. त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते सत्य बोलले. सत्य हे नेहमी कटू असते पण ते साधे असत नाही. गडकरी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असताना त्यांना ज्या अपमानकारक रितीने अध्यक्ष पदावरुन काढण्यात आले त्याचा आता ते वचपा घेत आहेत असे म्हणणे म्हणजे मोदी आणि शहा यांच्या हुकूमशाही वागण्याकडे व अंदाधुंद कारभाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यासारखे आहे. मोदी-शहांच्या चुकांवर हातोडा मारुन श्री. गडकरी यांनी त्यांना वेळीच सावध करण्याचा प्रयत्न केला आहे असा सकारात्मक अन्वयार्थ कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी लावला पाहिजे. तसा तो न लावता निव्वळ टीकेचा सूर म्हणून त्याकडे पाहिले तर भाजपची बुडायला लागलेली नौका लवकरच गाळात अधिक घट्ट रुतेल हे सुज्ञांना वेगळे सांगण्याची गरज नाही.

**प्रबंध संपादकीय**



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

# देश का चौकीदार चोर है?

## संपादकीय



पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा या जोडगोळीच्या हुकुमशाही राजवटीला आणि फसव्या दहशतवादी राजकारणाला जनता विटून गेल्यामुळे भाजपला उतरती कळा लागली आहे. एनडीअेमधून एकेक घटक पक्ष व नेता हळूहळू बाहेर पडू लागला आहे. मा. मोदी स्वतःच्या पक्षातल्या नेत्यांशी व मंत्र्यांशी जिथे नीट वागत नाहीत, त्यांना काडीचीही किंमत देत नाहीत, क्षणोक्षणी वाट्टेल तसे बोलून अपमान करतात, तिथे इतर घटक पक्षांच्या नेत्यांना ते हिंग लावून का विचारतील? माझ्यामुळे पक्ष सत्तेवर आला आहे, मी म्हणजे पक्ष आहे असा बेडकीसारखा फुगलेला ५६ इंच छातीचा 'मी' मोदींमध्ये जो सतत वास करतो आहे त्याला अहंकाराचा दुर्गंध सुटल्यामुळे माणसे दूर पळू लागली आहेत. राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये भाजपचा जो दारुण पराभव झाला त्यामागे स्थानिक भाजप नेत्यांचे कर्तृत्व व कामगिरी किती आणि मोदींच्यावरची नाराजी किती हे बारकाईने तपासले तर मोदी नाराजीचे तागडे लवकर जास्त खाली जाते. गर्वाचे घर क्षणार्धात खाली होते हे आता तरी मोदींना कळले पाहिजे. अहंकाराने सत्यानाश केल्याची आणि भलीभली साम्राज्ये पार उलथून टाकल्याची इतिहासात कितीतरी उदाहरणे आहेत. त्या तुलनेत मोदी खूप 'चिल्लर' आहेत. देशासाठी मोदींनी काही फार मोठा त्याग केलेला नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले म्हणजे देशाची फार मोठी सेवा केली अशा भ्रमात कुणी राहू नये. असे लाखो स्वयंसेवक वेगवेगळ्या संघटनांमध्ये आजही कार्यरत आहेत आणि ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या कल्याणासाठी पणाला लावले, ओवाळून टाकले त्यांच्या तुलनेत मोदींचे या देशासाठी योगदान काय हे तपासू लागलो तर मूठभर घुगऱ्या रातभर मचमच अशीच स्थिती आहे. विध्वंसक स्वरुपाचे व जातीजातीत आणि धर्माधर्मात फूट पाडून विद्वेषाचे, हिंसेचे, मानवी अमानुष अत्याचार करण्याचे पाप मोदींच्या हातून किती वेळा घडले याचा खरा हिशेब अजून बाहेर यायचा आहे. गोध्रासारखी प्रकरणे ही ताटातल्या चटणी-लिंबूसारखी आहेत. यापेक्षा आणखीन भयानक किती तरी प्रकार मोदी-शहा जोडगोळीने या देशात केले आहेत. आज त्यांच्या भिती व दहशतीमुळे कुणी खुलेपणाने बोलत नाही.

भाजपमध्ये श्री. नितीन गडकरी यांच्यासारखा निधड्या छातीचा एकमेव मंत्री आहे जो या जोडगोळीला जाहीरपणे प्रश्न विचारुन त्यांच्या चुकांची लक्तरे वेशीवर टांगतो आहे. पण ''गडकरींचा बोलविता धनी कुणीतरी वेगळाच आहे,'' असे म्हणून त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मोदी-शहा जोडगोळीचा जो एककल्ली व मनमानी कारभार चालू आहे आणि त्याला हुकुमशाहीची जी झालर लाभलेली आहे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत आणि भैय्याजी जोशी यांना दिसत नाही का? त्यांना तसे मनापासून वाटत असेल व त्यांचे खऱ्याखुऱ्या लोकशाहीवर प्रेम असेल तर त्यांनी गडकरींच्या मुखातून बोलण्याची आवश्यकताच नाही. दिल्लीच्या विज्ञान भवनामध्ये जे तीन तीन दिवस संघाच्या तत्त्वज्ञानाची व्याख्याने झोडतात त्यांना मोदी-शहांनी जो देशात अनागोंदी कारभार चालविला आहे त्याबद्दल बोलायला पाच मिनिटेही वेळ नाही! का त्यांनी डोळ्यावर पट्टी बांधून जाणीवपूर्वक आंधळेपणाची भूमिका स्वीकारली आहे काय? लोक व जनावरे दुष्काळात अन्नपाण्यावाचून मरत असताना, तडफडत असताना यांना मंदीर बांधायचे पडलंय. मंदीरासाठी अध्यादेश काळा, वटहुकूम काढा, कायदा करा असा धोशा लावताना भागवत-जोशींचा घसा कोरडा कसा पडत नाही? त्यासाठी ते सतत तगादा लावतात. पण मोदी-शहांच्या कारभाराने या देशाचे वाटोळे झाले, तो विकासात कितीतरी मागे गेला, धार्मिकतेच्या मुद्यावरुन जगात भारताची बेअब्रु झाली. तेव्हा या हुकुमशहांना रोखा आणि देश वाचवा असे सांगण्याचे धाडस स्वतः भागवत व जोशी का दाखवित नाहीत? गडकरींना पुढे करुन त्यांचा बळीचा बकरा करण्यापेक्षा संघवाल्यांनी देशहिताची भूमिका स्वीकारुन सत्याची कास धरायला काय हरकत आहे? मोदींनी जसे सोयीसोयीने खोटं बोलण्याचे धोरण स्वीकारले आहे त्याचीच री भागवत ओढणार आहेत काय?

''पहारेकरी चोर आहे,'' असे पहिल्यांदा कॉंग्रेस अध्यक्ष राहुल गांधी म्हणाले तेव्हा लोकांना ती राजकीय भाषा वाटली. पण आज भाजपबरोबर सत्तेत मांडीला मांडी लावून बसलेली आणि सत्तेचे सर्व फायदे उपटून सौ चुहे खाँके भी बिल्ली शाकाहारी आहे असे म्हणणारी शिवसेना व तिचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरेही पंढरपूरच्या सभेत ''पहारेकरी

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

चोर आहे'' असे जाहीरपणे पंतप्रधान मोदींबद्दल म्हणाले. एवढेच बोलून ते थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले, ''सरकार पुन्हा आणीबाणी आणते आहे. जनतेच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप करते आहे. पीकविम्याचे कंत्राट खासगी कंपन्यांना दिले. राफेलमध्ये घोटाळा झाला. किती पापे करणार? शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणाऱ्या योजना गेल्या कुठे? मोदींनी जगभर फिरण्यापेक्षा दुष्काळ पाहावा. किती शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले, कर्ज माफ झालेला शेतकरी मला दाखवा. अन् मग क्लीन चीट घेऊन मिरवा. तुमच्या क्लीन चीटशी माझे घेणे देणे नाही. (या क्लीन चीट सत्ताधाऱ्यांना कशा मिळतात ते आम्हांला चांगले माहिती आहे.) आधी शेतकऱ्याचा सातबारा कोरा करा. ज्यांनी माझ्या जनतेचे वाकडे केले त्याला अद्दल घडव हेच विठ्ठलाच्या चरणी माझे साकडे आहे. आज पंढरपुरात आलो आहे. उद्या वाराणशीतही जाईन. कुंभकर्णाला जागे करण्यासाठी संपूर्ण देश फिरेन. त्यासाठीच अयोध्येला गेलो होतो.''

या सभेत उद्धव ठाकरे आणखीन खूप काही बोलले. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारभाराचे जाहीरपणे वाभाडे काढून त्यांनी भाजपला विवस्त्र केले. असत्याचा, ढोंगीपणाचा, दांभिकतेचा, खोटं बोलणाऱ्यांचा, लोकांना फसविणाऱ्या भाजप नेत्यांचा बुरखा उद्धवजींनी टराटरा फाडताना आपला पक्ष मात्र सत्तेतून बाहेर का पडत नाही? सत्तेची ऊब एवढी गोड लागती आहे काय? आपली भूमिका दुतोंडी नाही का? सोयीसोयीने बोलण्याचा खोटारडेपणा आपण किती दिवस करणार आहोत? जनतेला आपण मूर्ख बनवित नाही का? हे जनतेच्या मनातले प्रश्न आहेत. त्यांची उत्तरे उद्धवराव आपण कधी देणार आहात? भाजपला चंद्रभागेच्या पाण्याचे स्नान घालताना आपणही त्याच पाण्यात डुंबतो आहोत याचे भान शिवसेनेने ठेवण्याची गरज आहे. 'उंदराला मांजर साक्ष' असे आजचे तुमचे वर्तन आहे. शिवसेनेला थोडा जरी स्वाभिमान असता आणि सन्माननीय सरसेनापती बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना आज जिवंत असती तर सत्तेला आणि भाजप सत्ताधाऱ्यांना त्यांनी केव्हाच लाथ घातली असती. पण सत्तेसाठी लाचार होऊन सेना आज भाजपभोवती जो गोंडा घोळते आहे आणि मंत्रीमंडळाच्या बैठकीत शिवसेनेचे मंत्री जेवढी म्हणून शेपटी आत घेता येईल तेवढी घेऊन मुकाट्याने मुख्यमंत्री हाकतील त्या दिशेने जात आहेत हे जनता रोज उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. मा. बाळासाहेबांच्या आत्म्याला काय वाटत असेल याचा उद्धवजींनी सोडा पण शिवसेनेच्या सच्च्या कार्यकर्त्यांनी तरी विचार केला पाहिजे. आपला स्वाभिमान गहाण ठेवून, स्वत्व विकून एकवेळ सत्तेचे क्षणिक मोहाचे फायदे मिळतील पण पक्ष आणि संघटना कायमची संपेल याचे भान निदान कडव्या शिवसैनिकांनी तरी बाळगले पाहिजे. शेवटी पक्ष नेत्यांवर नाही, कार्यकर्त्यांवर चालतो. कार्यकर्ता जिवंत असेल त्याचे स्वत्व जागृत असेल, त्याच्या मनगटात ताकद असेल, जोश व उर्मी असेल आणि जनतेच्या कल्याणाची तळमळ व धडधड असेल तरच तो पक्ष, संघटना टिकते, मजबुतीने उभी राहते. अन्यथा कुत्र्याच्या छत्र्यासारख्या अनेक संघटना, पक्ष येतात आणि जातात. त्याची तमा जनता कधी बाळगत नाही. याचेही भान शिवसेनेने ठेवणे गरजेचे आहे. भाजपला शिव्या दिल्या म्हणजे पापातली आपली भागीदारी संपली असे जर शिवसेनेचे नेते मानत असतील तर ती त्यांची मोठी चूक ठरेल. मग एक दिवस हा भ्रमाचा भोपळा फुटेलच.

सत्तेवर येण्याच्या अगोदर जोरजोराने बोंबलून 'न खाऊंगा न खाने दुँगा' अशी घोषणा करणाऱ्या नरेंद्र मोदी यांनी संरक्षण व परराष्ट्र मंत्र्यासह कोणालाही विश्वासात न घेता राफेलचा करार केला आणि पूर्वीच्या यूपीए सरकारने जे विमान ६०० कोटींना घ्यायचे ठरविले होते ते १६०० कोटींना घेतले. म्हणजे एका विमानामागे एक हजार कोटी रुपये जास्त दिले. ३६ विमाने खरेदी करुन जास्तीचे ३६ हजार कोटी रुपये का दिले? असा प्रश्न राहुल गांधी आणि सगळ्या विरोधकांनी विचारला तर मोदीच काय पण सरकारातला एक मंत्रीही उत्तर द्यायला तयार नाही. विरोधकांनी प्रश्न विचारुन काही गुन्हा केला आहे का? सरकारच्या तिजोरीतला पैसा हा जनतेच्या खिशातून काढलेला पैसा आहे. जनतेच्या कष्टाचा व घामाचा पैसा त्यांनी कररुपाने जमा केला आहे. ती रक्कम काही मोदी, शहा, जेटली यांनी त्यांच्या घरातून आणलेली नाही. तेव्हा जनतेला व जनतेचे प्रतिनिधी म्हणून विरोधी नेत्यांना जाब विचारण्याचा नक्की अधिकार आहे. बोफोर्स प्रकरणात ६७ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला म्हणून याच भाजपच्या लोकांनी किती प्रचंड खोटंनाटं रान उठवून राजीव गांधी यांना सळो का पळो करुन सोडले होते. शेवटी त्यात निघालं काहीच नाही. १५-२० वर्षे बोफोर्स भ्रष्टाचाराच्या तोफा फालतू गर्जत होत्या. संयुक्त संसदीय समितीपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्व चौकश्या झाल्या. बोफोर्समधून हाती काय लागलं? पण काँग्रेस सगळ्या चौकश्यांना सामोरी गेली. राजीव गांधींसह सर्व काँग्रेस नेत्यांनी चौकशीचा जाहीर मुकाबला केला. आज राफेलच्या चौकशीला मोदी का घाबरत आहेत? ते खासदारांची संयुक्त चौकशी समिती नेमायला का विरोध करीत आहेत? कशामुळे विमानाची किंमत वाढली हे सभागृहात येऊन ते खुलेपणाने का सांगत नाहीत? राहुल गांधी यांनी २ जानेवारीला 'राफेल'वरुन सरकारवर सभागृहात जी घणाघाती टीका केली व जोरदार बॉबिंग केले आणि आरोपाच्या फैरी झाडल्या त्याला तितकेच तडाखेबंद उत्तर मोदींनी का दिले नाही? नेहमी मोदींची जोरदार फुकटची वकिली

करणारे जेटली ''शस्त्रसज्ज विमानाची किंमत सांगता येणार नाही. राहुल यांना विमानातील फरक समजत नाही. आम्ही विमानाची प्राथमिक किंमत जाहीर केली आहे. आमच्या विमानाची मूळ किंमत ९ टक्क्यांनी कमी तर शस्त्रसज्ज विमानाची किंमत २० टक्क्यांनी कमी असेल.'' अशी खुळचट, पुळचट, नेभळट, धादांत खोटारडी व जनतेची दिशाभूल करणारी उत्तरे का देत आहेत? इतर वेळी क्षणाक्षणाला पोपटासारखे बोलणारे 'मित्रो' आता का मुके आणि बहिरे झाले आहेत. कशासाठी मौन धारण केले आहे? उठता बसता नेहरु गांधी घराण्याशी तुलना करुन आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व गेल्या ७० वर्षांत देशात जणू काहीच झाले नाही असा वांझोटा डांगोरा पिटणाऱ्या मोदींनी आता का तोंडात मिठाची गुळणी धरली आहे ? सभागृहात येऊन सत्य जनतेला खुलेआम पद्धतीने सांगायला ते का घाबरत आहेत? याचा अर्थ या राफेल व्यवहारात निश्चित काही काळबेरे आहे असा संशय जनतेला आला तर त्यात त्यांचे काय चुकले?


'मौनी' म्हणून कायम मोदींनी पंतप्रधान असताना डॉ. मनमोहन सिंह यांना हिणविले. त्यांचा उपहास केला. त्यांच्यावर टीकेचा भडीमार केला. पण डॉ. मनमोहनसिंग हे अत्यंत सुसंस्कृत, विद्वान व मितभाषी असल्यामुळे त्यांनी कधीही कुणाला जिव्हारी लागेल, कुणाचा अपमान होईल अशी भाषा वापरली नाही. प्रत्येक परदेश दौऱ्याच्या वेळी ते पत्रकारांना बरोबर घेऊन गेले. दौऱ्याहून आल्यानंतर पत्रकार परिषद घेऊन जे काही घडले ते जनतेला सांगितले. सभागृहातही त्याबाबत निवेदन केले. जनतेपासून काही लपविले नाही. मोदींनी पंतप्रधान झाल्यापासून एकदाही एकही पत्रकार परिषद घेतली नाही. पत्रकारांच्या प्रश्नांना ते सामोरेच गेले नाहीत. इतकेच नव्हे तर आपल्या परदेश दौऱ्यात त्यांनी कधीही पत्रकारांना नेले नाही. त्यांच्याशी खुला संवाद केला नाही. पत्रकारांच्या प्रश्नांना मोदी इतके का घाबरताहेत? सत्याचा वसा घेणाऱ्यांना कधीच कुणाची भिती नसते. आयुष्यभर महात्मा गांधींनी सत्यव्रताचे पालन केले आणि त्याच गुजरातच्या भूमीत जन्मलेल्या नरेंद्राने असत्याचे पालन केले हा गुजरातच्या भूमीला कलंक नाही का? ज्या सरदार पटेलांनी आयुष्यभर गांधी-नेहरुंचे नेतृत्व मानले आणि त्यांचा शब्द शेवटपर्यंत कृतीत उतरविण्यासाठी धडपड केली त्यांचा फक्त पुतळाच तुम्हाला दिसला? इतिहासाचे विकृतीकरण करुन खोटा इतिहास उभा करण्याचा भाजप व संघवाले पुन्हा पुन्हा का प्रयत्न करीत आहेत? त्यातून देश एकसंघ राहील की त्याची पुन्हा शकले शकले होतील याचा सुद्धा गांभीर्याने विचार करायला तुम्ही तयार नाही. इतके का सत्तांध आणि मदांध झाला आहात? नुकत्याच पाच राज्यात ज्या विधानसभा निवडणुका झाल्या त्यातून जे निकाल हाती आले आहेत त्यापासून तुम्ही काही बोध घेणार आहात की नाही? सत्तेचा माज चढल्यामुळे जनतेने तुम्हाला घरी घालविले आहे हे सत्य कसे नाकारुन चालेल? १५ वर्षे छत्तीसगड व मध्यप्रदेशात भाजपची सत्ता होती. ती का गेली? व्यापंम घोटाळा कुणी केला? मंदसोर आणि अन्य भागातल्या शेतकऱ्यांवर गोळ्या चालवून बारा शेतकऱ्यांचे जीव घेतलेल्या शिवराजसिंग चौहान यांच्या सरकारला जनतेने का मते द्यावीत? आपण उत्पादित केलेल्या शेतमालाला रास्त किंमत मिळावी अशी त्या शेतकऱ्यांनी मागणी केली आणि त्यासाठी रास्ता रोको सारखे आंदोलन केले तर चौहान सरकारने त्यांचे गोळ्या घालून मुडदे पाडले! जगाला ज्याने अन्न खावू घातले त्याला सरकारने गोळ्या घातल्या. हा कुठला न्याय आहे? ही काय माणुसकी आहे? मग तुम्हाला जनतेने घरचा रस्ता दाखविला तर त्यात त्यांचे काय चुकले? मध्यप्रदेशमधील पराभवात दस्तुरखुद्द मोदी आणि शहा यांचा वाटा जास्त आहे. त्यांनी भाषणांमधून जी भाषा वापरली व जे नको ते बोलले त्याचा परिणाम म्हणून जनतेतून उलटी प्रतिक्रिया आली असे आता शिवराजसिगांपासून सारे स्थानिक भाजप नेते बोलू लागले आहेत. तीच अवस्था छत्तीसगडची आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी छत्तीसगडमध्ये असंख्य सभा घेतल्या. त्यांनी जिथे जिथे सभा घेतल्या तिथले भाजपचे सर्व उमेदवार पराभूत झाले. ते योगींच्या भाषणांमुळेच पडले अशी भावना आता रमणसिंह यांच्या मनातही तयार होऊन त्यांनी ती बोलून दाखविली आहे. सुषमा स्वराज आणि उमाभारती या दोन्ही मंत्र्यांनी आपण आगामी लोकसभा निवडणुका लढविणार नाही असे अगोदरच जाहीर करुन टाकले आहे. हा कशाचा परिणाम आहे? मोदींच्या राजकारणाचा व वागण्याचा त्यांना इतका वीट आला आहे?

देशातल्या चांगली घडी बसलेल्या संस्थांची उदा. केंद्रीय नियोजन मंडळ, सीबीआय, माहिती आयोग, विद्यापीठ अनुदान आयोग, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया वगैरे. मोडतोड करुन कारभाराची घडी विस्कटण्याचे जे काम सत्तेवर आल्यानंतर मोदींनी केले आहे त्याची फार मोठी किंमत देशाला मोजावी लागणार आहे. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी अचानक जी नोटबंदी आणली व ५०० आणि १००० च्या नोटा रद्द करुन सर्वसामान्य जनतेवर जो बाँब मोदींनी टाकला त्याचा दुष्परिणाम अजूनही सर्व समाज भोगतो आहे. या नोटाबंदीने शेतकरी पूर्ण उद्ध्वस्त झाला. शेतीमालाच्या किंमती कवडीमोल झाल्या. मालाला गिऱ्हाईक नसल्यामुळे तो फेकून द्यावा लागला. मालाचे भाव तर इतके खाली आले की शेतातून माल तोडणे व काढणेही शेतकऱ्याला परवडेना. त्याचा मजुरीचा खर्च भागेना. वाहतुकीचा आणि बाजाराचा खर्च तर

वेगळाच. अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सर्वाधिक आत्महत्या भाजप सरकारच्या काळात झाल्या आहेत. पण सरकारला कधीही पान्हा फुटला नाही. शेतकऱ्यांविषयी प्रेम वाटले नाही. काँग्रेस-राष्ट्रवादीने संपूर्ण कर्जमाफी शेतकऱ्यांना मिळावी म्हणून गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने निरनिराळ्या मार्गांनी आंदोलने चालविली आहेत. पण सरकारला नाही दया आली. फडणवीस सरकार तर इतकं दळभद्री की कुणाला शक्यतो कर्जमाफीचा फायदा मिळू नये म्हणून अनेक जाचक अटी घातल्या. ऑनलाईन अर्ज करायला लावले. अर्ज भरण्यासाठीच्या रांगा लावून शेतकरी वैतागले. शेवटी नको ती दीड लाखाची कर्जमाफी असे म्हणून त्यांनी तो नाद सोडून दिला. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करताना मोदी-फडणवीसांचा हात थरथरला पण देशातल्या मोठ्या भांडवलदारांची व उद्योगपतींची लाखो कोटी रुपयांची कर्जे माफ करताना यांचा हात सळसळला. अगदी कर्णाच्या अवतारात गेले. बँका वाचविण्याच्या नावाखाली उद्योजकांची कर्जे सरकारी तिजोरीतून भरली. सगळ्या बँका तर वेठीला धरल्याच. पण इतकी वर्षे शाबूत व स्वायत्त राहिलेली रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाही आपल्या कह्यात यावी यासाठी तिच्यावर नियंत्रण आणण्याचा व बँकेचे गव्हर्नरचे अधिकार कमी करुन बँकेच्या कारभारात प्रचंड हस्तक्षेप करण्याचे जे धोरण मोदी आणि जेटली यांनी स्वीकारले त्यामुळे श्री. रघुराम राजन, श्री. उर्जित पटेल यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांनी राजीनामा दिला. मोदी-जेटलींच्या कारभाराला व मनमानी हुकुमशाहीला ते इतके वैतागले की अखेरीस भीक नको पण कुत्रा आवर या भूमिकेत ते गेले. नोटाबंदी करायला या दोघांचा प्रचंड विरोध होता. पण त्यांना विचारतो कोण? जिथे अर्थमंत्री या नात्याने जेटलींना विचारले नाही तिथे रघुराम आणि उर्जित किस झाड की पत्ती!

देशाची न्यायसंस्थाही हस्तक्षेप करुन मोडण्याचा प्रयत्न मोदींनी केला. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच हा खेळ मोदी खेळले. पण सर्वोच्च न्यायालयातले चार न्यायमूर्ती याविरुद्ध बंड करुन उठले. कधी नव्हे ती पहिल्यांदा सुप्रिम कोर्टातील न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारच्या न्यायसंस्थेच्या कारभारातील हस्तक्षेपाविरुद्ध आवाज उठविला. न्यायमूर्तींच्या नेमणुका करणारी कॉलेजियमची यंत्रणा धाब्यावर बसविली. आपल्या बाजूने जे न्याय देतील व जे आपले म्हणणे ऐकतील त्यांनाच बढती व नेमणुका देण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. महत्त्वाच्या केसेस त्यांच्याचकडे देण्याचा प्रघात पाडण्यात आला. गैरसोयीचे असणारे न्यायमूर्ती बदल्या करुन इतरत्र फेकण्यात आले. न्यायसंस्थासुद्धा मोदींनी खिळखिळी केली. लोकांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रचंड विश्वास दाखवून मोदींना जी बलदंड सत्ता (२८२ खासदार) दिली होती तिचा त्यांनी तितकाच प्रचंड गैरवापर करुन अत्यंत खालच्या पातळीचे सुडाचे राजकारण केले. त्यासाठी सीबीआय, ईडी यांसारख्या यंत्रणा राबवून या संस्थांची विश्वासार्हताही संपुष्टात आणली. स्वतःच्या क्षणिक स्वार्थासाठी या संस्थांची त्यांनी जी मोडतोड केली त्यामुळे आता या संस्थांची घडी पुन्हा कोण व कशी बसवेल हा प्रश्नच आहे. फार दूरगामी विपरीत परिणाम मोदींच्या वागण्याचे होणार आहेत आणि त्याची फळे जनतेला व देशाला भोगावी लागणार आहेत.

२०१४ चया लोकसभा निवडणुकीत एनडीएला व त्यातही मुख्यत्वे भाजपला जे यश व विजय मिळाला तो खरा आहे, पण तो बरा आहे काय? इतका विजय बरा आहे काय? याचा विचार करण्याची आता वेळ आली आहे. प्रबळ सत्ता दिली की सत्ताधारी किती मस्तवाल होतात हे मोदींच्या रुपाने जनतेने पुन्हा एकदा अनुभवले आहे. मतदारांच्या मताचा लंबक या रीतीने दुसऱ्या टोकाला गेला. विरोधी पक्ष त्यांच्या कर्माने पराभूत झाले असले तरी इतका पराभव झाल्याने देशात विरोधी पक्षांची अगोदरच जी दुःस्थिती आहे, ती अधिक वाईट झाली. भाजपचे मंत्रीच काय पण सगळे पक्षाध्यक्षही मलईवर बसले. यातून कंत्राटदारांचे फावले. जनतेचे वाटोळे झाले. तिला वैफल्य आहे. वैफल्यातून सांसदीय राजकारण वाढीला लागत नाही याचा अनुभव आपण सध्या घेतच आहोत. संसदेला आता काडीचीही किंमत मोदी देत नाहीत. ते संसदेत मुळात हजरच राहात नाहीत. राहिले तरी सभागृहात जात नाहीत आणि गेले तरी तोंड उघडत नाहीत. मौनीबाबाच्या भूमिकेत राहून सोयीसोयीने भूमिका स्वीकारतात व फक्त गांधी नेहरु घराण्यावर भुंकण्यासाठीच तोंड उघडतात. या पार्श्वभूमीवर खरंच एवढं मताधिक्य भाजपला देऊन आपण चूक तर केली नाही ना असा विचार आता जनता करते आहे. पक्षातूनच कोणी खरं बोलले तर लगेच निष्ठेचा प्रश्न निर्माण होतो. यातून फक्त होयबा भाट तयार झाले आहेत. भाट व होयबा यांच्यामुळे राजकीय पक्ष उभारला जात नाही. एकाच प्रश्नाच्या दोन-चार बाजू असतात. त्या राज्यकर्त्यांपुढे येत नाहीत. मोदी-शहा जोडगोळी तर कोणत्याच बाजूचा विचार करीत नाही आणि कुणाकडे ढुंकूनही पाहात नाही. पिराचे पिराला पडले, फकिराचे बघतो कोण? अशीच त्यांची अवस्था आहे. पूर्वी 'इंदिरा इज इंडिया' अशी घोषणा दिली गेली. आता 'मोदी म्हणजे भारत' अशी घोषणा देऊन भाजपवाले सत्तेच्या उन्मादाचे दर्शन घडवित आहेत. या दोन्ही घोषणांनी देशाचे वाटोळेच केले आहे. नुकसान केले आहे. ते आणखीन किती होऊ द्यायचे याचा विचार सूज्ञ मतदारांनी आता तरी करायला हवा.





# सत्ताधाऱ्यांकडून सत्तेचा गैरवापर

## शरद पवार यांचा आरोप

**हिंदी भाषिक पट्ट्यातील तीन राज्यांमध्ये भाजपाला जो दारूण पराभव स्वीकारावा लागला, त्यामुळे सत्ताधारी पक्षाला उतरती कळा लागली आहे. हे वेगळे सांगायची गरज नाही. आगामी निवडणुकीत आपल्या हाती सत्ता राहणार नाही हे लक्षात आल्यामुळे सत्ताधाऱ्यांनी सर्व प्रमुख संस्था वेठीला धरून त्यांना आपल्या सोयीप्रमाणे वाकविण्याची व वापरण्याची घाई चालविली आहे. त्यातून संस्थांची मोडतोड चालू आहे. हे सगळे जाहीरपणाने शरद पवार यांनी अहमदनगरच्या पत्रकार परिषदेत सांगून मोदी सरकारचा पर्दाफाश केला आहे.**

महाआघाडीच्या संदर्भात उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाच्या काळात सर्व विरोधी पक्षांचे नेते असतील, त्यांची एकत्रित बैठक घेवून आम्ही या संबंधीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आग्रही आहोत.

कालच्या झालेल्या चार राज्यांच्या निवडणुकीमध्ये सत्ता हातात आल्याच्यानंतर आठ ते दहा दिवसांच्या आत मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तिन्ही राज्य सरकारांनी आणि त्याच्या आधी कर्नाटकने शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या संबंधीचा निर्णय तातडीने जाहीर केला. आज प्रधानमंत्र्यांनी सांगितलं, की हा लॉलिपॉप आहे. खरं म्हटलं तर माझ्यासारख्याची अपेक्षा ही होती, राज्यांनी असा एक धाडसी निर्णय घेतल्याच्यानंतर आणि शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, त्याची संकटाची स्थिती हे सगळं पाहिल्याच्यानंतर त्याला मदत करण्याची आवश्यकता ही लक्षात घेऊन केंद्र सरकारनी या राज्यांना आर्थिक ताकद देण्याची गरज होती या निर्णयाची अंमलबजावणी करायला. ती तर केलीच नाही, पण याउलट हे लॉलिपॉप आहे असं सांगून त्याची भलावण करण्याचा प्रयत्न देशाच्या प्रमुखाकडून होतोय. इतर कुणी बोललं असतं तर समजू शकतो.

याचा अर्थ हा आहे, की शेतकरी वर्गाच्यासाठी काही धाडसानी, आर्थिक झळ सोसूनसुद्धा या वर्गाला मदत करायची म्हणून घेतलेल्या राज्यांच्या निर्णयाबद्दल आजचे केंद्र सरकार सहानुभुतीची भूमिका घेत नसल्याचे स्पष्ट होते.

तिसरा मुद्दा मला सांगायचांय, की आत्ता सत्ता असलेल्या लोकांच्याकडून या देशात जतन केलेल्या संस्थांच्यावर हल्ला व्हायला लागलांय. उदाहरणार्थ, तुम्ही वाचलं असेल, तुम्ही छापलं असेल, की मध्यंतरी सुप्रिम कोर्टाच्या चार न्यायाधिशांनीच प्रेस कॉन्फरन्स घेतली. हे कधी झालं नाही, या देशाच्या इतिहासामध्ये आणि त्यांनी सांगितलं, की कसा गैरवापर केला जातो. तो प्रकार आपण पहिल्यांदा या देशात पाहिला. तुम्ही मध्यंतरी वाचलं असेल की या देशाच्या ज्या महत्त्वाच्या इन्स्टिट्यूशन आहेत, त्याच्यात सीबीआय ही एक इन्स्टिट्यूशन आहे. या सीबीआयमधील दोन अधिकारी क्रमांक एक आणि क्रमांक दोनचे एकमेकांवर हल्ले करायला लागले आणि सरकारनी त्यांना रातोरात कुठेतरी बाजूला टाकले. लोकांना कसं असतं, एखाद्या ठिकाणी काय मोठा गुन्हा झाला आणि राज्याच्या इन्व्हिस्टीगेशन करणाऱ्या यंत्रणेकडून जर उत्तर मिळत नसेल तर लोक म्हणतात, की सीबीआयकडं जा. तर सीबीआयच्याबद्दल लोकांना एक विश्वास होता. आज या विश्वास असलेल्या संस्थेवरच हल्ला याठिकाणी केल्याचं चित्र दिसतंय.

तिसरी महत्त्वाची संस्था देशाच्या अर्थकारणाची, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया. तिथं राजनसारखा जाणकार गव्हर्नर आरबीआयचा असताना त्यांना त्याठिकाणी निर्णय घेण्याच्यासंबंधी





स्वातंत्र्य, अधिकार असताना त्याच्यात हस्तक्षेप करायला सुरूवात केली आणि त्यांनी राजीनामा दिला. उर्जित पटेल नावाचे गृहस्थ गुजरातवरून आणले, त्याला गव्हर्नर म्हणून त्याठिकाणी नेमले. त्याची नेमणूकच मुळात मोदी साहेबांनी स्वत: केली होती. आणि त्याची नेमणूक केल्याच्यानंतर काही रक्कम रिझर्व्ह बँकेला सरकारला निवडणुका जवळ आल्या म्हणून लोकप्रियता घटलेली दुरूस्त करायला आवश्यक आहे म्हणून त्यांनी काही लाख कोटी



रिझर्व्ह बँकेतून मागितले आणि असं देणं शक्य नाही हे जेव्हा उर्जित पटेलांनी सांगितलं, त्यावेळी उर्जित पटेलांना तिथं काम करणं अशक्य झालं आणि



तीन ते सहा महिन्याच्या आत त्यांनी राजीनामा दिला. आता नवीन त्याठिकाणी आले आहेत. म्हणजे आरबीआय ही देशातली अत्यंत महत्त्वाची संस्था आहे त्या संस्थेतसुद्धा आता हल्ला सुरू आहे. म्हणजे न्यायालय, सीबीआयसारखी संस्था, आरबीआयसारखी संस्था या सगळ्यांवर एकप्रकारचे हल्ले याठिकाणी सुरू केलेले आहेत आणि त्याचबरोबर विरोधकांना नाउमेद करण्यासंबंधीची भूमिका आणि त्यासाठी सत्तेचा गैरवापर हे आपल्याला या मिशेल प्रकरणावरून दिसतंय. आणि म्हणून देशाच्या समोर आणीबाणीसदृश्य परिस्थिती आत्ता निर्माण झालेली आहे आणि या परिस्थितीला संबंध देशातील लोकशाहीसंबंधी आस्था असणाऱ्या घटकांनी एकत्र येऊन तोंड द्यावं लागेल आणि तो विचार विरोधक म्हणून आम्ही करू.



**प्रश्न : सत्ता परत मिळविण्यासाठी अशा प्रकारचे हल्ले सुरू केले आहेत, असं काय वाटतं का?**

**पवार :** साधी गोष्ट आहे, सत्ता परत मिळण्यासंबंधीची खात्री त्यांना नाहीये. कारण तीन राज्यांतील निवडणुकांचे निकाल काय सांगतायंत. स्पष्ट सांगायचं म्हणजे, माझ्यासारख्याला राजस्थानमध्ये आपण अपोजिशन नक्की जिंकू असं वाटत होतं. पण मला छत्तीसगडमध्ये असा अनुभव येईल असं वाटत नव्हतं. किंवा मध्य प्रदेशमध्ये मी जावून आलो, तुल्यबळ वाटत होतं. पण लोकांनी ठरवलं आणि लोकं या निष्कर्षाला आलेली दिसतायंत, की सध्याची राजवट बदलली पाहिजे आणि हेच त्या तिन्ही राज्यांमध्ये दिसल्याच्यानंतर उद्या काय होणार आहे हे आपल्याला दिसतंय. त्यामुळे पुन्हा ही सत्ता हातामध्ये ठेवण्याच्यासाठी गैरवापर सगळे करता आले तर करावेत आणि काही करून सत्ता हातात ठेवायची या प्रकारचा तो प्रयत्न असावा अशी शंका येणारी स्थिती आज या सगळ्या परिस्थितीवरून बघायला मिळते.

**प्रश्न : तीन राज्यांच्या निकालानंतर सर्व प्रमुख पक्षांच्या नेत्यांची पंतप्रधान होण्याची आशा वाढली आहे असं बोललं जातं. याचा परिणाम महाआघाडीवर होईल असं वाटतं का? सगळी एकत्र कशी येणार?**

**पवार :** सगळ्यांना आशा वाढलेली आहे हे मी आत्ताच ऐकतोय. पार्लमेंटमध्ये असं कुणी बोलत नाही. म्हणजे राहुल गांधींनी सुद्धा तीन ठिकाणी स्टेटमेंट केलं की उमेदवार नाही म्हणून. जरी सगळ्यात महत्त्वाचा पक्ष आहे आणि अधिक संख्या आहे त्याची. काही लोकांचं नाव येतं. माझंही नाव येतं. नाव येण्यात काही अर्थ नाही. मी काय कधी म्हणलेलो नाही. आणि जर मी मर्यादित जागा लढवणार असेन तर नाही ती स्वप्नं बाळगणारं अव्यवहारी राजकारण मी कधी करत नाही. त्यामुळे विरोधकांच्यात अशा प्रकारची भावना नाहीये. विरोधकांमध्ये मग ती ममता असो, या सगळ्यांनी हीच भूमिका घेतलेली आहे, की आपल्याला पर्याय द्यायचांय. आपल्याला परिवर्तन पाहिजे. या परिवर्तनासाठी आपण एकत्र यायचंय.

**प्रश्न : ऑगस्टा वेस्टलँड प्रकरणात गांधी कुटुंबाचे नाव घेण्यासाठी मिशेलवर दबाव आणला जात आहे का?**

**पवार :** असंच आहे. तो काय बोलला आहे हे तुम्हाला माहिती नाही, मलाही माहिती नाही. ईडीचा एक अधिकारी जावून सांगतो, की तो असा असा बोलला. उद्या मी यांच्याबद्दल तक्रार केली, की यांनी असं असं केलं. तुम्हाला माहिती नाही. मी तक्रार केली ती खरी आहे की नाही हे माहिती नाही. पण मी म्हणलं. आणि मग तसा रिपोर्ट केला आणि ते आलं. याच्यामध्ये दुसरं काहीही नाही. म्हणजे कोणत्या टोकाला आपण जावू शकतो

सत्तेवर असल्यावर याचं एक अत्यंत वाईट उदाहरण आत्ता आपल्याला बघायला मिळतंय.

**प्रश्न : विरोधकांची आघाडी बनवण्याचा प्रयत्न होत असताना समाजवादी पार्टी आणि बहुजन समाज पार्टी यांच्यामध्ये कुठेतरी असंवाद होत आहे.**






**पवार :** तुम्ही जे म्हणता आणि अनेकांचा समज तुमच्यासारखा आहे, की आम्ही संबंध देशपातळीवर एक पर्यायी आघाडी तयार करतोय. हे नाही. आम्ही राज्याराज्यामध्ये आघाडी करण्याचा प्रयत्न करतोय. कारण प्रत्येक राज्याची स्थिती वेगळी आहे. उदाहरणार्थ, आता तामिळनाडूसारखं राज्य असेल, तिथं राष्ट्रवादीने जागा मागण्यात काही अर्थ नाही. आमची काही शक्तीच नाही तिथं. पण तामिळनाडूमध्ये असलेला एक नंबरचा पक्ष भाजपाला विरोध करू शकेल असा डीएमके आहे. त्यामुळं आमचा आग्रह असा आहे, की तिथं डीएमके एक नंबरचा पक्ष राहील आणि काँग्रेस वगैरे बाकीच्यांनी दोन नंबरची पोझिशन घ्यावी. तुम्ही कर्नाटकमध्ये आलात तर तिथं काँग्रेस एक नंबरची आहे, देवेगौडांच्या पक्षाची पोझिशन त्याच्यानंतरची. आंध्रामध्ये गेलात तर चंद्राबाबू एक नंबरला आहेत, त्यांनी एक नंबरची पोझिशन घेतली पाहिजे, काँग्रेसने त्याठिकाणी दोन नंबरची घेतली पाहिजे. आपण पश्चिम बंगालमध्ये गेलात तर तिथं ममता बॅनर्जींचा पक्ष हा एक नंबरचा आहे. काँग्रेस आणि डाव्यांनी दोन नंबरची पोझिशन घेतली पाहिजे. ओडिशामध्ये पटनाईकांचा पक्ष हा एक नंबरचा आहे. इतरांनी दुय्यम भूमिका घेतली पाहिजे. आज उत्तर प्रदेशमध्ये एक नंबरची पोझिशन घेण्याचा अधिकारी समाजवादी पार्टी आणि बहुजन समाज पार्टीला आहे. कारण अधिक लोक आणि अधिक पाठिंबा या दोघांना आहे. तर त्यांना एक नंबरची पोझिशन देवून इतरांनी दुय्यम पोझिशन घेतली पाहिजे. आणि महाराष्ट्रात राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांनी एक नंबरची पोझिशन घेतली पाहिजे आणि अन्य सहकाऱ्यांना बरोबर घेतलं पाहिजे. मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरियाना, गुजरात या राज्यांत काँग्रेसने एक नंबरची पोझिशन घेतली पाहिजे. कारण, त्यांची शक्ती आम्हा सगळ्यांपेक्षा तिथं जास्त आहे. यानुसार त्या त्या राज्यात आघाडी करून निवडणुकीच्यानंतर आम्ही एकत्र बसू आणि त्यावेळी काय असेल तो पर्याय देऊ.

अनेक लोक असं म्हणतात, की हे शक्य नाही. मी त्यांना एकच उदाहरण देतो, २००४ला आम्ही निवडणुका लढलो. आम्ही काय आघाडी केली नव्हती. २००४ची निवडणूक झाल्याच्यानंतर आम्ही एकत्र बसून नंतर, मला आठवतंय, की सोनिया गांधी माझ्या घरी आल्या होत्या. सोनिया गांधी असोत, मी असो, प्रणव मुखर्जी, मनमोहनसिंग असतील आम्ही सगळे एकत्र बसलो आणि यूपीएची आम्ही स्थापना केली. आणि तिथं आम्ही एकमतानं मनमोहनसिंगांची निवड केली. त्याच्याआधी आमची आघाडी नव्हती. पण नंतर आम्ही ती केली आणि दहा वर्षे देशाचं राज्य चालवलं. स्थिर सरकार दिलं. त्यामुळं आत्ताच काहीतरी आघाडी करा, आत्ताच तुमचा नेता कोण हे सांगा याला काय अर्थ नाही. निवडणुकीच्यानंतर आम्ही एकत्र बसू. एका विचारानं त्याठिकाणी निर्णय घेऊ आणि देशाला स्थिर सरकार देऊ, असा मला विश्वास आहे.

**प्रश्न : सोहराबुद्दीन चकमकप्रकरणात सर्व २२ आरोपी निर्दोष सुटले. त्याविषयी काय सांगाल?**

**पवार :** सरळ गोष्ट आहे. आमच्या सहकाऱ्यांनी जे सांगितलं, तेच म्हटलं पाहिजे. त्याची हत्या झाली. त्याच्या पत्नीची हत्या झाली. त्यांच्याबरोबर जे होते त्यांची हत्या झाली. पोलिसांनी त्यांना गोळ्या घातल्या आणि आता यामध्ये काहीच झाले नाही असं म्हटलं जातंय. बहुतेक त्याने स्वत:च स्वत:ला गोळी मारली असेल. ही काय देशाची कायदा सुव्यवस्था आहे का? ज्या पद्धतीने लोकांची हत्या होतेय आणि न्यायसंस्थेत काही सिद्ध होत नाही. यावरून एक गोष्ट सिद्ध होते, की कायद्याचा गैरवापर ज्यावेळी गुजरातमध्ये झाला, त्यावेळी तिथे सत्ता कोणाची होती याचा विचार करा आणि त्याचे परिणाम आज दिसत आहेत. न्यायाधिश लोयांचेही असेच झाले. त्यांना कुणी मारलं हे अजून समजलं नाही. यातील सत्य अद्याप जनतेसमोर

आलेले नाही, हे स्पष्ट होत आहे.

**प्रश्न : आघाडीचे जागावाटप रेंगाळलेले आहे का?**

**पवार :** अजिबात रेंगाळलेले नाही. ४८पैकी ४० जागांबद्दल एकमत आहे. राहिलेल्या आठ जागांसंबंधीची चर्चा चालू आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्याच्यातही तीन-चार, तीन-चार असे करत हा प्रश्न संपेल आणि हे सुद्धा ठरले आहे, की येथे काही झाले नाही तर केंद्रीय पातळीवर काँग्रेस-राष्ट्रवादीचे नेते एकत्र बसतील आणि निर्णय घेतील.







**प्रश्न : नगरच्या महापालिकेतील घडामोडींविषयी काय?**

**पवार :** मी माझ्या पक्षाचे राज्याचे अध्यक्ष त्यांच्याशी काल चर्चा केली. त्यांच्याकडून समजून घेतलं. माझ्या वाचनात आज असं आलं, की आमच्या एका सहकाऱ्यानं असं सांगितलं, की माझा असा आदेश नव्हता. ही बातमी खरी आहे का खोटी हे मला माहिती नाही. ते जर खरं असेल तर माझं स्टेटमेंट असं आहे, की त्यांनी जे सांगितलं, की आम्हाला आदेश नव्हता हे सत्य नाही. राष्ट्रवादीच्या राज्याच्या अध्यक्षांनी स्पष्ट सूचना दिल्या होत्या, की अशा प्रकारची आघाडी आपण करायची नाही. भाजपबरोबर जायचं नाही. त्याच्यानंतर इथले आमदार मला भेटायला आले. मला भेटल्याच्यानंतर इथली परिस्थिती सांगितली, कशासाठी भेटतोय हे सांगितलं, अनेक बऱ्याच गोष्टी सांगितल्या. हे सगळं ऐकल्याच्यानंतर मी स्पष्ट सांगितलं, की या सगळ्या गोष्टींचा आपण वेगळा विचार करू. त्याच्यात काय करायचं याबद्दल सखोल जाऊ आणि कुठं अन्याय, अत्याचार तुमच्यावर होत असेल तर त्यातून कसा मार्ग काढायचा हे बघू. पण महापौरपदाच्या निवडणुकीत आपण बीजेपीबरोबर जायचं नाही. आपली भूमिका स्वच्छ आहे. आता हे मी सांगितल्याच्यानंतर माझ्या मते आणखी कुणी सांगायची गरज आहे असं वाटत नाही. त्यामुळं मी सांगितल्याच्यानंतरही हा निर्णय त्याठिकाणी झाला. हे पाहून आमच्या पक्षाचे राज्याचे अध्यक्ष यांनी ताबडतोब मला कळवलं, की मी या लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत. त्यांना दहा ते बारा दिवसांचा कालावधी देतोय. त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागतोय. त्याशिवाय सगळ्यांच्याकडून आम्ही माहिती घेतोय. ती माहिती आल्याच्यानंतर याच्यात आम्ही काय निर्णय घ्यायचा हे आम्ही ठरवू. मला वाटतं, की ४ किंवा ५ तारखेला आमची बैठक होईल आणि त्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय होईल. पण मी एक गोष्ट स्पष्ट सांगतो, की याबाबतीत पक्षाच्या अध्यक्षांनी सूचना दिल्याच्यानंतरसुद्धा काही वेगळा निर्णय याठिकाणी घेतला गेला असेल तर ती गोष्ट स्वीकारार्ह नाही. त्यासंबंधीची नोंद पक्षाने गांभीर्याने घेतलेली आहे आणि त्याच्यावर कारवाईही गांभीर्याने केली जाईल.

**प्रश्न : राज्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या तडजोडी करण्यात आल्या आहेत.**

**पवार :** या गोष्टी वेगळ्या आहेत. असं कुठं पंचायत समितीत वगैरे झाले असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. आता निवडणुका तोंडावर आल्या आहेत. आणखी दोन-तीन महिन्यांनी आम्हाला सामोरं जायचंय. आत्ता देशामध्ये भारतीय जनता पार्टीचं सरकार राज्यात आणि देशात ज्या पद्धतीनं सरळ सरळ कायदा हातात घेऊन लोकशाहीची मूल्यं पायदळी तुडवतायंत. हे बघितल्याच्यानंतर आज आम्हाला एक वेगळी लाईन घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे यापूर्वी काय झालं, ते माझ्या दृष्टिनं महत्त्वाचं नाही. अध्यक्षांनी सूचना दिल्याच्यानंतर घेतलेला चुकीचा निर्णय असल्यामुळे यामध्ये बघ्याची भूमिका घेता येणार नाही.


**प्रश्न : या सगळ्याचा राष्ट्रवादीच्या विश्वासार्हतेवर आणि काँग्रेसबरोबरच्या आघाडीवर परिणाम होईल का?**

**पवार :** काडीचा परिणाम होणार नाही. मी काल एका चॅनेलवर बघत होतो, नगरचे कुणीतरी मान्यवर पत्रकार सांगत होते, की राष्ट्रवादीचं असं असं ठरलं आहे. मी त्यांचा आभारी आहे. राष्ट्रवादीचे निर्णय इथे पत्रकार घ्यायला लागले आहेत आणि झीचे प्रतिनिधी आम्हाला आणि संबंध राज्याला मार्गदर्शन करायला लागले आहेत. त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. आमची भूमिका इथे क्लिअर आहे आणि ती तुम्हाला चार-पाच तारखेच्यानंतर दिसेल.

Best

Compliments

# खंत आहे ती काळ







...अखेर डॉ. ऊर्जित पटेल यांनी राजीनामा दिलाच. किंबहुना, त्यांनी त्यांच्या पदावर सन्मानाने काम करूच नये, अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा जारीचा प्रयत्न केंद्रातील सत्ताधारी नाही तरी २०१६ सालापासून करत होतेच. स्वत्व आणि ज्या संस्थेमध्ये ज्या पदावर आपण सेवा बजावत आहोत त्या संस्थेची प्रतिष्ठा आणि त्या पदाचा गौरव सरसहा पायदळी तुडवण्याची राजकीय व्यवस्थेतील सर्वेसर्वांची निर्गल मनोवृत्ती सहन न होणारी कोणतीही व्यक्ती जे करेल तेच नेमके डॉ. पटेल यांनी केले. इथे प्रश्न केवळ व्यक्तीचा नाही तर मूल्यांचा आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये समाजव्यवहारातील विविध संस्थांच्या स्वायत्ततेबाबत घटनात्मक पातळीवर जी व्यवस्था आपण निर्माण करून ठेवलेली आहे त्या व्यवस्थेची बूज आपण राखणार किंवा नाही, हा खरा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे, कोणत्याही देशातील राजकीय उच्चपदस्थांना विचारवंतांचे, अभ्यासकांचे, देशाच्या एकंदर दूरगामी हिताचा विचार करून दक्षपणे उचित असे निर्णय घेणाया स्वतंत्र बुद्धीच्या व बाण्याच्या प्रगल्भांचे एवढे वावडे असावे, हे वास्तव एकंदरीनेच राजकीय संस्कृतीमधील कमालीच्या अधोगतीचे लक्षण मानावे लागते. आपल्या देशातील प्रचलीत राजकीय संस्कृतीच्या गुणवत्तेचा जो ऱ्हास वेगाने घडून येतो आहे त्यांतील सर्वांत चिंताजनक अशी कोणती बाब असेल तर ती नेमकी हीच. प्रथम, डॉ. रघुराम राजन यांना रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी सत्तारूढ सरकारने मुदतवाढ दिली नाही. त्या नंतर, नीती आयोगाची धुरा सांभाळणारे डॉ. अरविंद पनगढिया यांनी पदाचा राजीनामा देत पुन्हा अमेरिकेचा रस्ता पकडला. त्यांच्या नंतर नंबर लावला तो केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार हे पद सांभाळणाऱ्या डॉ. अरविंद सुब्रह्मण्यन यांनी. त्यांनीही, पदाचा कालावधी संपण्याआधीच अधिकारपदाची वस्त्रे खाली ठेवून अमेरिकी विचारविश्वाकडे पावले वळवली. आणि आता डॉ. ऊर्जित पटेल राजीनामा देऊन गेले. हा सगळाच घटनाक्रम विलक्षण बोलका आहे. जबाबदार राजकारण आणि दक्ष

# सोकावल्याची...


अभय टिळक



अर्थकारण यांच्यादरम्यानचे संबंध कसे नसावेत याचे जणू आदर्श उदाहरणच केंद्रातील सत्तारूढ सरकार सध्या जगासमोर ठेवते आहे. खरी खंत आहे ती नेमकी हीच. म्हातारी केव्हा तरी मरणार असतेच...परंतु, काळ सोकावतो आहे आणि त्याचे कणभरही सोयरसुतक कोणाला दिसत नाही.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीन अभ्यासक व कुशल अर्थप्रशासक गेल्या तीन वर्षांमध्ये आपल्या देशाच्या अर्थकारणातून बाहेर गेले, ही वास्तविक पाहता सगळ्यांनीच अंतर्मुख होऊन विचार करावा, अशीच बाब होय. गंमत म्हणजे, आपल्या देशाच्या विचारविश्वातील सारी चर्चा केवळ व्यक्तिकेंद्रीच राहिली. डॉ. रघुराम राजन आणि डॉ. ऊर्जित पटेल यांच्या जाण्याने भारतीय रिझर्व्ह बँकेसारख्या देशाच्या अर्थकारणातील एका अत्यंत संवेदनशील, कळीच्या प्रतिष्ठित संस्थेच्या स्वायत्ततेचा जी उदंड पायमल्ली व हानी या सगळ्यांतून झाली आणि आजही होते आहे, त्यांबद्दल त्या मानाने फारसे काही कोणाला वाटल्याचे दिसले वा जाणवले तरी नाही. संस्थात्मक जीवनाच्या एकंदरीतच ऱ्हासाबाबत आपल्या एकंदर समाजातच इतकी बेफिकिरी आणि असंवेदनशीलता कशामुळे आली असावी, हा खरा संशोधनाचा आणि त्यांहीपेक्षा अधिक म्हणजे चिंतेचा प्रश्न होय. बरे, ज्या मुद्यांचा आग्रह डॉ. राजन आणि डॉ. पटेल यांनी धरलेला होता ते देशाच्या अर्थकारणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते व आहेत, यांबद्दल तरी कोणाच्या मनात शंका असू नये. आपल्या देशातील बँकांनी आजवर केलेल्या कर्जवाटपाची गुणवत्ता तपासण्याची मोहिम डॉ. रघुराम राजन यांनी प्रवर्तित केली आणि कपाटांच्या आडकप्प्यांत दडवून ठेवलेले थकित कर्जांचे जणू सापळेच भराभर बाहेर पडायला लागले. डॉ. राजन यांनी हा कार्यक्रम, समजा, राबवलाच नसता तर थकित कर्जांची ही जटिल समस्या कधी उजेडातच आली नसती. बरे, रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदावर असणाऱ्या व्यक्तीने सार्वजनिक जीवनातील पैलूंबाबत भाष्य करूच नये, असा काही अलिखित वा लिखित दंडक

नाही. तसा तो असताही कामा नये. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास दमदार, निरामय आणि सातत्यशील राहावयास हवा असेल तर त्या देशातील चर्चाविश्व हे निकोप, निर्भय, थेट आणि नाना प्रकारच्या मतमतांतरांना, मतवैचित्र्यांना आणि परस्परविरोधी मतप्रवाहांनाही उदार वाटा करून देणारे असले पाहिजे इतकेच नव्हे तर, असे मुक्त विचारविश्व ही सुभग अर्थविकासाची अनिवार्य पूर्व अट ठरते, असे जे मतप्रदर्शन डॉ. राजन यांनी नवी दिल्ली येथील 'आयआयटी'मध्ये केलेल्या भाषणादरम्यान मांडले होते त्यांत चुकीचे अथवा अनिष्ट असे काय होते ? या दोहोंची जणू सजा म्हणूनच डॉ. राजन यांना रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदाची मुदत वाढवून मिळाली नसावी, असे मानण्यास भरपूर जागा आहे. आणि आता तर, ज्या परिस्थितीमध्ये डॉ. ऊर्जित पटेल यांनी राजीनामा दिला ते बघता त्या शंकेवर शिक्कामोर्तब होण्यास काहीच प्रत्यवाय नसावा.



शक्तिकांत दास



विरल आचार्य

देशभरातील बँकांनी वाटप केलेल्या कर्जांची गुणवत्ता तपासण्याचा जो उपक्रम डॉ. रघुराम राजन यांनी त्यांच्या कार्यकालात चालू केला त्याचा आणि डॉ. ऊर्जित पटेल यांनी ज्या तात्कालिक कारणावरून पदाचा राजीनामा सादर केला त्याचा अन्योन्य संबंध आहे. बँकांची कर्जे उद्योगांनी थकवल्यामुळे एकीकडून देशातील मुख्यतः सरकारी बँका आणि दुसरीकडे देशातील बडे कॉर्पोरेट विश्व असे दोघेही अडचणीत आहेत, हे वास्तव या सगळ्या सव्यापसव्यातून निष्पन्न झाले. उद्योगांनी थकवलेल्या कर्जांपायी बँकांचा भांडवली पाया थकला आणि त्यांपायी नव्याने कर्जे वाटप करण्याची बँकांची शक्ती खचली, ही खरी दु:स्थिती आहे. भांडवली पाया थकलेल्या बँकांचे पुनर्भांडवलीकरण करावे तर सरकारची तूट वाढते. वित्तीय तूट वाढली की देशात महागाईचा माहौल संभवतो आणि महागाईवर पक्के नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी तर रिझर्व्ह बँकेवर आहे, असा हा गुंतागुंतीचा तिढा. साहजिकच, ज्या बँका अडचणीत आहेत त्यांच्यावर नव्याने कर्जवाटप करण्याबाबत रिझर्व्ह बँकेने बंधने जारी केली. आर्थिक विकासाची गती दमदार राखल्याचे दाखवत मतदारांचा कौल पदरात



पाडून घेण्यासाठी आसुसलेल्या केंद्रातील शासकांचा त्यामुळे तिळपापड झाला. कारण, आर्थिक विकासाची गती वाढवायची तर अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक वाढायला हवी. त्यासाठी बँकांनी सुलभ व मुबलक कर्जपुरवठा करायला हवा. आता, रिझर्व्ह बँकेने काही सरकारी बँकांवर नवीन कर्जे देण्याबाबत निर्बंध जारी केल्याने वाढीव कर्जवाटप खुंटल्याचा राग




सरकारच्या मनात दाटत राहिला. दुसरीकडे, वित्तीय तुटीचे वाढते भगदाड बुजवण्यासाठी केंद्राचे डोळे फिरले ते रिझर्व्ह बँकेच्या राखीव गंगाजळीकडे. रिझर्व्ह बँकेच्या गंगाजळीमध्ये केंद्राला हात घालू देण्यास डॉ. पटेल अजिबातच तयार नव्हते आणि त्यांच्यावर केंद्रातील सरकारच्या कर्णधारांची खप्पा मर्जी होण्यामागील मुख्य कारण. मग, अत्यंत पद्धतशीर व्यूहरचना चालू झाली. रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळावर जे सरकारनियुक्त स्वयंघोषित अर्थतज्ज्ञ आहेत त्यांनी हाकारे घालत रान उठवायला सुरुवात केली. मुळात, जागतिक स्तरावरील सरासरीचा विचार करता भारतीय रिझर्व्ह बँकेची राखीव गंगाजळी 'अतिरिक्त' आहे, असा युक्तिवाद या पढिक अर्थपंडितांनी उच्चरवाने करायला सुरुवात केली. एवढ्या अतिरिक्त भांडवलाची मुदलात रिझर्व्ह बँकेला गरजच काय, असा प्रश्न मग 'रीतसर' उपस्थित करण्यात आला. रिझर्व्ह बँकेच्या भांडवलरचनेचा समग्र अभ्यास करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा ठरावही 'स्वाभाविक'पणे मग मंजूर झाला. म्हणजेच, भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्यकारी स्वायत्तता खच्ची करण्याचे अभियान नेटाने व आक्रमकपणे राबवण्यास प्रारंभ झाला. या सगळ्याला कमालीचे विटलेले रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर डॉ. ऊर्जित पटेल शेवटी राजीनामा देऊन मोकळे झाले. या सगळ्या रक्तपातावर मीठ चोळण्यासाठीच म्हणून की काय, शक्तिकांत दास यांच्यासारखा पक्का नोकरशहा रिझर्व्ह बँकेच्या माथी मारून, रिझर्व्ह बँकेसारख्या एका स्वतंत्र, जबाबदार, प्रगल्भ व प्रतिष्ठित शिखरसंस्थेचे व्यवहारश: केंद्रसरकारच्या एका खात्यामध्ये रूपांतर करण्याचा सोपस्कार पुरा झाला.

हा सगळाच प्रकार कमालीचा अनाकलनीय आणि कोणाही विचारी, सुबुद्ध व्यक्तीला केवळ हतबुद्ध करणारा आहे. मुळात, रिझर्व्ह बँकेकडे असणारी राखीव गंगाजळी अतिरिक्त आहे की रास्त पातळीवर आहे, हे ठरवायचे कोणी व कशाच्या आधारे, हाही एक गंभीर व सखोल चिंतन-संशोधनाचाच विषय होय. मुंबई येथे २६ ऑक्टोबर २०१८ या दिवशी ए. डी. श्रॉफ व्याख्यानमालेमध्ये बोलताना रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर डॉ. विरल पटेल यांनी नेमका हाच मुद्दा अधोरेखित केला. किंबहुना, ८ नोव्हेंबर २०१६ या दिवशी सरकारने जारी केलेल्या अकल्पित नोटाबदलीपासून रिझर्व्ह बँकेच्या यच्चयावत उच्चपदस्थांच्या मनात खदखदणाऱ्या असंतोषालाच जणू डॉ. विरल आचार्य यांनी त्या भाषणादरम्यान शब्दरूप प्रदान केले. मुळात, रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या गंगाजळीची पातळी अतिरिक्त आहे, असा जो सरकारचा दावा आहे त्या 'अतिरिक्त'ची नेमकी व्याख्या काय, असा प्रश्न डॉ. आचार्य यांनी त्या व्यासपीठावरून उपस्थित केला. रिझर्व्ह बँकेच्या राखीव गंगाजळीची वाजवी अथवा रास्त पातळी कोणी व कशी ठरवायची, असाही सवाल डॉ. आचार्य करतात. राखीव गंगाजळीची रास्त वा इष्ट अशी कोणती पातळी त्याकरिता संदर्भासाठी वापरायची, असाही आचार्य महाशयांचा प्रश्न आहे. हे सगळेच प्रश्न निश्चितच प्रस्तुत व गंभीर आहेत. त्यांबाबत सखोल, चौफेर, नि:पक्षपाती व पारदर्शक चर्चा घडायलाच हवी. मात्र, सरकार या कोणत्याच मन:स्थितीत दिसत नाही. मुळात, रिझर्व्ह बँकेकडील राखीव गंगाजळीचे हस्तांतरण केंद्र सरकारकडे करण्याने रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदाची हानी घडते, हेच सरकारला मान्य नाही. डॉ. आचार्य यांनी या मुद्यावरदेखील नेमके बोट ठेवले.

भारतीय रिझर्व्ह बँकेची राखीव गंगाजळी जागतिक स्तरावरील सरासरीच्या तुलनेत अंमळ अधिक आहे, हा मुद्दा डॉ. अरविंद सुब्रह्मण्यन यांनाही मान्य आहे. मात्र, या राखीव गंगाजळीचे, समजा, सरकारकडे हस्तांतरण केले तर सरकार त्याचा विनियोग कसा करणार, या प्रश्नाशी खरी मेख आहे. थकित कर्जापायी भांडवली पाया खचलेल्या बँकांच्या पुनर्भांडवलीकरणासाठी केंद्रसरकार रिझर्व्ह बँकेचा राखीव निधी वापरणार असेल तर त्याचे हस्तांतरण सरकारकडे करण्याबाबत डॉ. सुब्रह्मण्यन यांना काहीच आपत्ती नाही. परंतु, तसे न करता, रिझर्व्ह बँकेच्या राखीव गंगाजळीचा वापर केंद्र सरकार वित्तीय तुटीचा खळगा भरण्यासाठी करणार असेल तर ते मात्र अनिष्ट

होय, असे डॉ. आचार्य यांचे परखड विवेवन होय. कारण, तसे करण्याने वित्तीय तुटीवर अंकुश ठेवण्याची शासनसंस्थेची प्रेरणाच मुळात संपुष्टात येईल, अशी अत्यंत सार्थ भीती डॉ. आचार्य यांना वाटते. डॉ. ऊर्जित पटेल यांच्या राजीनाम्यामुळे अनेकानेक प्रश्नांचे, मुद्यांचे असे मोठे वारूळ निर्माण झालेले आहे. परंतु, या सगळ्यांपेक्षाही विलक्षण मूलभूत, कळीचा आणि प्रचंड संवेदनशील असा पैलू आहे तो भारतीय रिझर्व्ह बँकनामक एका शिखरसंस्थेच्या स्वायत्ततेची बूज राखली जाण्याचा. एका दृष्टीने बघितले तर आजमितीला, मध्यवर्ती बँकेची स्वायत्तता आणि त्या स्वायत्ततेचा संकोच होण्याची भीती हे दोन परस्परांशी निगडित मुद्दे केवळ आपल्या देशातील चर्चाविश्वातच ऐरणीवर आलेले आहेत, असे अजिबात नाही. आज उभ्या जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये अर्थचर्चांचे विश्व या नाजूक मुद्यावरून अंतर्बाह्य ढवळून निघाल्याचे वास्तव सर्वत्र दिसते.

देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांची स्वायत्तता हा सध्या जगभरातच गाजणारा विषय बनलेला आहे. या गाजत्या मुद्याचा थेट संबंध आहे तो 'सबप्राइम' कर्जांचा फुगा फुटण्यातून २००८ सालातील सप्टेंबर महिन्याच्या मध्यावर अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टाशी. त्या वित्तीय संकटाच्या चपेट्यात गुरफटली गेलेली वैश्विक अर्थव्यवस्था आज त्या विस्फोटाला पुरती दहा वर्षे उलटून गेली तरी म्हणावी अशी त्यातून बाहेर आलेली नाही. युरोपातील अनेक देशांसह दक्षिण आशियातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थाही १० वर्षांपूर्वी साकारलेल्या त्या संकटाच्या छायेमधून आजही वाटचाल करतच आहेत. मंदीसदृश वातावरणाचे मळभ दूर सारायचे तर त्यासाठी आर्थिक वाढीचा वार्षिक सरासरी दर चांगल्यापैकी सशक्त असणे, ही आज सगळ्यांच देशांची निकड बनलेली आहे. आर्थिक आगेकूचीचा वार्षिक सरासरी दर उंचावायचा तर त्यासाठी अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीला चालना मिळावयास हवी. त्यासाठी अर्थव्यवस्थेतील व्याजदरांची पातळी सरासरीने नरम राखणे अगत्याचे ठरते. त्या दृष्टीने, मध्यवर्ती बँकेने उदार, विस्तारशील असे पैसाधोरण अवलंबावे, अशी शासनसंस्थेची अपेक्षा राहते. परंतु, फार उदार पैसाधोरण अवलंबले तर अर्थव्यवस्थेमध्ये महागाईचा माहौल फैलावण्याची सार्थ भीती बाळगणाऱ्या मध्यवर्ती बँका तसे करण्यास नाखूष दिसतात. या पेचातूनच मध्यवती बँका आणि शासनसंस्थांमधील धोरणकर्ते यांच्यातील दुरावा अलीकडील काळात सर्वत्रच वाढताना दिसतो आहे. लोकशाही व्यवस्था नांदणाऱ्या देशांमधील शासनकर्त्यांच्या दृष्टीने अर्थविकासाचा दर दमदार असणे राजकीयदृष्ट्याही कळीचे ठरते आहे. कारण, त्यांना त्यांचा मतदार टिकवून धरायचा आहे. साहजिकच, आर्थिक वाढविकास की महागाई या अर्थकारणातील एका सनातन द्वंद्वाला आता राजकीय परिमाण लाभते आहे.






आर्थिक विकासाचा दर बुलंद राखणे ही शासनसंस्थेची गरज बनलेली आहे तर, विकासाचा दर उंचावण्याबरोबर अनाहूतपणे डोके वर काढणारी महागाई नियंत्रणाखाली ठेवणे, हा मध्यवर्ती बँकेच्या आद्य जबाबदारीचा भाग ठरतो. या दोन संस्थांच्या उद्दिष्टांचा परस्परांना असा थेट छेद बसत असल्यामुळेच, शासनसंस्था विरुद्ध मध्यवर्ती बँक असा सामना आताशा देशोदेशी रंगताना दिसतो.


मध्यवर्ती बँकेने आपल्या राजकीय उद्दिष्टांची परिपूर्ती करणारी पैसाविषयक धोरणे तसेच पतधोरणे आखावीत-राबवावीत अशी इच्छा असणारी शासनसंस्था, या ना त्या प्रकारे मग, मध्यवर्ती बँकेच्या धोरणांवर प्रभाव गाजविण्यासाठी सरसावते. त्यांतूनच, मध्यवर्ती बँकेच्या कार्यकारी स्वायत्ततेचा क्रमाने संकोच होण्याला सुरुवात होते. मध्यवर्ती बँक आणि शासनसंस्था यांच्यादरम्यान विसंवादाची ठिणगी उडते ती नेमकी इथेच आणि स्वायत्ततेच्या याच मुद्यावरून. २००८ साली उद्भवलेल्या वैश्विक वित्तीय अरिष्टाला जागतिक अर्थव्यवस्थेने निर्धाराने तोंड दिले ते देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांनी एकमेकांशी सुसंवाद राखत परस्परसंवादी पैसाधोरणे आखून त्यांची सुविहित अंमलबजावणी केल्यामुळेच. त्या नंतरच्या गेल्या दशकभरादरम्यान जागतिक स्तरावरील वित्तीय व आर्थिक चित्र अजूनही म्हणावे असे सावरलेले नाही. वैश्विक अर्थकारणात वेळोवेळी उद्भवणारे चढउतार निभावून न्यायचे तर मध्यवर्ती बँकांना अनुरूप अशी पैसाधोरणे तसेच पतविषयक धोरणे ताबडतोबीने आखून त्यांची तितकीच कार्यक्षम तामिली करणे अनिवार्य ठरते. त्या दृष्टीने गरजेची असणारी धोरणविषयक लवचिकता ठायी असण्यासाठी मध्यवर्ती बँकेच्या कार्यकारी स्वायत्ततेचा पैस पुरेसा विस्तृत

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

असणे, अगत्याचे शाबीत होते.

आपल्या स्वायत्ततेचा कोणत्याही प्रकारे संकोच होऊ नये, यासाठी देशोदेशीच्या मध्यवर्ती बँका आग्रही बनत असलेल्या दिसतात त्या नेमक्या याचपायी. मध्यवर्ती बँका आणि शासनसंस्था यांच्यादरम्यानच्या संघर्षाची वा विसंवादाची तात्त्विक आणि/किंवा व्यावहारिक चौकट म्हणा वा पार्श्वभूमी म्हणा, ही अशी आहे. मध्यवर्ती बँकांची ही भूमिका 'मध्यवर्ती बँक' या संस्थेच्या आणि पर्यायाने त्या त्या देशाच्या अर्थकारणाच्या दीर्घकालीन हितसंबंधांचे संरक्षण करण्याची दिसते. तर, इतक्या सुदूर भविष्यकाळाचा विचार करण्यास राजकीय व्यवस्थेतील धुरीणांना अवकाशच नसतो. कारण, राजकारण मुख्यत: आकार घेत असते ते तात्कालिकाच्या चौकटीत. म्हणजेच, दुसया बाजूने बघावयाचे झाले तर, हा विसंवाद अथवा संघर्ष मुख्यत: दिसतो तो अर्थकारणाचे दीर्घकालीन हित आणि राजकारणाची अल्पकालीक वा तात्कालिक गरज, यांच्या





दरम्यानचा. आपल्या देशातही घडताना दिसते आहे ते नेमके हेच. भारतीय रिझर्व्ह बँक आणि केंद्रीय अर्थखाते यांच्यामधील संघर्षाचे पर्व गेली सुमारे सहा-सात वर्षे गाजते आहे. आता तर, रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदाचा राजीनामाच ऊर्जित पटेल यांनी अगदी अलीकडे दिल्यामुळे या संघर्षाची धार अधिकच तीव्र झाल्याचे भासते.

वास्तविक पाहता, हा संघर्ष वा विसंवाद व्यवहारात उद्भवण्याची मुदलात गरजच नाही. कारण, आपल्या व्यवस्थेमध्ये पैसाधोरणाचे अंतरंग निश्चित करणारी रिझर्व्ह बँक आणि करविषयक राजकोषीय धोरणे आखणारे केंद्रिय अर्थमंत्रालय यांच्या कार्यकारी अधिकारांची विभागणी पुरेशी स्पष्ट आहे. लोकशाही शासनव्यवस्थेतील लोकनियुक्त सरकारमधील अर्थमंत्रालयाच्या एकंदर नियमनाच्या चौकटीतच रिझर्व्ह बँकेने तिच्याकडे सुपूर्त केलेल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहन करावयाचे असते, हे मूलभूत मार्गदर्शक तत्व भारतीय रिझर्व्ह बँकेचे निवृत्त गव्हर्नर डॉ. वाय. व्ही. रेड्डी यांनी त्यांच्या आत्मकथनामध्ये नमूद करून ठेवलेले आहे. रिझर्व्ह बँक आणि केंद्रिय अर्थमंत्रालय यांनी आपापल्या कार्यकक्षांच्या मर्यादेत निर्णय प्रक्रियेचे स्वातंत्र्य अनुभवणे व उपभोगणे या व्यवस्थेमध्ये अध्याहृत आहे. साहजिकच, रिझर्व्ह बँकेच्या तशा स्वायत्ततेच्या कक्षा आकुंचित होण्याचा अथवा केला जाण्याचा प्रसंग निर्माण झाला की व्यवस्थाविषयक अनंत प्रश्न उभे राहतात. केंद्र सरकारमधील अर्थमंत्रालय आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यादरम्यान डी. सुब्बराव हे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर असल्यापासून प्रकर्षाने चालू झाली. वैचारिक अर्थकारणातील तत्कालीन प्रवाह आणि भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये त्यांचे त्या वेळी जाणवणारे तरंग यांची पार्श्वभूमी त्या घुसळणीला होती. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा सरासरी वेग टिकवून धरण्यासाठी अर्थव्यवस्थेला गुंतवणुकीचे इंजेक्शन टोचत राहणे ती २००९-१० सालानंतर अनिवार्य बाब बनली. साहजिकच, व्याजदरांची सरासरी पातळी नरम राहण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने अतिशय उदार अशा पैसाधोरणाचा अवलंब करावा, अशी केंद्रातील अर्थमंत्रालयाची अपेक्षा होती. तर, त्याच काळात, कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाचे दर सरासरीने चढते असल्याने आयात तेलाच्या माध्यमातून देशी अर्थव्यवस्थेमध्ये संभाव्य असणाऱ्या महागाईच्या धास्तीपायी रिझर्व्ह बँक पैसाधोरण कडक राखण्याच्या मानसिकतेमध्ये होती. त्यांतून, केंद्र सरकारातील तत्कालीन अर्थमंत्री प्रणबकुमार मुखर्जी आणि रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन गव्हर्नर सुब्बराव यांच्यादरम्यान विसंवादाची ज्वाला सतत धुमसत राहिली. प्रणब मुखर्जी यांची राष्ट्रपतीपदावर नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या जागी अर्थमंत्री म्हणून आलेल्या पी. चिदंबरम यांचे आणि सुब्बराव यांचेही सूर जुळले नाहीत ते नेमके त्याच कारणावरून. त्या दोघांमधील विसंवाद तर इतका विकोपाला गेला की, गव्हर्नरपदाची मुदत संपण्याआधी केवळ चारच दिवस मुंबई येथे एका जाहीर व्याख्यानादरम्यान, ''रिझर्व्ह बँकेने सद्य:स्थितीत अवलंबलेली धोरणेच इष्ट व उचित कशी आहेत व होती, याबाबत चिदंबरम यांची आज नाही तरी उद्या खात्री खचितच पटेल'', असे विषादपूर्ण वक्तव्य सुब्बराव यांनी केले. पुढे, डॉ. सुब्बराव यांच्या जागी गव्हर्नर म्हणून डॉ. रघुराम राजन यांची नियुक्ती झाली आणि सत्तापालट होऊन केंद्रातही अर्थमंत्रालयाची सूत्रे अरूण जेटली यांच्या हाती सोपवली गेली. त्यामुळे, वातावरण सुरळीत बनले असे नाही. डॉ. राजन यांनी सूत्रे खाली ठेवल्यानंतर त्यांच्या जागी आलेल्या डॉ. ऊर्जित पटेल यांच्या काळातही रिझर्व्ह बँक व अर्थमंत्रालय यांच्यादरम्यानचे

संबंध मधुर वगैरे अजिबातच नव्हते.

एवढे सगळे रामायण आणि सव्यापसव्य घडून गेल्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेकडील अतिरिक्त गंगाजळीचे वा अतिरिक्त भांडवलाचे हस्तांतरण केंद्रसरकारकडे करण्याबाबतचा मुद्दा अगदी अलीकडेच विवाद्य बनल्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेचा प्रश्न त्या निमित्ताने पुन्हा एकवार चर्चाविश्वाच्या केंद्रस्थानी आला. त्या पार्श्वभूमीवर, आपल्या देशातील व्यवस्थात्मक रचनेशी संलग्न विविध पैलूंचा उहापोह करणारे जे विवेचन रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर डॉ. विरल आचार्य यांनी शुक्रवार, २६ ऑक्टोबर २०१८ रोजी मुंबई येथे ए. डी. श्रॉफ स्मृति व्याख्यानमालेमध्ये बोलताना मांडले त्यांतील सगळेच मुद्दे विलक्षण मार्मिक, कोणत्याही लोकशाही राज्यव्यवस्थेतील सुजाण शासनकर्त्यांना अंतर्मुख होऊन विचार करण्यास भाग पाडणारे आणि प्रजासत्ताक व्यवस्थेतील संस्थात्मक जीवनाच्या गुणवत्तेबाबत व ती गुणवत्ता टिकवण्याबाबत निखळ आस्था असणाऱ्या नागरिकांना सजग बनवणारे असेच आहेत. त्यांमुळे, डॉ. आचार्य यांच्या विवेचनाचा गाभा नीट समजावून घेणे या ठिकाणी अस्थानी ठरणार नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे, डॉ. आचार्य यांनी त्यांच्या विवेचनादरम्यान विशद केलेल्या मुद्द्यांच्या व्यापक चौकटीबाबत माध्यमांमधूनही उहापोह घडून आला नाही.



डॉ. सुब्बराव

डॉ. आचार्य यांच्या प्रतिपादनानुसार, अर्थव्यवस्थेच्या निरामय चलनवलनासाठी स्वायत्तता बुलंद असणारी मध्यवर्ती बँक कोणत्याही देशात अत्यंत गरजेची असते. कारण, राष्ट्रातील अथवा सार्वजनिक जीवनातील संस्थात्मक व्यवस्थेची गुणवत्ता देशाच्या राजकीय तसेच आर्थिक आघाडीवरील यशाच्या दृष्टीने कळीची ठरत असते. या आर्थिक तसेच राजकीय व्यवस्था ढोबळ मानाने दोन प्रकारच्या असतात. 'सर्वसमावेशक व्यवस्था' आणि 'ओरबाडणूकप्रवण व्यवस्था' हे व्यवस्थांचे ते दोन वर्ग होत. सर्वसमावेशक व्यवस्थांमधील निर्णयप्रक्रियांमध्ये बहुविधता अनुभवास येते. न्यायाचे वा कायद्याचे राज्य, कारभारात प्रगल्भता व सर्जकतेचा प्रत्यय... अशांसारख्या बाबींची हमी अशा व्यवस्थांमध्ये मिळत राहते. तर, ओरबाडणूकप्रवण व्यवस्थांमध्ये परिवर्तनाला किंवा नवसर्जनाला अडथळा अथवा प्रतिबंध होताना दिसतो. देशातील वित्तीय तसेच आर्थिक साधनसामग्रीप्रत असलेला 'ॲक्सेस' मूठभर अभिजनांपुरताच मर्यादित राखला जातो. परिणामी, आर्थिक विकासासंदर्भात देशाच्या ठायी वसणाऱ्या क्षमता कुंठित बनतात.




पी. चिदंबरम्

याच धर्तीवर, देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांचेदेखील वर्गीकरण आपल्याला मुख्यत: दोन प्रकारे करता येते. पहिल्या गटातील अर्थव्यवस्था मूल्यनिर्माणावर भर देतात. त्यांचा भर असतो अर्थव्यवस्थेतील मूल्यनिर्मितीला प्रोत्साहन देण्यावर. परंपरानुगतिकतेला आव्हान देणे, पोथीनिष्ठतेचा त्याग करणे हाच यशाचा महामंत्र असल्याची अशा अर्थव्यवस्थांमधील नवसर्जकांची, उद्योजकांची धारणा असते. तर, दुसऱ्या वर्गातील अर्थव्यवस्थांचे वर्णन 'खंड अधिग्रहण करणाऱ्या अर्थव्यवस्था' अशा शब्दांत करणे, नेमकेपणाचे ठरेल. शासनसंस्थेच्या प्रतिगामी धोरणांशी हातमिळवणी करण्याद्वारे लाभ उकळणे, हा अशा अर्थव्यवस्थांमधील उद्योजकांच्या यशाचा मंत्र असतो. शासनसंस्थेच्या दरबारात वट नसलेल्यांना वंचित राखत स्वत:चे उखळ पांढरे करून घेण्यावर अशा अर्थव्यवस्थांमध्ये प्रस्थापितांचा भर राहतो. साहजिकच, पहिल्या प्रकारच्या अर्थव्यवस्थांमधील संस्थात्मक यंत्रणा या सर्वसमावेशक असतात तर, दुसऱ्या प्रकारच्या अर्थव्यवस्थांमधील संस्थात्मक व्यवस्था या ओरबाडणूकप्रवण गणल्या जातात.


मालमत्ता संपादन करण्याचे अधिकार, संपादन केलेल्या मालमत्तेचे संरक्षण करण्याचे अधिकार, जनसामान्यांना प्रदान झालेल्या अशा अधिकारांच्या व्यावहारिक जपणुकीची हमी व कार्यवाही, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग...हे सारे लोकशाहीप्रधान राज्यप्रणालीतील संस्थात्मक व्यवस्थेचे घटक असतात. यांच्या जोडीनेच, स्वायत्त मध्यवर्ती बँक हीदेखील तितकीच महत्त्वाची संस्थात्मक व्यवस्था ठरते. फरक इतकाच की, अन्य संस्थांप्रमाणे मध्यवर्ती बँकेचा थेट संबंध रोजच्या जीवनात सर्वसामान्यांच्या जगण्याशी येत नसतो. परंतु, गंमत अशी की, मध्यवर्ती बँक राबवत असलेल्या धोरणांचा मात्र थेट प्रभाव समाजाच्या सर्व स्तरांतील घटकांवर लगोलग पडत असतो. या मध्यवर्ती बँकेची स्वायत्तता जपली जाणे जिव्हाळ्याचे

ठरते कारण, अर्थकारणामध्ये मध्यवर्ती बँक अतिशय संवेदनशील अशी अनेक कामे व जबाबदाऱ्या पार पाडत असते. अर्थव्यवस्थेत केल्या जाणाऱ्या पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे, व्याजदरांची निश्चिती करणे, देशी चलनाच्या विनिमय दराचे व्यवस्थापन चोख राखणे, बँकांसह एकंदरच वित्तीय क्षेत्रावर निगराणी ठेवणे, पतपुरवठ्याचे नियमन करण्याबरोबरच परकीय चलनाच्या बाजारपेठेचेही नियमन जारी राखणे, देश-विदेशातील वित्तीय स्थैर्याबाबत सतर्क राहणे... अशांसारख्या कामांचा यांत अंतर्भाव असतो.



डॉ. वाय व्ही. रेड्डी

मध्यवर्ती बँकेकडे सोपविण्यात आलेल्या या जबाबदाऱ्या नाजूक व तितक्याच जोखमीच्या असल्यामुळे, शासनसंस्थेच्या सापेक्ष मध्यवर्ती बँकेचे अस्तित्व जगभरातच कटाक्षाने वेगळे राखलेले दिसते. त्या दृष्टीने खास वेगळे असे कायदे करून मध्यवर्ती बँकेचे अधिकार निश्चित केलेले असतात. मध्यवर्ती बँकेची कामे अशी व इतकी गुंतागुंतीची व विलक्षण तांत्रिक स्वरूपाची असल्यामुळेच तिच्या प्रमुखपदी संबंधित क्षेत्रांतील नाणावलेल्या हस्तींची नियुक्ती करण्यात येते. निष्णात अर्थतज्ज्ञ, अर्थाभ्यासक व/अथवा संशोधक, व्यापारी बँकिंगच्या क्षेत्रातील व्यावसायिक वा खासगी क्षेत्रातील बजुर्गांची निवड त्या पदासाठी होत असते.



प्रणब मुखर्जी

शासनसंस्था आणि मध्यवर्ती बँक या दोन संस्था परस्परांपेक्षा वेगळ्या का व कशासाठी केलेल्या असतात अथवा आहेत, हे जाणून घेण्यासाठी या दोन संस्थांमधील फरक व त्यांच्या भूमिका यांच्यातील भिन्नता नीट समजावून घ्यावयास हवी. निवडणुकांचे राजकारण हा शासनसंस्थेच्या अस्तित्वाशी अभिन्नत्वाने जोडलेला भाग असल्यामुळे तिच्या सर्व कार्यकलापाचा मुख्य भर हा निखळ तात्कालिकावरच राहतो. साहजिकच, लोकानुनयी निर्णय घेण्याच्या अथवा घेतल्या जाण्याच्या शक्यता शासनसंस्थेच्या संदर्भात गृहीत धराव्या लागतात. मध्यवर्ती बँकेला मात्र राजकीय व्यवस्थेत अंतर्भूत असलेल्या कालमर्यादेचा असा जाच नसतो. आपण घेत असलेल्या निर्णयांचे दीर्घकालीन संभाव्य परिणाम व संदर्भ नजरेआड होऊ न देता मध्यवर्ती बँकेला तिचे निर्णय घ्यावे लागतात. देशाच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्रदान करणे, हा तिच्या जबाबदारीचा गाभा असल्याने मध्यम ते दीर्घ मुदतीचे भान तिला कामकाजात ठेवावे लागते. दीर्घकालीन लाभांसाठी तात्कालिक फायद्यांवर पाणी सोडण्याचा कणखरपणा दाखवतच मध्यवर्ती बँकेला तिची विश्वासार्हता प्रथम कमवावी व नंतर जोपासावी लागते. त्यासाठी, प्रसंगी कठौर व अप्रिय निर्णय घेण्यावाचून मध्यवर्ती बँकेला पर्यायच नसतो. ते तिला घ्यावेच लागतात.

पैशाची निर्मिती व पुरवठा, पतनिर्मिती, अर्थव्यवस्थेच्या परकीय व्यवहार खात्याचे व्यवस्थापन, वित्तीय स्थैर्य... अशांसारख्या ज्या बाबी मध्यवर्ती बँकेच्या व्यवस्थापनाखाली असतात त्या बाबींसंदर्भातील धोरणांचे व संबंधित धोरणांमधील बदलांचे तात्कालिक लाभ अर्थव्यवस्थेला मिळत राहतातच. परंतु, त्यांतच दीर्घकालीक धोक्यांची बीजेही अनुस्युत असण्याची शक्यता असते, ही बाब नजरेआड करून कधीच चालत नाही. या वस्तुस्थितीचा अधिक खुलासा करणे उपयुक्त ठरेल.

समजा, अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यामध्ये वाढ घडवून आणण्याचा निर्णय मध्यवर्ती बँकेने घेतला तर, वित्तीय व्यवहारांची सुलभता लगोलग वाढेल. वित्तीय तुटीची तोंडमिळवणी करण्यासाठी शासनसंस्थेला त्वरित अर्थपुरवठाही होईल. परंतु, या निर्णयाची परिणती महागाईला इंधनपुरवठा होण्यात होऊन अंतिमतः कठोर अशा पैसाधोरणाचा अवलंब करण्याखेरीज मध्यवर्ती बँकेला पर्याय उरत नाही. आणि, अशा कठोर पैसाधोरणाचे अनिष्ट परिणाम अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीवर होतात.

अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीला चालना मिळावी यासाठी व्याजदरांत कपात केली जावी, अशी अपेक्षा वारंवार वर्तविली जाते. समजा, मध्यवर्ती बँकेने व्याजदरांत अतिरिक्त कपात जारी केली अथवा अर्थव्यवस्थेतील रोकडीमध्ये वाढ घडवून आणली तर अल्पकाळात पतपुरवठा वाढल्याचे दिसते. मालमत्तांच्या सरासरी किंमतपातळीमध्ये वाढ जाणवते, दमदार आर्थिक विकासाची चाके फिरायला लागल्याचा आभास वा वाढविकाससदृश माहौल अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होतो. परंतु, हे सारे वातावरण निव्वळ अल्पकालीन असते. या वास्तवाचे दीर्घकालीन परिणाम अनिष्टच



शाबीत होतात. एक तर, पतपुरवठ्यामध्ये अतिरिक्त वाढ घडवून आणण्याने पतव्यवस्थापनाची गुणवत्ता खालावते. साहजिकच, अधिक जोखमीच्या गुंतवणुकींमध्ये वाढ होते आणि परिणामी भविष्यात एखादे गंभीर वित्तीय संकट उद्भवण्याच्या शक्यतांचे बीजारोपण घडते.

अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक वाढावी यासाठी, देशी बचतीचे देशी उत्पादनाशी असलेले सरासरी प्रमाण देशाची गुंतवणूकविषयक गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने अपुरे असेल तर गुंतवणुकीचा पूरक स्रोत म्हणून परकीय भांडवलाला देशी अर्थव्यवस्थेमध्ये मुक्त प्रवेश बहाल करण्याबाबतच्या धोरणाची तळी उच्चस्वराने उचलून धरली जाते. अनेक कारणांपायी कुंठित होऊन पडलेल्या देशी गुंतवणुकीवरील तात्कालिक उतारा म्हणून या पर्यायाच्या सूक्तासुक्ततेबाबत कोणीच शंका घेणार नाही. परंतु, केवळ तात्कालिक लाभांसाठी परकीय गुंतवणुकदारांनी अल्पावधीसाठी 'पार्क' करून ठेवलेल्या अशा गुंतवणुकी ज्या वेळी स्वदेशगमन करतात अथवा, परकीय गुंतवणुकींच्या ओघात ज्या वेळी अतर्क्य खंड पडतो अशा काळात घडून येणारा देशी चलनाचा मूल्यहास वा देशी चलनाच्या विनिमय मूल्यात अनुभवास येणारी घसरण उभ्या अर्थव्यवस्थेलाच चटके देणारी ठरते.

बँकांचे व्यवस्थापन, त्या व्यवस्थापनावरील नियंत्रण व निगराणी या संदर्भातील प्रमाणके अथवा मानके अंमळ पातळ किंवा शिथील करून त्यांद्वारे बँकांच्या तोटयांकडे काणाडोळा करणे, अथवा बँकांच्या थकित कर्जांसारख्या समस्या नजरेआड लोटून देणे अशांसारख्या बाबींपायी निदान वर्तमानात तरी वित्तीय स्थैर्याचा वरकरणी आभास निर्माण होतो व नांदतो. परंतु, हे सगळेच फसवे असते. कारण, असा सगळा कृत्रिमरीत्या तोललेला डोलारा पत्यांचा बंगला कोसळून पडावा त्या न्यायाने आज ना उद्या कोलमडून पडणार असतो आणि तसा तो पडतोच. मग, अशा धक्क्यापायी भांडवली पाया खच्ची झालेल्या बँकांना सावरण्यासाठी पुन्हा करदात्यांनाच वेठीला धरले जाते. गुंतवणुकीला फटका बसतो आणि अर्थव्यवस्थेतील उत्पादनक्षमता पुरेपूर वापरल्या जाण्याच्या शक्यता पार कोमेजून जातात. पूर्ण क्षमतेने अर्थव्यवस्थेतील उत्पादनशक्यतांचा विनियोग झाल्याने उत्पादनाच्या ज्या पातळीवर पोहोचणे अर्थव्यवस्थेच्या आवाक्यात असते त्या पातळीवर अर्थव्यवस्था मग पोहोचू शकत नाही.

अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने सरकारला भरभक्कम गुंतवणूक करावीच लागते. विशेषत:, ज्या वेळी खासगी गुंतवणुकीस पूरक वा अनुकूल वातावरण अर्थव्यवस्थेत नांदत नसते अशा काळात तर हे अपरिहार्यच बनते. परंतु, त्याच वेळी आणि त्याच्याच जोडीने अर्थकारणात मूलभूत स्वरूपाचे संरचनात्मक बदल अथवा सुधारणा राबवणेही तितकेच अगत्याचे ठरत राहते. हे करत असतानाच, लोकशाहीप्रधान राज्यव्यवस्थेमध्ये, मोठा खर्चाच्या लोकानुनयी योजनांचा अंगीकार केला जाण्याच्या अथवा, संरचनात्मक बदलांदरम्यान, अर्थकारणातील प्रस्थापित बलदंडांच्या हितसंबंधांना धक्का पोहोचण्याच्या शक्यता बळकट असतात. ते म्हटले तर ते स्वाभाविकही ठरते. अशा परिस्थितीमध्ये, अल्पकालीक लाभाच्या परंतु देशाच्या दीर्घकालीन आर्थिक हितास हानीकारक अशी अथवा अशा व्यूहरचना अवलंबण्याबाबत मध्यवर्ती बँकेला आदेश/सूचना/ निर्देश शासनसंस्थेकडून दिले जाणे अगदी संभवनीय असते. अशा, केवळ हस्व दृष्टीच्या धोरणांपासून अथवा व्यूहरचनांपासून देशाच्या अर्थव्यवस्थेचे संरक्षण व्हावे, याचसाठी देशोदेशींच्या मध्यवर्ती बँका त्या त्या देशातील शासनसंस्थांपासून हाताच्या अंतरावर असाव्यात अशीच व्यवस्थात्मक रचना करावी लागते



अथवा केली जाणे अपेक्षित असते. आणि नेमक्या याच कारणांसाठी मध्यवर्ती बँकेच्या कार्यकारी स्वायत्ततेची बूज राखण्याचे व्रत शासनसंस्थेने जपणे गरजेचे ठरते.

व्यवहारात मात्र, मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेचा संकोच करण्यासाठी शासनसंस्था अनेक पद्धतींनी प्रयत्नशील राहताना दिसते. अगदी डोळ्यांवर येईल अशा पद्धतीने नव्हे तर, अप्रत्यक्षरीत्या का होईना परंतु, मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेची पायमल्ली करण्याचा खाक्या शासनसंस्था जारी राखते. त्यासाठी नाना प्रकारच्या क्लृप्त्या योजल्या जातात. मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर, डेप्युटी गव्हर्नर अथवा/आणि मध्यवर्ती बँकेतील मोक्याच्या वा संवेदनशील पदांवर त्या त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांची नव्हे तर प्रशासनातील, नोकरशाहीतील आणि/अथवा शासनसंस्थेशी संलग्न व्यक्तींची वर्णी लावणे, धोरणांच्या माध्यमातून अथवा वेळोवेळी अंमलात आणलेल्या अन्य कायदेविषयक बदलांच्या मार्गांनी मध्यवर्ती बँकेच्या विधिमान्य स्वायत्ततेवर आक्रमण करत राहणे, मध्यवर्ती बँकेच्या अखत्यारीतील बाबींसंदर्भात केवळ मध्यवर्ती बँकेलाच संबंधित नियमांधारे निर्णय घेण्याचे सर्वाधिकार न ठेवता मध्यवर्ती बँक आणि शासनसंस्था अशा संयुक्त कार्यप्रणालीद्वारे निर्णय घेतले जाण्याचा पायंडा पाडणे, वित्तीय क्षेत्राचे नियमन करण्यासाठी शबल संविधानिक अधिकार प्रदान केलेल्या अन्य संस्थात्मक यंत्रणा मध्यवर्ती बँकेच्या जोडीनेच सक्रिय बनवणे...अशांसारख्या मार्गांनी मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेचा संकोच आणि तिच्या कार्यकारी सामर्थ्याचे खच्चीकरण घडवून आणण्यास शासनसंस्था सिद्ध बनत असते. हे व असे प्रयत्न यशस्वी झाले तर एकंदरच अर्थव्यवस्थेमध्ये ऱ्हस्वदृष्टीची धोरणे प्रवर्तित होऊन या सगळ्याची परिणती अंतिमत: वित्तीय अरिष्टामध्ये संभवते. मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेची जपणूक कळीची ठरते ती नेमकी याचसाठी !






विरल आचार्य

डॉ. आचार्य यांनी अतिशय तळमळीने मांडलेले हे सारेच विवेचन अतिशय मर्मग्राही व बिनतोड आहे. भविष्याची जणू चाहूलच डॉ. आचार्य यांना लागली असावी, असे त्यांच्या या विश्लेषणावरून वाटल्याखेरीज राहत नाही. अर्थ अथवा वित्तीय क्षेत्रातील तज्ज्ञ नव्हे तर, **नोकरशाहीतील वा सरकारशी संलग्न अशा एखाद्या व्यक्तीची नियुक्ती मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नरपदी करणे हा मध्यवर्ती बँकेच्या स्वायत्ततेवर घाला घालण्याचा हुकुमी मार्ग होय, असे डॉ. आचार्य जे म्हणतात त्याची जणू पुरेपूर परिपूर्तीच, शक्तिकांत दास यांच्यासारख्या अस्सल नोकरशहाला रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदाची वस्त्रे लेववून मोदी सरकारने मनोभावे केली. लोकशाही राज्यव्यवस्थेतील संस्थात्मक जीवनाची निकोपता जपणे, या मूल्याला आपल्या लेखी काहीच किंमत नाही, हेच जणू सरकारने या कृतिद्वारे ठसठशीतपणे दाखवून दिलेले आहे. या सगळ्यांतून केवळ आपल्या देशातीलच नव्हे तर, उभ्या जगातील अर्थविश्वाला आपण कोणता व किती विपरित संदेश देत आहोत, याचेही भान शासनसंस्थेतील विद्यमान धुरिणांना राहू नये, याचा सखेद विस्मय वाटल्याखेरीज राहत नाही. ऱ्हस्वदृष्टीच्या धोरणप्रणालीपायी व निखळ तात्कालिक राजकीय लाभांवर डोळा ठेवून देशातील उभे भांडवलजगत आणि त्या जगताचा रखवालदार असणाऱ्या रिझर्व्ह बँकेसारख्या मध्यवर्ती बँकेला आपण वेठीस धरत आहोत, याचे सरकारला काहीच वाटू नये?** अशा, स्वायत्तता गमावून बसलेल्या भांडवलबाजाराबाबत, स्वायत्ततेचा परीघ आकुंचित पावलेल्या मध्यवर्ती बँकेबाबत परकीय भांडवलदारांना, गुंतवणुकदारांना विश्वास का व कसा वाटावा, या पैलूचा सरकारने जराही विचार करू नये, हे कोणत्याच तर्कात बसत नाही.अर्थात, याचेही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तर्क हा बुद्धीचा प्रांत आहे. ज्यांचा अवघा भरच केवळ मन की बात सांगण्या-ऐकण्यावर आहे त्यांच्याकडून या पेक्षा वेगळ्या वर्तनाची अपेक्षा करणे, हाच मुदलात खुळेपणा ठरेल!



**– अभय टिळक**
नामवंत अर्थतज्ज्ञ व
संचालक, अर्थबोध संस्था, पुणे



हिंदी भाषक राज्यातील भाजपचा पराभव ही बाब राजकीयदृष्ट्या महत्वाची आहे कारण त्याचे पडसाद आगामी काळात उत्तर भारतातील अन्य हिंदी भाषक राज्यांमध्ये उमटणे अपेक्षित आहे. यामध्ये उत्तर प्रदेश हे राज्य सर्वात महत्वाचे आहे कारण हे सर्वात मोठे हिंदी भाषक राज्य आहे. त्याचप्रमाणे लोकसभेच्या सर्वाधिक जागा (८०) याच राज्यात आहेत. भाजप पराभूत झालेल्या तिन्ही राज्यांच्या सीमा या सर्वात मोठ्या राज्याला लागून आहेत. त्यामुळे या पराभवाचा परिणाम उत्तर प्रदेशावर होणार आहे ही बाब अटळ आहे.



# हिंदी भाषक राज्यातील भाजपचा तिहेरी पराभव

**तथागत**

नुकत्याच पाच राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या. त्यांचे निकालही हाती आले. यामध्ये तीन हिंदी भाषक राज्यांचा समावेश होता - राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगढ ! याखेरीज दक्षिणेतील तेलंगणा आणि ईशान्य भारतातील मिझोरम या राज्यांमध्येही निवडणुका झाल्या. या पाचपैकी तीन हिंदी भाषक राज्यांमध्ये भाजपची सरकारे होती. या तिन्ही राज्यात सत्तारूढ भाजपचा पराभव झाला. भाजपला किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी भाजप अध्यक्ष अमित शहा यांना हे काहीसे अनपेक्षित असावे. नरेंद्र मोदी हे 'जादुई नेते' आहेत या आतापर्यंतच्या समजाला तडा गेला. त्याचप्रमाणे मोदी-शहा जोडीला कुणी पराभूत करु शकत नाही व त्यांच्या आधिपत्याखालील भाजप अभेद्य व अखंड-विजयी असल्याची समजूतही या तिहेरी पराभवाने इतिहासजमा झाली. हा धक्का पराभवाचे महत्व कमी लेखण्याची धडपडही केली. परंतु याखेरीज भाजपकडून या पराभवावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

हिंदी भाषक राज्यातील भाजपचा पराभव ही बाब राजकीयदृष्ट्या महत्वाची आहे कारण त्याचे पडसाद आगामी काळात उत्तर भारतातील अन्य हिंदी भाषक राज्यांमध्ये उमटणे अपेक्षित आहे. यामध्ये उत्तर प्रदेश हे राज्य सर्वात महत्वाचे आहे कारण हे सर्वात मोठे हिंदी भाषक राज्य आहे. त्याचप्रमाणे लोकसभेच्या सर्वाधिक जागा (८०) याच राज्यात आहेत. भाजप पराभूत झालेल्या तिन्ही राज्यांच्या सीमा या सर्वात मोठ्या राज्याला लागून आहेत. त्यामुळे या पराभवाचा परिणाम उत्तर प्रदेशावर होणार आहे ही बाब अटळ आहे. भाजप नेतृत्वाच्या चिंतेचे आणखी एक कारण म्हणजे २०१४च्या लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशात पक्षाने ८० पैकी ७३ जागा जिंकण्याचा

## ASSEMBLY ELECTIONS 2018 RESULT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **MADHYA PRADESH** | BJP | CONG+ | BSP | OTHERS |
| TOTAL SEAT: 230<br>MAJORITY:116 | 109 | 114 WIN! | 02 | 05 |
| **RAJASTHAN** | BJP | CONG+ | BSP | OTHERS |
| TOTAL SEAT: 199<br>MAJORITY:100 | 73 | 99 WIN! | 06 | 21 |
| **TELANGANA** | BJP | CONG | TRS | OTHERS |
| TOTAL SEAT: 119<br>MAJORITY:60 | 01 | 21 | 88 WIN! | 09 |
| **CHHATTISGARH** | BJP | CONG | BSP+ | OTHERS |
| TOTAL SEAT: 90<br>MAJORITY:46 | 15 | 68 WIN! | 0 | 07 |
| **MIZORAM** | BJP | CONG | MNF | OTHERS |
| TOTAL SEAT: 40<br>MAJORITY:21 | 01 | 05 | 26 WIN! | 08 |

सामान्य नाही. त्यामुळेच या पराभवानंतर चाणक्य म्हणून उपाधि मिरविणारे अमित शहा सूक्ष्मात गेले. या पराभवावर त्यांनी चकार शब्दाने देखील टिप्पणी केली नाही किंवा मतप्रदर्शन केले नाही. महानायक मोदी यांनी १ तारखेला जी मुलाखत दिली त्यात ओझरत्या व शब्दांची काटकसर करुन प्रतिक्रिया दिली. छत्तीसगढमध्ये निर्णायक पराभव झाला पण राजस्थान व मध्य प्रदेशात सत्तारूढ पक्षाला पूर्ण बहुमत मिळालेले नाही असे सांगून त्यांनी त्यांच्या संकुचित मनोवृत्तीचे दर्शन घडविले. एवढेच नव्हे तर हरयानातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला कसा विजय मिळाला असे सांगून तीन राज्यातील विक्रम केला होता. त्याचप्रमाणे राजस्थानातील सर्वच्या सर्व म्हणजे २५ जागा जिंकण्याचा विक्रमही भाजपने केला होता. मध्य प्रदेशातही भाजपने २९ पैकी २६ तर छत्तीसगढमध्ये ११ पैकी १० जागा जिंकण्याची जोरदार कामगिरी केली होती. बिहारमध्ये देखील भाजपने २२ जागा जिंकलेल्या होत्या. तर उत्तर प्रदेशातूनच अलग करण्यात आलेल्या उत्तराखंड राज्यातल्या सर्व म्हणजे पाचही जागा भाजपच्याच झोळीत होत्या. संपूर्ण उत्तर भारताचा विचार करायचा झाल्यास भाजपच्या २८२ पैकी जवळपास निम्म्या जागा म्हणजे १४० जागा या हिंदी भाषक राज्यातून मिळाल्या आहेत. या राज्यांमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश,



राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, हरयाना या राज्यांचा समावेश आहे. त्यामुळेच या तीन राज्यातील पराभवाची चिंता भाजपला सतावणे अत्यंत स्वाभाविक आहे. या पराभवाची व्याप्ती आगामी लोकसभा निवडणुकीत अन्य वर उल्लेखित राज्यांमध्ये पसरु नये यासाठी भाजप नेतृत्वाची आता धावपळ सुरु झाली. कारण या राज्यांमधील पक्षाचे संख्या बळ घटल्यास ते अन्य कोणत्या राज्यातून भरुन काढायचे असा यक्षप्रश्न भाजप नेतृत्वापुढे आहे आणि त्यासाठी त्यांनी निरनिराळे उपायही अमलात आणण्यास सुरुवात केली आहे.

या तीन राज्यातील पराभवाचे महत्व कमी लेखून चालणार नाही याची जाणीव भाजप नेतृत्वाला झालेली आहे. ('भाजप-नेतृत्व' हा उल्लेख फक्त आणि फक्त मोदी-शहा जोडीपुरताच मर्यादित आहे कारण या दोघांखेरीज भाजपमध्ये अन्य कुणालाही ना विचारात घेतले जाते ना निर्णय प्रक्रियेत त्यांना सहभागी करुन घेतले जाते. त्यामुळे भाजपचे जे काही आहे ते या दोन नेत्यांमध्येच विभागलेले आहे.) त्यामुळेच या तीन राज्यातील पराभवाला जी कारणे कारणीभूत ठरली ती लक्षात घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीसाठी रणनीती तयार करण्याच्या कामाला हे नेतृत्व लागले आहे. यामध्ये मुख्य भर हा धार्मिक ध्रुवीकरण, त्यासाठी राम मंदिर उभारणीसारखे मुद्दे यांचा समावेश आहे आणि त्याआधारे पक्षाने आपली रणनीती प्रत्यक्षात आणण्यास सुरुवात देखील केली आहे.

तीन राज्यांपैकी राजस्थानातील पराभव हा जवळपास निश्चित असल्याचे मानले जात होते. हा पराभव मुख्यतः मुख्यमंत्री असलेल्या वसुंधरा राजे यांच्याविरुध्द असलेल्या सार्वत्रिक रागातून झाल्याचे प्रामुख्याने मानले जाते. वसुंधरा राजे यांच्या कारकिर्दीत लोकहिताची कामे झाली नाहीत असे नाही. परंतु वसुंधरा राजे यांच्या कार्यशैलीबद्दल विलक्षण नाराजी होती. भाजपच्या संघटनात्मक पातळीवर तर ही नाराजी अत्यंतिक पातळीवर होती कारण वसुंधरा राजे यांनी पक्षसंघटनेला अक्षरशः तुच्छ लेखून



स्वतःची समांतर अशी यंत्रणा तयार केली होती. त्यामुळे भाजपचा परंपरागत कार्यकर्ता व नेते अत्यंत नाराज होते. त्यामुळेच स्थानिक पक्षसंघटना आणि पर्यायाने त्या संघटनेच्या प्रभावाखालील मतदार हे वसुंधरा राजे यांच्या विरोधात गेले. 'मोदी तुझसे बैर नही, वसुंधरा तेरी खैर नही' ही जी घोषणा राजस्थानात देण्यात आली, त्यावरुन वसुंधरा राजे यांच्या विरोधातील भावना किती विकोपाला गेली होती याची कल्पना येईल. मतदारांचा मोदींवर राग नव्हता तर वसुंधरा राजे यांना त्यांनी रागाचे लक्ष्य केले होते. वसुंधरा राजे यांनी जनमानसातील नाराजी दूर करण्याचे प्रयत्न केले परंतु त्यास खूप उशीर झाला होता. जनसंपर्कासाठी त्यांनी सुरु केलेली यात्रा त्यांना अर्धवट सोडावी लागली होती यावरुनच नाराजीची परिसीमा लक्षात येईल. थोडक्यात राजस्थानातील पराभव गृहीत धरुनच भाजपने निवडणूक लढविली होती. कार्यकर्त्यांना काँग्रेसपेक्षा वसुंधरा राजे यांना धडा अधिक शिकवायचा होता. कार्यकर्ते व पक्षसंघटनेची समजूत काढण्याचे पक्षनेतृत्वाने प्रयत्न केले परंतु वसुंधरा राजे यांच्याविरुध्दची नाराजी अधिक प्रभावी ठरली. कार्यकर्त्यांनी मनापासून पक्षाला साथ दिली नाही. भाजपमधील या सुंदोपसुंदीचा जनमानसावर परिणाम होणे अटळ होते. लोकांना लहरी राज्यकारभाराचा कंटाळा आलेला होता. परिणामी लोकांनी काँग्रेसच्या बाजूने अपेक्षित कौल दिला. येथे ही बाब मान्य करणेही योग्य ठरेल की राजस्थानात काँग्रेसला एकतर्फी विजय मिळेल असे भाकित केले जात होते. परंतु भाजप नेतृत्वाने अखेरच्या टप्प्यात लावलेला जोर कामाला आला. काँग्रेसला निसटत्या बहुमतावरच समाधान मानावे लागले. राजस्थानात कोणतेही सरकार पाच वर्षे टिकते व पाच वर्षानंतर परिवर्तन होते व हे चक्र दीर्घकाळ चालू आहे याकडेही भाजपतर्फे लक्ष वेधून स्वतःच्या पराभवाचे समर्थन केले जात आहे.









मध्य प्रदेशात भाजप नेतृत्वाला पराभवाची अपेक्षा नव्हती. याची काही साधार कारणेही होती. काँग्रेस पक्षात

एकजुटीचा अभाव होता. जे तीन-चार प्रमुख नेते होते त्यांच्यातील मतभेद जगजाहीर होते. तरीही काँग्रेसने जोर लावलेला होता. लोकांसमोर तरी पक्षाने एकजुटीचे दर्शन घडविले. त्याचे फळ काँग्रेसला मिळाले. या राज्यात गेली पंधरा वर्षे भाजपचेच सरकार सत्तेत आहे. त्यामुळे ज्याला 'अँटि इन्कम्बन्सी' म्हणतात म्हणजे दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने जनतेत निर्माण होणाऱ्या नाराजीचा घटक हा मध्य प्रदेशात प्रभावी होता. मुख्यमंत्री असलेले शिवराजसिंग चौहान यांच्याबद्दल नाराजी नसली तरी त्यांच्या घोषणा आणि प्रत्यक्षातील अंमलबजावणी यात तफावत होती. त्याचप्रमाणे शेती आणि शेतकरी यांच्याबाबत त्यांच्या सरकारला परिणामकारक धोरणे व निर्णय अमलात आणण्यात मोठे अपयश आलेले होते. मंदसोर येथे शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन झाले होते आणि त्यावेळी सुमारे बारा शेतकऱ्यांचा पोलिस गोळीबारात मृत्यु झाला होता. त्या घटनेने शेतकऱ्यांमधील असंतोष वाढत गेला हे निश्चित दिसून येत होते. परंतु त्याचे निराकरण करण्यात शिवराजसिंग चौहान यांना यश आले नाही. त्याचबरोबर भाजप नेतृत्वाकडून गोरक्षणाच्या मुद्याचा जो गाजावाजा करण्यात आला त्याचे नुकसानही भाजपला कसे झाले याचे एकच उदाहरण पुरेसे आहे. गोरक्षणामुळे मोकाट गायींचा उपद्रव इतका होता की या गायींचे झुंडच्या झुंड गावागावात मोकाट फिरु लागले. असंख्य शेतकऱ्यांच्या उभ्या पिकात घुसून



या गायींच्या झुंडींनी पीक फस्त करणे व त्याची नासाडी करण्याचे प्रकार केले. शेतकऱ्यांना आगतिकपणे हे नुकसान सोसावे लागले कारण गायीला हात लावला तर मोकाट गोरक्षकांच्या झुंडीही तयारीतच होत्या. असंख्य शेतकऱ्यांनी भाजपच्या या गोरक्षणाच्या अतिरेकाबद्दल अत्यंत तीव्र भावना व्यक्त केल्याच परंतु त्याबद्दल या पक्षाला धडा शिकविण्याची गरजही बोलून



दाखवली. शिवराजसिंग चौहान हे तसे जमीनीवर पाय असलेले नेते आहेत परंतु ते पक्षाच्या गोरक्षण अतिरेकाला आळा घालू शकले नाहीत. त्यात त्यांचा राजकीय बळी गेला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सारांशाने एवढेच नमूद करता येईल की शेती व शेतकऱ्यांमधी व्यापक असंतोष हे मध्य प्रदेशातील भाजपच्या पीछेहाटीचे प्रमुख कारण ठरले. याच्याच जोडीला मध्य प्रदेशातील उच्चवर्णीय समाजाने भाजपकडे पाठ फिरवली हेही पराभवाचे एक प्रमुख कारण मानले जाते. अनुसूचित जाति–









जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील जाचक तरतुदी रद्द करण्याबाबत न्यायालयाने संकेत दिल्यानंतर केंद्र सरकारने संसदेमार्फत ते अधिकार या समाजांना पुन्हा बहाल करण्याच्या निर्णयाची प्रतिकूल प्रतिक्रिया उच्चवर्णीयांमध्ये निर्माण झाली आणि त्याचाही फटका भाजपला बसला.

यामध्ये आणखी एका मुद्याचा उल्लेख करावा लागेल. तो या तिन्ही राज्यांना लागू आहे. सर्वसाधारणपणे मुख्यमंत्र्याकडे प्रचाराची सूत्रे सोपवण्यात येत असतात. या तिन्ही राज्यात भाजप नेतृत्वाने स्थानिक नेतृत्वावर वरचष्मा गाजविण्याची भूमिका घेतली. त्याची परिणिती स्थानिक नेतृत्वाच्या नाराजीत झाली. स्थानिक नेतृत्वाचा तेथील स्थानिक परिस्थितीशी थेट संबंध असतो आणि त्यांच्याकडे असलेली माहिती ही अधिक विश्वसनीय असते व त्याआधारे प्रचाराची आखणी आवश्यक असते आणि त्यानुसार कोणत्या ठिकाणी कोणत्या मुद्याला महत्व द्यायचे याचे आकलन नेतृत्वाला त्या माहितीच्या द्वारे होत असते. परंतु धार्मिक ध्रुवीकरण केले की आपले सत्तेत येण्याचे इप्सित साध्य होईल असा साधा सरळ हिशोब भाजप नेतृत्वाने मांडून त्याआधारे रणनीती आखली. परिणामी स्थानिक मुद्दे दुय्यम ठरले आणि जनतेने त्याची शिक्षा पक्षाला दिली. त्यामुळे कॉंग्रेसने ज्या हुशारीने मोकाट गायींसाठी स्वतंत्र गोशाळा स्थापनेचा मुद्दा जाहीरनाम्यात समाविष्ट केला तो शेतकऱ्यांना व ग्रामीण भागातील मतदारांना अधिक जवळचा व आपलासा वाटला. त्यामागे धार्मिक भावनेपेक्षा मोकाट गायींच्या उपद्रवापासून जनतेचे संरक्षण करण्याचा व्यावहारिक मुद्दा होता व तो मतदारांना पटला होता.

या उलट भाजपने प्रचारात केवळ तीनच स्टार प्रचारक ठेवले व ते म्हणजे पंतप्रधान, भाजप अध्यक्ष आणि उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी महाराज आदित्यनाथ ! या तिघांचा भर स्थानिक मुद्यांपेक्षा राजकीय मुद्यांवर अधिक राहिला. मोदी व शहा यांनी कॉंग्रेस, गांधी परिवार यांच्याविरुध्द आपला प्रचार केंद्रित केला. तर योगी महाराजांनी हिंदुत्वाच्या आधारे प्रचार केला. हे सर्व मुद्दे उपरे ठरले. ध्रुवीकरण राहिले दूर, भाजपबद्दल सहानुभूती बाळगणारेही दूर गेले व पक्षावर पराभवाची पाळी आली. छत्तीसगढमध्ये तर योगी महाराजांनी सर्वाधिक सभा घेतल्या आणि त्यांच्या भाषणांमध्ये हिंदुत्व आणि कॉंग्रेस व गांधी परिवाराला

मनसोक्त नावे ठेवण्याचेच मुद्दे असत. परिणामी त्यांनी जेथे जेथे सभा घेतल्या तेथेतेथे भाजपचे उमेदवार हरले. मोदी यांनी देखील गांधी परिवारावर टीका करताना पातळी सोडणारी भाषा वापरली व तिचा प्रतिकूल परिणाम मतदारांवर झाला. माहीतगार गोटातून समजलेल्या माहितीनुसार नाराज झालेल्या शिवराजसिंग चौहान यांनी रा.स्व.संघ नेतृत्वाकडे हा मुद्दा मांडला आणि मध्य प्रदेशातल्या मतदारांनी मोदी व शहा यांच्या गांधी कुटुंबाविरोधी वक्तव्याची बाब पसंत केली नसल्याचे सांगितले असे समजते. असेही समजते की मध्य प्रदेशातील प्रचाराची सूत्रे आपल्यावर सोपविण्यात आली असती तर आपण बहुमत प्राप्त केले असते असेही शिवराजसिंग यांनी आपली नाराजी व्यक्त करताना म्हटले.

छत्तीसगढमध्ये देखील यापेक्षा वेगळी कहाणी नव्हती. छत्तीसगढमध्ये योगी आदित्यनाथ यांनी सर्वाधिक सभा घेतल्या. भाजपचा निर्णायक पराभव छत्तीसगढमध्ये झाला. असे का झाले ? छत्तीसगढमध्ये गेली पंधरा वर्षे भाजपचे सरकार होते. रमणसिंग हेच गेली पंधरा वर्षे मुख्यमंत्रीपदी होते. छत्तीसगढमध्ये काँग्रेसदेखील एक मजबूत राजकीय पक्ष आहे. कारण गेल्या तिन्ही निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि भाजपच्या मतांमधील तफावत ही एक टक्क्याच्या आसपास राहिलेली आहे. त्यातही काँग्रेसमध्ये त्यावेळी असलेले माजी मुख्यमंत्री अजित जोगी यांची भूमिकाही संशयास्पद व वादग्रस्त राहिलेली होती. परंतु जोगी हे काँग्रेसबाहेर गेले आणि आपोआपच काँग्रेसचा त्यांच्यापासून पिच्छा सुटला. ती बाब काँग्रेसच्या फायद्याची ठरली. भाजपच्या बाजुने सांगायचे झाल्यास रमणसिंग यांच्या राज्यकारभाराची सारी भिस्त नोकरशहांकडे हस्तांतरित होत गेली. त्याचप्रमाणे रमणसिंग यांचे कुटुंबिय आणि नातेवाईक यांचा राज्यकारभारातील हस्तक्षेपही वाढत गेला. थोडक्यात राज्यकारभार व प्रशासन यांची मनमानी वाढत गेली आणि सर्वसामान्य जनतेच्या मुद्यांच्या सोडवणुकीपासून प्रशासन तुटत गेले व भरकटत गेले. त्यामुळेच अल्पकिमतीत गरीबांना तांदूळ पुरविण्याच्या योजनेतील भ्रष्टाचार वाढत गेला. त्यामुळेच लोकांचा सरकारविरुध्दचा असंतोष वाढत गेला. रमणसिंग यांचे नेतृत्व किंकर्तव्यमूढ व निष्क्रिय होत गेले आणि त्या रागाची एवढी परिसीमा झाली की मतदारांनी भाजपच्या विरोधात एकतर्फी मतदान करुन धडा शिकविला. रमणसिंग हेही





भाजप नेतृत्वावर अवलंबुन राहिले आणि स्थानिक मुद्यांकडे त्यांनी दुर्लक्ष करुन पराभवओढवून घेतला.



या तीन राज्यातील निवडणुका या आगामी लोकसभा निवडणुकीसाठी 'पूर्व परीक्षा' किंवा 'उपांत्य फेरी' सारख्या मानल्या गेल्या. बहुधा त्यामुळे असेल भाजप नेतृत्वाने वेगळ्या स्वरुपाची रणनीती आखली आणि या निवडणुका राष्ट्रीय निवडणुका असल्यासारखेल मानून राष्ट्रीय नेते आणि मुद्दे यांचा आधार घेतला. परिणामी मिळायची ती शिक्षा पक्षाला मिळाली. त्याचप्रमाणे आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून कोणत्या मुद्यांवर भर दिला जाईल हेही यानिमित्ताने स्पष्ट झाले. भाजपने राम मंदिरापासून इतर सर्व धार्मिक ध्रुवीकरणाचे मुद्दे या निवडणुकीत वापरले. अगदी तिहेरी तत्काळ तलाकचा मुद्दा देखील त्यांनी हिंदू मतांसाठी वापरला. तीन तलाकचा मुद्दा हिंदू मतांसाठी वापरण्याचा अर्थ स्पष्ट आहे. आमचे सरकार मुस्लिम समाजाला कसे वठणीवर आणते हा मुद्दा ठसविण्यासाठी या निर्णयाचा वापर केला जात आहे. त्यामागे मुस्लिम महिलांना न्याय देण्याची भूमिका कितपत आहे हा वादाचा मुद्दा ठरेल. थोडक्यात भाजपनेतृत्वाने राष्ट्रीय मुद्यांची चाचणी या तीन राज्यात घेण्याचा प्रयत्न केला पण त्यात ते सपशेल अपयशी ठरले. आता त्यांनी याच मुद्यांच्या आधारे लोकसभेच्या निवडणुकीला सामोरे जाण्याचे ठरविले आहे. परंतु हे मुद्दे त्यांना कितपत यश देऊ शकतील याबद्दल शंका निर्माण झाल्या आहेत. याचे कारण या मुद्यांना जनतेने नाकारल्याचे स्पष्ट झाले आहे. उलट शेती व शेतकरी यांच्यावर आलेल्या संकटाचा मुद्दा अधिक प्रभावी ठरताना आढळत आहे. मध्य प्रदेशात अद्याप सत्तर टक्के भाग ग्रामीण व शेतीशी निगडित आहे आणि साधारणपणे उत्तर भारतातील बहुतेक राज्यांमध्ये हीच परिस्थिती आढळत असल्याने हा मुद्दा




लोकसभा निवडणुकीतही महत्वपूर्ण ठरण्याची चिन्हे आहेत. त्यामुळेच केंद्र सरकारतर्फे लवकरच शेतीसाठी भव्यदिव्य योजना जाहीर केली जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामध्ये शेतकऱ्यांना 'निश्चित आय' (फिक्स्ड इन्कम) म्हणजेच प्राप्तीची तरतूद असल्याचे समजते. किंवा शेतकऱ्यांना पेन्शन देण्याचा प्रस्तावही यात असल्याची चर्चा ऐकू येत आहे. थोडक्यात तीन राज्यांच्या या निवडणुकीतील पराभवानंतर सरकारने त्यांच्या रणनीतीत केलेल्या बदलाचे हे संकेत आहेत.



विरोधी पक्षांनी भाजपच्या विरोधात केलेल्या आघाडीचे स्वरुप पाहता समाजातील महत्वाचे समूह त्या आघाडीशी निगडित होताना आढळत आहेत. ओबीसी म्हणजेच अन्य मागासवर्गीय, दलित, अल्पसंख्यक समूहांचा कल विरोधी आघाडीकडे आढळून येऊ लागला आहे. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशात भाजपने योगी आदित्यनाथ या राजपूत किंवा ठाकूर समाजाच्या नेत्याकडे मुख्यमंत्रीपद दिल्याने सुमारे बारा ते तेरा टक्के असलेला ब्राह्मण समाज भाजपवर प्रचंड नाराज आहे कारण योगी महाराजांनी त्यांच्या समाजाला प्राधान्य दिलेले आहे. तसेच उत्तर प्रदेशात परंपरागत रीतीने ठाकूर व ब्राह्मण हे बरोबरीने नांदू शकत नाहीत

अशी स्थिती आहे. त्यामुळे येत्या लोकसभा निवडणुकीपर्यंत भाजपने यात दुरुस्ती न केल्यास त्याची किंमत पक्षाला मोजावी लागण्याची चिन्हे आहेत. जे मध्य प्रदेश, राजस्थानात घडले तेच उत्तर प्रदेशात व इतरत्र घडल्याखेरीज राहणार नाही. तीन हिंदी भाषक राज्यातील विधानसभा निवडणुका, त्यांची फलनिष्पत्ती व त्यांचा अन्वयार्थ साधारणपणे असा आहे.


तेलंगणामध्ये निकाल अपेक्षित होता तसाच लागला. तेलंगणा निर्मितीच्या श्रेयाचे जोरदार भांडवल किंवा मार्केटिंग मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांनी केले आणि त्यात ते यशस्वी झाले. काँग्रेसने रणनीतीच्या दृष्टीने घोडचूक केली आणि तेलगु देशम पक्षाबरोबर हातमिळवणी केली. एकीकडे तेलंगणाच्या निर्मितीचे श्रेय घेणे आणि दुसरीकडे तेलंगणा निर्मितीला विरोध केलेल्या तेलगु देशम पक्षाबरोबर निवडणूक समझोता करणे अशा परस्परविरोधी राजकारणात काँग्रेसने स्वतःचे हसे करुन घेतले. तेलंगणा निर्मितीचे श्रेय सोनिया गांधी यांच्या निर्णयाला असल्याचे चंद्रशेखर राव हेही मान्य करतात परंतु तेलगु देशमबरोबर आघाडी केल्याने सोनिया गांधी यांनी अपवाद म्हणून तेलंगणात केलेल्या सभाही काँग्रेसला मते व जागा मिळवून देऊ शकल्या नाहीत. येथे देखील काँग्रेसने राष्ट्रीय पातळीवरील आघाडी राजकारणाचा भाग म्हणून तेलगु देशमबरोबर स्वतःचे नुकसान करुन घेऊन आघाडी केली व त्याची किंमत मोजली. यामध्ये चंद्रशेखर राव यांना संजीवनी मिळाली. आता त्यांनी त्यांचे पुत्र के.टी.रामाराव यांना राजकीय वारस नेमून स्वतःकडे राष्ट्रीय राजकारणाची भूमिका घेतल्याचे जाहीर केले आहे. आता ते बिगर भाजप व बिगर काँग्रेस आघाडीच्या प्रयत्नाला लागले असले तरी त्यांची विश्वासार्हता फारशी नाही. त्यांच्याकडे भाजपचे हस्तक म्हणूनच पाहिले जात असल्याने त्यांच्या प्रयत्नांना फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे आढळून आले आहे.

मिझोरममध्ये काँग्रेसची गेली पंधरा वर्षे सत्ता होती. त्याठिकाणी भाजपने प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु हे ख्रिश्चन बहुसंख्यक राज्य असल्याने भाजपची तेथे डाळ शिजू शकली नाही. काँग्रेसचा प्रमुख प्रतिस्पर्धी असलेला मिझो राष्ट्रीय आघाडी हा पक्ष तेथे यशस्वी झाला. या पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले. मुख्यमंत्री झोरमथांगा यांनी भाजपला राज्यात फारसे स्थान नाही व तो पक्ष दिल्लीतच योग्य असल्याचे सांगून त्यांची जागा दाखवून दिली.

पाच राज्यातल्या निवडणुकांचे हे फलित आहे. काँग्रेसला नवचैतन्य प्राप्त करणाऱ्या या निवडणुका ठरल्या आणि त्यामुळे लोकसभा निवडणकीसाठी हा पक्ष नव्या उमेदीने उभा राहिला आहे. काँग्रेसने या विजयानंतर आघाडीचे राजकारण करताना वर्चस्ववादी भूमिका न घेता सर्व समविचारी पक्षांना सामावून घेण्याची भूमिका ठेवल्यास २००४ची पुनरावृत्ती होणे अशक्य नाही. त्यादृष्टीनेही या निवडणुकांमधील काँग्रेसच्या यशाचे महत्व आहे. हे यश टिकवितानाच लोकसभेत त्याआधारे पुढची लांब उडी घेण्याची तयारी करण्याचा सराव या निवडणुकांमुळे झाला आहे. आता मैदान २०१९ लोकसभा निवडणूक!







**श्री. प्रशांत हिरे, अद्वैत हिरे व आमदार अपूर्व हिरे या नाशिक जिल्ह्यातील नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार, छगन भुजबळ व जयंत पाटील यांच्या उपस्थितीत मुंबईमध्ये झालेल्या समारंभात भाजपला सोडून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. याप्रसंगी श्री. हिरे यांचे स्वागत करताना श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण.**

# दत्तकाच्या जोरावर आम्ही

## राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा

स्वातंत्र्याच्या चळवळीतील नाशिक जिल्ह्याचा जर आपण इतिहास बघितला तर, स्वातंत्र्याच्या चळवळीत महाराष्ट्रातील जे जिल्हे अग्रभागी राहिले, त्याच्यात नाशिक जिल्ह्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकांच्या जीवनात बदल करण्याचा स्वातंत्र्याचा अर्थ समजून देण्याचा व महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम कै. भाऊसाहेब हिरे यांनी केले. भाऊसाहेबांनी राजकारणात काम केले, सहकारात काम केले, शैक्षणिक क्षेत्रात काम केले, समाजकारणात काम केले आणि एक प्रकारे सर्वच क्षेत्रात चांगले नेतृत्व दिले, सर्वसामान्य माणसाला आधार देण्याचे काम केले. याची नोंद महाराष्ट्राच्या इतिहासात झालेली आहे. नंतरच्या काळात हा जिल्हा सतत पुढे राहिलेला आहे. सामाजिकदृष्ट्याही हा जिल्हा पुढे राहिला आहे. ज्या महामानवाचे आपण नेहमी स्मरण करतो, त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काळराम मंदिर प्रवेशासाठी केलेल्या सत्याग्रहातून समाजाला दृष्टी देण्याचे काम केले तेही याच नाशिक जिल्ह्यामधून! अनेक क्षेत्रांमध्ये नाशिकने महाराष्ट्राचा नावलौकीक वाढवला आहे. चीन आक्रमणानंतर भारतातील स्थिती सावरण्यासाठी त्या कालखंडात जवाहरलाल नेहरूंनी यशवंतराव चव्हाण यांना निमंत्रण देऊन संरक्षण खात्याची जबाबदारी सोपवली आणि यशंवतरावांना लोकसभेत पाठविण्याचा अंतिम निकाल हा नाशिक जिल्ह्यानेच केलेला आहे.

अशा अनेक गोष्टी आहेत, ज्यात महाराष्ट्राच्या उभारणीत नाशिक जिल्ह्याने मोलाची कामगिरी बजावली आहे. मोलाची कामगिरी करण्यासाठी नेतृत्व लागते आणि नेतृत्वाचा पाया घालण्याचे काम हे भाऊसाहेबांनी केले. भाऊसाहेबांच्या नंतर व्यंकटरावांनी व त्यांच्यानंतर तेच काम पुष्पाताई यांनी केले आणि त्यानंतर अपूर्व व तिसऱ्या पिढीने त्याच विचाराने आपल्याबरोबर उभे राहण्याची मनस्थिती दाखवली. या ठिकाणी त्यांनी दुसऱ्या पक्षातले त्यांचे अनुभव सांगितले. वास्तविक पाहता ते अनुभव



# आमचे घर चालवत नाही

## महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टोला

सांगण्याची काही आवश्यकता नव्हती. हिरे कुटुंबीयांची विचारसरणी व दुसऱ्या पक्षाची विचारसरणी ही जुळून न येणारी गोष्ट आहे. त्यामुळे तो एक अपघात होता, असे समजून विसरून जायचे. आता त्या अपघातातून आपली गाडी पुन्हा एकदा योग्य रस्त्याने नेण्याचे काम अपूर्वच्या मार्गदर्शनाखाली सुरू केले आहे. याचा मला मनापासून आनंद आहे.

जिल्हा शेतीच्या क्षेत्रात पुढे जात आहे. आज सबंध देशात फळबागांच्या संदर्भात क्रांती केलेल्या जिल्ह्यांमध्ये नाशिकचा उल्लेख केला जातो. या सगळ्या कामाकडे माझे बारकाईने लक्ष असते. नाशिकला मिनी बाजारपेठ व्हावी, म्हणून गेल्या काही दिवसांपासून प्रयत्न होते. बऱ्याच लोकांना माहिती नसेल, आम्ही चीनमधील एका व्यापारी शिष्टमंडळाला बोलावले होते. शेतीमालाबद्दल आस्था असलेल्या चीनच्या व्यापाऱ्यांची एक बैठक आम्ही मुंबईला घेतलेली होती. आपल्या जिल्ह्यातले द्राक्ष उत्पादक आणि चीनचे व्यापारी यांची एक संयुक्त बैठक भारतीय एम्बसीच्या मदतीने मुंबईत घेतली होती आणि मला सांगण्यास आनंद होत आहे की, त्या बैठकीचा अहवाल जो माझ्याकडे आला, त्यानुसार द्राक्ष खरेदीबाबतचा करार करण्याची तयारी चीनच्या व्यापारी संघटनेने केलेली आहे. एवढेच नव्हे तर, चीनच्या व्यापारी संघटनेने सांगितले, नाशिकच्या दुष्काळी भागात डाळिंबाचेही उत्पादन चांगले होते. तेव्हा डाळिंब उत्पादकांबरोबरही आमची बैठक होऊ द्या. आम्ही डाळिंबाचीही खरेदी करण्यास उत्सुक आहोत, असे त्यांनी सांगितले.

सांगण्याचे तात्पर्य असे की, जो जिल्हा फक्त फुलांच्या निर्यातीसाठी ओळखला जात होता, येथून गुलाबाची फुले परदेशात जात होती. त्या जिल्ह्यातून आता फळे जायला लागली, द्राक्षे जायला लागली, डाळिंबे जायला लागली. त्यामुळे आज आपण कांदा एके कांदा करीत न बसता कांद्याच्याही पुढे जाण्याची गरज आहे. कांद्याची बाजारपेठ, एक काळ असा होता की, श्रीलंकेला नाशिक जिल्ह्यातून कांदा जायचा. श्रीलंका

# दुष्काळाबाबत केंद्र व राज्यसरकार गंभीर नाही

## शरद पवार यांची तीव्र नाराजी



राज्यात दुष्काळाबाबत केंद्र सरकारची मदत मागत असताना वस्तुस्थिती काय आहे हे केंद्राला सांगायला लागत आहे आणि तेव्हा केंद्रसरकार पथक पाठवत आहे. त्यामुळे केंद्र व राज्यसरकार याबाबत गंभीर नसल्याचे स्पष्ट होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी केला. नाशिकमधील माजी मंत्री प्रशांत हिरे, माजी आमदार अपूर्व हिरे या भाजपच्या नेत्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. यावेळी मिडियाने



दुष्काळी पथकाच्या दौऱ्याबाबत विचारले असता शरद पवार यांनी केंद्र आणि राज्याच्या दुष्काळी प्रश्नाबाबत असलेल्या अनास्थेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. दुष्काळ पाहणीसाठी आलेले पथक रात्रीची पाहणी करत आहे. राज्य सरकार हव्या त्या योजना करताना दिसत नाही असे सांगतानाच आघाडी सरकार होते तेव्हा मी स्वतः दुष्काळी भागाचा दौरा केला होता. माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांनी तातडीने मदत केली होती. मात्र हे सरकार दुष्काळप्रश्नी गंभीर नाही असे दिसत आहे असेही शरद पवार म्हणाले.

व आजूबाजूच्या देशांना नाशिकहून कांदा जायचा. संपूर्ण हिंदुस्थानला तर कांदा आपण पुरवतच होतो. पण, राज्यकर्त्यांनी काही धोरणे स्वीकारली. जीवनावश्यक वस्तूंच्या यादीतून काही गोष्टी कमी केल्या. आणि त्याचा फटका उत्पादक शेतकऱ्याला बसला आहे. कांदा उत्पादक हा बागाईत शेतकरी नसून तो जिराईत शेतकरी आहे. पावसाळ्यात एखादा दुसरा पाऊस पडतो व त्या एखाद्या दुसऱ्या पिकावर त्याचा संसार चालतो. ते पिक संकटात आले तर, संपूर्ण जिराईत शेती संकटात येते.

आत्ताच भुजबळ साहेबांनी सांगितले, कांद्याला ५० पैसे, ५१ पैसे असा भाव ऐकायला मिळतोय. एक प्रकारे ही आपल्या सगळ्यांची लूट आहे. ही लूट असतानासुद्धा ज्यांनी आम्ही दत्तक घेतो असे सांगितले, त्या सगळ्या पालकांना यत्किंचितही चिंता



भाजपामधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या प्रशांत हिरे यांचा पुष्पगुच्छ देऊन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील स्वागत करताना शेजारी अपूर्व हिरे, शरद पवार, छगन भुजबळ व पंकज भुजबळ.

राहिलेली नाही. कोणीतरी सांगितले, मी जिल्हा दत्तक घेतो. अरे, आमचे बापजादे, वडिल अजून आहेत, आम्हाला सांभाळायला. आम्हाला बाहेरचे दत्तक लागत नाहीत. बाहेरच्या दत्तकाच्या जोरावर आम्ही आमचे घर चालवत नाही. आम्ही स्वकष्टाने, स्वकर्तृत्वावर आमचे घर चालवतो. आम्हाला माहिती होते की, हे दत्तक विधान हे काही टिकणारे नाही. त्याचा अनुभव रोज आपल्याला येतोय. आपल्याला दत्तक बापावर अवलंबून राहण्याची गरज नाही. आपला खरा बाप आहे शेतीतील माल! आपले प्रश्न आपणच सोडवू. आता इतरांवर अवलंबून राहायचे नाही, ही भूमिका घेऊन पुढची पावले टाकायची आहेत. ही पावले टाकण्यासाठी गेली २-३ वर्षे भुजबळांची गैरहजेरी ही अडचणीची झाली. आता भुजबळ आपल्या पाठिशी मजबुतीने उभे आहेत. आम्ही सर्व सहकारीही भुजबळांच्या पाठिशी ठामपणे उभे आहोत. त्यामुळे सामाजिकदृष्ट्या जिल्ह्याचे चित्र, प्रगतीच्यादृष्टीने शेतीचे क्षेत्र असो, औद्योगिक क्षेत्र असो, या सगळ्या क्षेत्रांत नाशिकचा नावलौकीक अधिक गतीने वाढेल, असा विश्वास बाळगून त्या कामाला आमचे सहकारी, संघटनेच्या माध्यमातून आपल्या पाठिशी राहतील, असा विश्वास मी देतो.

# इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता अंमलबजावणी करा : शरद पवार यांची मागणी




कोर्टात जाण्याचा अधिकार सर्वांना आहे. एखादया व्यक्तीला एखादी गोष्ट पटली नाही तर त्यावर भूमिका मांडण्याचा त्याला अधिकार आहे. राज्यसरकारने ज्या आधारावर निर्णय घेतला त्या आधारावर आपलं म्हणणं कोर्टात मांडेल. आमचं एकच म्हणणं आहे आतापर्यंत ज्या वर्गाच्या हिताची जपणूक करताना जे काही निर्णय घेतले गेले आहेत त्याला जराही धक्का न लावता तो पूर्णपणे प्रोटेक्ट करुन हा जो काही नवीन वर्ग आहे त्याला १६ टक्के देण्याची अंमलबजावणी सरकारने करावी आणि सामाजिक तणाव निर्माण होईल अशी अडचण कुणीही निर्माण करु नये अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी मांडली.

नाशिकमधील माजी मंत्री प्रशांत हिरे, माजी आमदार अपूर्व हिरे या भाजपच्या नेत्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. त्यावेळी मिडियाने विचारलेल्या मराठा आणि मुस्लिम आरक्षणाबाबत शरद पवार बोलत होते. माझ्या वाचनात आले सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष ते स्वत: भाषण ऐकले आहे ते त्यामध्ये म्हणाले आहेत की,५० टक्क्याच्यावर देता येत नाही.आता राज्याच्या मुख्यमंत्र्यांची परीक्षा आहे. पक्षाच्या अध्यक्षांनी घेतलेली भूमिका त्याला विरोध करुन इथे वेगळी भूमिका घेण्याचे धाडस मुख्यमंत्री दाखवतात की नाही याकडे आमचे लक्ष आहे असेही शरद पवार म्हणाले.

## मुस्लिम आरक्षण हे दिलेच पाहिजे

आज या देशामध्ये शैक्षणिकदृष्टया, सामाजिकदृष्टया, आर्थिकदृष्टया अतिशय मागासलेले हे घटक आहेत. त्याच्यामध्ये मुस्लिमांच्यासंबंधी विचार करावाच लागेल. त्यादृष्टीने पूर्वीच्या सरकारने आरक्षण देण्याच्यादृष्टीने निर्णय घेतला होता. कोर्टामध्ये त्यागोष्टीला मान्यता मिळाली. मात्र आज हे सरकार धर्माच्या आधारे देणार नाही असे बोलत आहेत. धार्मिक आणि या अन्य धार्मिकतेबाबत एक वेगळी भावना भाजपाच्या नेतृत्वाच्या मनात आहे हे राष्ट्रीय ऐक्याला अनुकूल अशी भूमिका नाही आणि हा अन्याय करणारा आहे. येत्या काळात मुस्लिम, धनगर समाजाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार असल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

# आगामी निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातून पवार साहेबांना मोठी ताकद देऊ

## छगन भुजबळ यांची ग्वाही



आज मोठा आनंदाचा दिवस आहे. हिरे कुटुंबीय परत आपल्या घरी येत आहेत. हिरे कुटुंबीयाला फार मोठा सामाजिक व राजकीय इतिहास आहे. भाऊसाहेब हिरे, व्यंकटराव हिरे, पुष्पाताई हिरे यांनी कधीना कधी मंत्रिमंडळात मंत्री म्हणून, लोकप्रतिनिधी म्हणून काम केले आहे. भाऊसाहेब हिरे हे केवळ नाशिकमध्येच नाही तर, महाराष्ट्राच्या राजकारणात...संयुक्त महाराष्ट्राच्या आधी व नंतर ज्या ज्या नेत्यांचा उल्लेख केला जातो, त्यात भाऊसाहेब हिरे यांचे नाव प्रकर्षाने घेतले जाते. एक काळ असा होता की, भाऊसाहेबांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठीही घेतले जायचे. त्यांनी महाराष्ट्रात सर्वांत महत्त्वाचे कोणते काम केले असेल तर, ते म्हणजे 'कुळ कायदा'! महाराष्ट्रातल्या अनेक नेत्यांनी जे जे चांगले कायदे केले, त्यामध्ये हा कायदा.

शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला शक्ती देण्यासाठी ते आलेले आहेत. मध्यंतरीच्या काळात काही गैरसमज झाले ते झाले. परंतु, हा दुरावा आता संपलेला आहे. नाशिकच्या राजकारणात नवा-जुना असा वाद नाही. पक्षासाठी जो जो काम करेल, त्याच्या पाठिमागे आम्ही समर्थपणे उभे राहतो आहोत. पवार साहेब वाईट काळातही समर्थपणे उभे राहतात, हा अनेकांचा अनेक वर्षांचा अनुभव आहे. म्हणूनच हिरे कुटुंबीयांचे स्वागत करीत असताना मी त्यांना अश्वस्थ करीत आहे. साहेब आज नाशिकची परिस्थिती अडचणीची झाली आहे. नाशिकला सध्या ५१ पैसे किलो कांदा आहे म्हणजे, ५१ रुपये क्विंटल कांद्याचा भाव आहे. त्याच्यात ट्रॅक्टरचे अर्धे भाडेही येत नाही. रास्ता रोको आंदोलनाच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचेच कार्यकर्ते होत. काल दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दुष्काळी पथक येऊन गेले. ज्या शेतकऱ्याने पंतप्रधानांच्या भावानुसार आलेले ३०० रुपये व त्याच्यात स्वत:चे ५४ रुपये टाकून परत पाठवले, त्यांची आता चौकशी सुरू आहे. तुम्ही कोण आहात? कोणत्या पक्षाचे आहात वगैरे वगैरे...मला त्यांना सांगायचे आहे, तो कोणत्याही पक्षाचा का असेना, तो अन्नदाता आहे हे प्रथम लक्षात घ्या. अशा घटना देशात किंवा राज्यात घडतात, तेव्हा ज्याप्रमाणे संकटात पंढरीच्या पांडुरंगाचे नाव आठवते, तसे अशा संकटात फक्त पवार साहेबांचेच नाव आठवते. आमच्यासाठी आपण अनेक वेळा भांडलात. आम्हाला त्यांचाही दृष्टिकोन माहीत आहे तो शहरी मतदार! त्यांच्याबाबतीत ते सकारात्मक असतात. मग ग्रामीण मतदारांचे काहीही झाले तरी चालेल. पण, ग्रामीण जर टिकला तर शहरे चालतील, हे त्यांच्या केव्हा लक्षात येणार? साधे मुंबईचे उदाहरण घेतले तरी, मुंबईचे पाणी नाशिक जिल्ह्यातून येते, मुंबईचे धान्य नाशिक जिल्ह्यातून येते. वीजदेखील मुंबईला महाराष्ट्रातूनच येते. सगळ्या गोष्टी महाराष्ट्रच मुंबईला पुरवते. म्हणून, शहरांची काळजी ही घ्यायलाच पाहिजे, त्याचबरोबर अन्नदात्याचीही काळजी आपण घेतली पाहिजे. माझी खात्री आहे की, नाशिक जिल्हा हा पवार साहेबांवर प्रेम करणारा जिल्हा आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत आम्ही नाशिक जिल्ह्यातून मोठी ताकद मिळवून देऊ असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करतो.

# जनमताचा पाठिंबा असणाऱ्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी वाऱ्यावर सोडत नाही

## जयंत पाटील यांचे उद्‌गार



नाशिक जिल्ह्याचा जर इतिहास आपण पाहिला तर, आपल्या असे लक्षात येईल की, नाशिक जिल्ह्याने पवार साहेबांच्या विचारांना अनेक वर्षे साथ दिलेली आहे. एक काळ असा होता, पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली सर्व लोकप्रतिनिधी निवडून देण्याचे काम या नाशिक जिल्ह्याने केले आहे. नाशिक जिल्ह्यातील शेतीतील कोणताही प्रश्न असो, त्याची जाण, त्याला मदत करण्याची भूमिका, त्या शेतकऱ्यांच्या मागे ताकदीने उभे राहण्याचे काम पवार साहेबांनी गेल्या ४०-५० वर्षांत अनेक वेळा केलेले आहे.

गेल्या आठ दिवसांपूर्वी पवार साहेबांनी माझ्याकडे पहिली चिंता व्यक्त केली, ती म्हणजे, कांद्याचे दर पडल्यामुळे या सगळ्या शेतकऱ्यांच्याबाबतीत आता पुढे काय करायचे? सरकारचे डोळे उघडण्यासाठी काय करायचे, या संदर्भातील पक्षाची भूमिका मांडण्याचे काम पवार साहेबांनी केले.

आज नाशिक जिल्ह्यात ज्या वायनरी बांधलेल्या आहेत व नाशिक जिल्ह्यातील शेतकरी आपला शेतमाल सातासमुद्राच्या पलिकडे पाठवायला लागला आहे. त्या तरुण शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम पवार साहेब करतात. मधल्या काळात भुजबळ साहेब नाशिक जिल्ह्याला काही काळ अपवाद सोडला तर, सतत मार्गदर्शन करीत होते. भुजबळ साहेबांनी पुन्हा एकदा पुढाकार घेऊन जोमाने काम करण्यास सुरुवात केलेली आहे. त्यांनी काही दिवसांपूर्वी आम्हा सगळ्यांना सांगितले की, जिल्ह्यात ताकद वाढविण्यासाठी आम्ही आणखी एक पाऊल टाकणार आहोत. आणि तो काय कार्यक्रम आहे? असे विचारता ते म्हणाले, आजच्या दिवशी होणारा पक्षप्रवेश आहे. पुष्पाताई हिरे यांच्या नेतृत्वाखाली आपण सगळ्यांनी, आम्ही आमदार असताना, त्या राज्याच्या मंत्रिमंडळात असताना, त्यांचे काम जवळून पाहिले आहे. त्या नंतर प्रशांतदादांचे काम आम्ही फार जवळून पाहिलेले आहे. आज अद्वैत आणि अपूर्व या दोन तरुण नेत्यांना पुन्हा आमच्या पक्षात घेताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. आपल्या पक्ष प्रवेशानंतर नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी लोकसभा मतदार संघात अन्य कोणत्याही पक्षापेक्षा, राष्ट्रवादीच्या तेथील कामापेक्षा अधिक सरस हिरे कुटुंबीयांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेशाने होईल, अपूर्व व अद्वैत यांचा व प्रशांत हिरे यांच्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्यानिमित्ताने भेट झाली होती. त्यांचा मनसुबा हा आजचा नाही. वर्षभर त्यांचा या दृष्टीने विचार चालू होता. शेवटी, मुहूर्त लागायला वेळ लागतो. आज मी प्रशांत, अपूर्व व अद्वैत या तिघांचेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मन:पूर्वक स्वागत करतो.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आम्ही तळागाळापासून बांधण्याचे काम करत आहे. अलिकडच्या काळात बूथपर्यंतचे काम आपण अत्यंत प्रभावीरीत्या केले आहे. मला सांगायला आनंद होतो की, कालपर्यंत महाराष्ट्रातील बूथवर नोंद करून १ लाख ८७ हजार कार्यकर्ते काम करीत आहेत. तळागाळापर्यंत राष्ट्रवादीची ताकद आहे, याच्यात कोणाच्याही मनात शंका नाही. आपण भोळेभाबडेपणाने सगळे गाव माझे आहे, असे म्हणायचो. आपले

कार्यकर्ते कार्य करतात, असे आपण सांगायचे. या मानसिकतेत होतो. परंतु, बूथपर्यंत जाऊन बूथचा कार्यकर्ता मतदारांपर्यंत भिडला पाहिजे, ही नव्या जगातली नवी पद्धत सुरू करण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. म्हणून, नव्या पद्धतीने काम करीत असताना, पक्ष पुढे नेत असताना, राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद नाशिक जिल्ह्यात, महाराष्ट्रात वाढली आहे. भुजबळ साहेबांना विनंती करत असतो की, महाराष्ट्रात सगळीकडे फिरा. मुंबईसाठी जास्त वेळ देत आहेत. पण, नाशिक जिल्हा आधी भक्कम करून मग मुंबईसाठी. महाराष्ट्रासाठी जास्त वेळ देतील अशी अपेक्षा आहे.

मी अपूर्व व अद्वैत या दोघांचे पक्षात स्वागत करीत असताना प्रशांतदादांचेही स्वागत करीन. पण, या दोन्ही तरुण मुलांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देत असताना मी त्यांना एवढाच विश्वास देतो, की पक्षामध्ये जास्तीत जास्त काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त संधी द्यावी, या विचाराने तसेच, ज्यांना जनमताचा पाठिंबा आहे, त्यांना हा पक्ष कधीही वाऱ्यावर सोडत नाही हा आपल्या सगळ्यांचा अनेक वर्षांचा अनुभव आहे,  ही पद्धत आपणा सगळ्यांना लागू आहे आणि ती पद्धत पवार साहेबांमुळे आलेली आहे. केवळ नाशिकच नाही तर, महाराष्ट्रातल्या कोणत्याही प्रश्नावर बोलण्याची तयारी असलेल्या, प्रशांत हिरे यांच्या आजोबांपासून जो वसा चालत आलेला आहे, तोच वसा पुढे चालवला जातोय, आज पवार साहेबांच्या साक्षीने अपूर्व, अद्वैत, प्रशांतदादा पक्षात प्रवेश करता आहात. मी आपले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करतो. मधल्या काळात आपण राष्ट्रवादीत नव्हता. आपण पुन्हा आपल्या घरी येण्याचे काम जरी करीत असला तरीही घरी परत येताना जो आपला आनंद आहे, समाधान आहे, आत्मविश्वास आहे, तो निश्चितपणे द्विगुणीत होईल आणि नाशिककरांच्या पाठिंब्याने राष्ट्रवादी काँग्रेस अधिक भक्कमपणे वाटचाल करेल, असा विश्वास बाळगतो. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्यास अनेक कार्यकर्ते उत्सुक आहेत. अनेक असे कार्यक्रम भविष्यात होणार आहेत.




**भाजपामधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या श्री. अपूर्व हिरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना, शेजारी समीर भुजबळ व शरद पवार.**

# विकासापेक्षा भाजपमध्ये फक्त पैसे वाटण्याचेच काम : अपूर्व हिरे



आपण मोजक्या आणि निवडक कार्यकर्त्यांचा आज या ठिकाणी राष्ट्रवादीत प्रवेश केलेला आहे. साधारणत: ज्यांनी महानगरपालिकेला उमेदवारी केली किंवा ज्यांनी भाजपचे पदाधिकारी म्हणून काम पाहिले आहे, अशांचाच आज प्रवेशाचा कार्यक्रम केलेला आहे. आपण ज्यावेळी नाशिकला जाहीर कार्यक्रम करू, त्यावेळी प्रवेशाचा मोठा कार्यक्रम करू. उर्वरित जे सर्व कार्यकर्ते आहेत, त्यांचाही प्रवेशाचा कार्यक्रम आपण करणार आहोत.

गेल्या सहा वर्षांपासून साहेब, आम्ही भारतीय जनता पक्षामध्ये काम करतो आहोत. आणि मी ज्यावेळेला कामाला सुरूवात केली, त्यावेळेला भारतीय जनता पक्षाची सभासद नोंदणी सुरू झाली. महाराष्ट्रात सर्वाधिक साडेतीन लाख सभासद भारतीय जनता पक्षाचे नोंदवले होते. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना मला अभिनंदनाचं पत्र दिलं, की तुमच्याएवढे सभासद कुणी केलेले नाहीत. तुम्ही जोमात काम करतांय. तिथून आम्हाला कामासाठी वापरायला सुरूवात केली असं मी म्हणेन. मग महापालिकेची निवडणूक आली. महापालिकेला आम्ही भाजपचा आकडा १४वरून ६५वर पोहोचवला. जिल्हा परिषदेची निवडणूक आली, चारवरून आम्ही चौदावरती नेला. जिथं जिथं आम्हाला शक्य आहेत, तिथे तिथे आम्ही तेवढ्या ताकदीने काम करण्याचा प्रयत्न सातत्यानं आम्ही केला. परंतु, आमचं नाशिक शहराचं स्थानिक राजकारण एवढं विचित्र आहे, की या सगळ्या भाजपच्या स्थानिक राजकारणामुळे महापालिकेची निवडणूक संपली आणि जिल्हा परिषदेचीही निवडणूक संपली आणि शंभर टक्के आम्हाला बाजूला काढण्याचं काम त्या सगळ्या मंडळींनी सुरू केलं. अगदी कोअर कमिटीची, जी त्यांची पद्धत आहे बैठक घ्यायची आणि निर्णय घ्यायची, त्याच्या मिटिंगासुद्धा बंद करून टाकल्या आणि ज्यांना जे जे वाटेल, ज्यांनी पैसे दिले आहेत, त्यांना पैसे वाटायचे या पद्धतीनं काम भारतीय जनता पक्षामध्ये सुरू झालं. त्यामुळे विकासाचं जे स्वप्न आम्हाला दाखवलं गेलं, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेमध्ये सांगितलं, की मी नाशिकला दत्तक घेतोय. आम्हाला वाटलं, काहीतरी याच्यातून पॉझिटिव्ह घडेल. नाशिकमध्ये एक-दोन मोठे कारखाने उभे राहतील. आमच्या युवकांसमोर रोजगाराच्या काही संध्या निर्माण होतील. पण प्रॅक्टिकली पाहिल्यानंतर आम्हाला याच्यातली एकही गोष्ट मिळाली नाही. केवळ स्वप्नंच दाखवली गेली. मला तर कधी कधी वाटतं, की राजकपूरचा जो पिक्चर होता, स्वप्नों के सौदागर नावाचा. त्या पिक्चरमध्ये राजकपूर फक्त स्वप्नं विकायचंच काम करायचा. बाकी त्याला काहीच काम नव्हतं. तो फक्त स्वप्नंच विकायचा. तेवढंच काम ही सगळी मंडळी करतायंत हे आमच्या लक्षात आलं. ही फक्त स्वप्नंच विकतात. या स्वप्नांतून काहीच होत नाही, प्रॅक्टिकली त्याचा काहीचा उपयोग होत नाही आणि मग म्हणून फक्त स्वप्नांवरती जगता येत नाही. खऱ्या अर्थाने विकास करावा लागतो.

आज नाशिक जिल्ह्यामध्ये अनेक प्रश्न, मग तो पाण्याचा प्रश्न असेल, आमच्या इंडस्ट्रीचा प्रश्न असेल, कामगारांचा प्रश्न असेल, रोजगाराचा प्रश्न असेल, या सगळ्या विषयांवरती काम होणं खूप गरजेचं आहे आणि म्हणून आम्ही निर्णय घेतला, की हे सगळं जर कुणी पुरवू शकत असेल, आम्हाला विकासाचा मार्ग पुन्हा जर कुणी दाखवू शकत असेल, तर ते पवार साहेब दाखवू शकतील आणि म्हणून आज याठिकाणी आम्ही आदरणीय पवार साहेब, आदरणीय जयंत पाटील साहेब, आदरणीय भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतलांय आणि निश्चित मला स्वगृही परतण्याचा एक जो आनंद असतो, तो आनंद आज निश्चित आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये काम करण्याची संधी यानिमित्तानं मिळणार आहे. नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी काम करण्याची संधी यानिमित्तानं मिळणार आहे. आणि म्हणून आपल्यावतीनं मी आदरणीय पवार साहेब, आदरणीय जयंत पाटील साहेब, आदरणीय भुजबळ साहेब यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो आणि थांबतो.



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईत 'चला देऊया मदतीचा हात' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पक्षाचे नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेले मार्गदर्शन...**

आपल्या सर्वांचे दैवत आदरणीय पद्मविभूषण पवारसाहेबांचा उद्या वाढदिवस. सर्वप्रथम मी साहेबांना आपल्या सर्वांच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो. अभिष्टचिंतन व्यक्त करतो. साहेबांचे नेतृत्व, साहेबांचे मार्गदर्शन, साहेबांची कृपादृष्टी, आशीर्वाद कायम आपल्या सगळ्यांच्या डोक्यावर राहावे, यासाठी साहेबांना निरोगी दीर्घायुष्य लाभो, यासाठी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. आपल्या सगळ्यांना माहिती आहे, सुरवातीला प्रांताध्यक्षांनीही सांगितले. साहेबांनीही सांगितले की, राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर साहेबांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आपल्याला साहेबांच्या वाढदिवसानिमित्त कोणता जाहीर समारंभ होणार नाही, याची खबरदारी घ्यायची आहे. साहेबांच्या वाढदिवसानिमित्त समारंभ आयोजित न करता जो काही निधी असेल, किंवा जेवढा शक्य असेल तेवढा निधी हा दुष्काळी भागातील शेतकरी शेतमजुरांना द्यावा. चला देऊ या मदतीचा हात, हा उपक्रम आपण सुरू केला आहे. त्याला देखील आपण सर्वांनी भरभरून अशी साथ द्यावी. येणाऱ्या विधानसभा-लोकसभा निवडणुकांची तयारी पक्षाध्यक्ष, प्रांताध्यक्ष व आपण सर्वांनी सुरू केलेली आहे.

अगदी बूथ पातळीवर नियोजन आपण सुरू केलेले आहे. बूथ पातळीपासून यंत्रणा मजबूत करण्याचे नियोजन करत असताना शंभर टक्के यंत्रणा करण्याचे उद्दिष्ट आपण कार्यकर्त्यांना दिलेले आहे. सगळ्याच जिल्ह्यांनी चांगले काम केले आहे. काहींचे काम बाकी आहे. आता ज्यांनी शंभर टक्के काम केले, त्या तालुकाध्यक्ष व विधानसभा अध्यक्षांचा आपण सत्कार केला. मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. बारामती, इंदापूर, निफाड, इस्लामपूर, शिरूर-हवेली, आंबेगाव, घनसांगवी असे वेगवेगळे तालुके आले. ते येणे क्रमप्राप्तच होते. पण, मला राजेंद्र शिंगणे, बुलडाणा जिल्ह्याचे विशेष अभिनंदन करायचे आहे. कारण, विदर्भामध्ये असलेला हा जिल्हा. आणि त्यामध्ये टक्क्यांमध्ये सर्वांत जास्त विधानसभा असलेला मतदारसंघ शंभर टक्क्यांवर आणला. जे पुणे जिल्ह्याला जमले नाही, जे सांगली जिल्ह्याला जमले नाही, जे सातारा जिल्ह्याला जमले नाही, ते बुलडाणा जिल्ह्याने करून दाखवले आहे.

आता थांबायचे नाही. आता साहेबांना बुलढाण्याचा खासदारही आपला करायचा आहे. आपण पाहिले की, गेल्या चार साडेचार वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड अशी लाट, हवा आली. मी मी म्हणणारे उमेदवार पडले. पण, एक तरी

## भाजपला सत्तेची मस्ती चढली होती...

# भाजपवरची नाराजी जनतेने निवडणुकीतून दाखवून दिली

### राष्ट्रवादीचे विधीमंडळ गटनेते अजित पवार यांचे उद्गार

सांगितलेली गोष्ट खरी करून दाखवली. १५ लाख मिळाले. महागाई कमी झाली. दोन कोटी युवकांना दरवर्षी नोकरी मिळाली. बेरोजगारी दूर झाली. आधारभूत किंमत वाढली. काय माझा कांदा उत्पादक शेतकरी करतोय. काय माझ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांची हाल अपेष्टा आहे. या सगळ्यांचा आपण विचार केला पाहिजे. आणि म्हणूनच आज ज्या पाच राज्यांच्या निवडणुका झाल्या, त्याच्यामध्ये मिझोराममध्ये भाजप आला नाही. त्याच्यामध्ये तो तेलंगणामध्ये आला नाही. छत्तीसगडमध्ये आला नाही. राजस्थानमध्ये देखील भाजपचा पराभव झालेला आहे. फक्त मध्य प्रदेशमध्ये काट्याची टक्कर झाली. परंतु अपेक्षा करू की, या जातीयवादी पक्षाचा पराभव झाला पाहिजे. एवढी मस्ती, एवढी गुर्मी या पक्षाच्या सर्वांनाच चढली होती.

आजदेखील आपण काय पाहतो, अहमदनगर महापालिकेची निवडणूक झाली. धुळे महापालिकेची निवडणूक झाली. जळगाव झाली. त्या अगोदर सांगली झाली. निव्वळ पैशाच्या जोरावर. त्यांच्या पक्षाच्या कमळ चिन्हावर निवडून आलेल्या अनिल गोटे यांनी सांगितले की, इतक्या चुकीच्या पद्धतीने कारभार चालू आहे. हे चित्र धुळ्यामध्ये पाहायला मिळाले. म्हणजे काही मागचा पुढचा विचार करत नाही. पैसा, पैशातून सत्ता, सत्तेतून पैसा, या पद्धतीचा कारभार चालला आहे. पण, शेवटी देशातील जनतेने ओळखलं की, जनतेचे प्रश्न सोडविणारे खरे राज्यकर्ते कोण आहेत. आणि धूळफेक करून सत्ता मिळविणारे कोण आहेत. लोकांना फसवून करणारे कोण आहेत. त्यामुळे या सर्व राज्यातील जनतेने भाजपवरची नाराजी दाखवून दिलेली आहे. गेल्या चार वर्षात भाजपच्या सरकारकडून जो भ्रमनिरास झाला.

या पाच राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकरी-कष्टकरी अधिक नाराज आहे. त्यांच्या या पराभवामुळे आपण देखील आलोच, असं काही समजण्याचे कारण नाही. त्याकरिता बूथनिहाय कमिट्या जिथं राहिल्या असतील, त्या करा. त्यात दुर्लक्ष करू नका. त्यात देखील अनेक तरुण कार्यकर्त्यांनी चांगले काम केले, असं डॉ. शिंगणे मला सांगत होते. म्हणजे वडीलधाऱ्यांची ताकद तिथं आहेच, पण तरुणांची ताकद देखील महत्त्वाची आहे. महिलांची, युवतींची शक्ती देखील तिथे महत्त्वाची आहे. आणि आपल्या या सगळ्या जातिधर्माचा सलोखा त्या ठिकाणी निर्माण करायचा आहे. आज देशामध्ये अराजकता, हुकूमशाही चालली आहे. मी म्हणेल ती पूर्व दिशा, असं आहे. आम्ही दुष्काळामुळे हेक्टरी ५० हजार- एक लाख मदत मागितली होती, ती देखील देण्याबाबत अजिबात भूमिका घेतली नाही.

चार चार वेळा पवारसाहेब मुख्यमंत्री झाले. पवारसाहेबांनी सातत्याने शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराने जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. मंडल आयोगाची अंमलबजावणी असेल. महिलांना सुरवातीला ३३ टक्के, तर नंतर ५० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय असेल. रोजगार हमीशी निगडित फळबाग लागवडीची योजना असेल, कोकणला वरदान ठरणारा कोकण रेल्वेचा प्रकल्प असेल, राष्ट्रीय पातळीवरची रोजगार हमीची योजना असेल, शेतकऱ्यांच्या ७१ हजार कोटींच्या कर्जमाफीचा धाडसी निर्णय असेल, शेतकऱ्यांना सावकाराच्या दारात जायला लागू नये म्हणून दोन टक्के व्याजदराने पीक कर्ज द्यायचा निर्णय असेल,



श्री. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त काढण्यात आलेल्या 'राष्ट्रवादी' या विशेष अंकाचे अजित पवार, जयंत पाटील व छगन भुजबळ यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी डावीकडून राजेंद्र शिंगणे, शशिकांत शिंदे, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील, फौजिया खान, चित्रा वाघ आणि सक्षणा सलगर

घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यायचा निर्णय असेल, असे किती निर्णय सांगता येतील. किंवा जे वेगवेगळे घटक आहेत, त्यांना एकत्र करून आपण पुढे गेले पाहिजे. आदिवासी समाजाला त्यांच्या लोकसंख्येनुसार बजेटमध्ये तरतूद केली पाहिजे. मागासवर्गीय समाजाला त्यांच्या लोकसंख्येनुसार बजेटमध्ये तरतूद करून त्यांच्याकरिता पैसा खर्च केला पाहिजे. मग शिक्षणाचे असेल, मेडिकलचे शिक्षण असेल, इंजिनिअरिंगची कॉलेज असतील, पवारसाहेबांनी त्यांच्या काळात अशी कवाडे उघडण्याचे काम केले. नैसर्गिक संकटे आली. दुष्काळाचे संकट आले. गारपिटीचे संकट आले. लातूर-उस्मानाबादला भूकंपाचे संकट आले. बाबरी मशीद पाडल्यानंतर जातीय दंगलींचे संकट आले. ज्या ज्या वेळी संकट आले, ज्या ज्या वेळी महाराष्ट्र चांद्यापासून बांद्यापर्यंत अडचणीत आला, त्या त्या वेळी आदरणीय पवारसाहेब कशाचीही तमा न बाळगता त्या ठिकाणी पहिल्यांदा पोचले.

मला आठवतयं त्यावेळी मी वर्षावर होतो. साडेतीनला शेवटचं गणेशाचं विसर्जन झालं. तिथं डीआयजीने सांगितले की, साहेब सर्व मिरवणुका शांततेत पार पाडल्यात. आम्ही सगळे झोपायला गेलो. आणि साहेबांचा तिथे फोन खणखणला की, भूकंप झाला. भूकंप झाल्याचे चार-साडेचारला साहेबांना कळाले. साहेब, सकाळी सहा वाजता सोलापूरला पोचले होते. इतक्या तातडीने निर्णय घ्यायचे असतात. पवारसाहेबांनी समस्यांवर मार्ग दाखवला. तसेच, त्यातून बाहेर काढले. दुष्काळामध्ये जनावरांना छावण्या सुरू केल्या. पशुधन वाचविण्याचे काम केले. फळबागांना पाणी टाकण्याकरिता निधी दिला. अशा काही खूप काही गोष्टी आहेत, की ज्या पवारसाहेबांनी तुमच्या माझ्यासाठी केल्या. आज जनता केवळ शिवसेना, भाजप किंवा नरेंद्र मोदींवर नाराज नाहीये. तर प्रशासनही विरोधात आहे. आज निकाल लागल्यानंतर उद्यापासून अधिकारी तुमच्याशी कसे वागतील, तेही तुम्हाला कळेल. पण, तुम्हीही शांत वागा. तुम्हीही लगेच, आता आम्ही आलोच, असे वागू नका. जरा दमानी, सबुरीनं घ्या. जमिनीवर पाय ठेवून चाला. आपल्या नेत्याची काय शिकवण आहे, याची जाणीव ठेवण्याचे काम तुम्ही सातत्याने करा. रिझर्व बँकेचे गव्हर्नर अर्जित पटेल यांनी काल अचानक राजीनामा दिला. काय कारण होतं. त्या अगोदर रघुराम राजन यांनी ते पद सोडलं. पंतप्रधानांच्या आर्थिक परिषदेचे सदस्य सुरजित भल्ला यांनी राजीनामा दिला. का ही लोकं राजीनामा देतायेत. एवढ्या महत्त्वाच्या पदावर नेमलेली ही लोकं राजीनामा देतायेत. सुप्रिम कोर्टाचे चार जज प्रेस कॉन्फरन्स घेऊन लोकशाही धोक्यात आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करतायेत. जे देशाच्या इतिहासात कधी घडले नव्हते, ते यांच्या काळात घडत आहे. आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी राजीनामा दिला. देशाच्या आर्थिक आघाडीवर असं काय चाललंय की, मोदींचे सर्व सहकारी पदं सोडतायेत. याचा विचार आपण केला पाहिजे. नोटाबंदीने फायदा कोणाचा झाला. उलट तुमच्या माझ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले. हे अजित पवार सांगत नाही. केंद्रीय कृषिमंत्रालयाचा तशा पद्धतीचा अहवाल आला आहे. या घटना



पवारसाहेब देशाचे कृषिमंत्री असताना घडत नव्हत्या. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे काय झालय. आज मला नितीन पवार, दिलीप बनकर वगैरे भेटले. म्हटले, आमच्या कांदा उत्पादकांची चूक काय आहे. परंतु काय अवस्था आहे. कोण त्यांना वाली आहे का. आज जर पवारसाहेब तिथे असते, भुजबळसाहेबांनी, नितीन पवारनी, दिलीप बनकरनी त्यांना फोन केला असता की नाही. तिथल्या तिथं पवारसाहेबांनी निर्णय घेतला असता की नाही. कुठलाही माझा धान्य उत्पादक असू द्या, फळ उत्पादक असू द्या,

कुठलंही पीक घेणारा माझा शेतकरी असू द्या, किंवा दूध उत्पादन घेणारा माझा शेतकरी असू द्या. कुठल्याही बाबतीत पवारसाहेबांनी अडचण येऊ दिली नाही. त्यातून मार्ग काढला. पण, आज केंद्रीय कृषिमंत्रालय काय विचार करतय. काय उत्तर देतायते. मंत्र्यांना तर आपण काय बोलतोय, ते कळंत नाहीये. ते नगरचे पालकमंत्री काय म्हणाले, जनावरांना काय चारा घालायचा. पाव्हण्यांकडे जनावरं सोडा. याच्या काकानी पाव्हण्यांकडे जनावरे सोडली होती का. काय बोलतोय. काही तारतम्य राहिलेले नाही. आपण कोणाचे प्रतिनिधित्व करतोय. समाज कसा अडचणीत आहे, त्याला बाहेर काढण्यासाठी काय केले पाहिजे, याचे यांना काहीही घेणेदेणे पडलेले नाही. त्यामुळे यांची लोकं राजीनामा द्यायला लागली आहेत. त्यांचे सुषमा स्वराज व उमा भारती यांनी सांगून टाकले की, पुढची निवडणूक लढवायची नाही. त्यांना माहिती आहे की, पडायच आहे, तर कशाला निवडणूक लढवायची. हुशार आहेत दोघी भगिनी. त्यामुळे त्यांना ठरवले की, लढवायलाच नको. गडकरींनी सांगितले की, मोदी नेत्यांना घरी बोलावतात आणि त्यांचा अपमान करतात. हा सत्तेचा माज आहे. हे अजित पवार बोलत नाही. नितीन गडकरी साहेब बोललेले आहेत. त्यांच्यात हुकूमशाही आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेत कुठलीही हुकूमशाही मान्य नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात भाजप असेल, शिवसेना असेल, यांचा पराभव केलाच पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता त्यांच्या पराभवाचे माध्यम ठरला पाहिजे. नुसता हा कार्यक्रम घेऊन आपणाला चालणार नाही. जिथं आपण कमी आहोत. आम्ही जयंतराव, भुजबळसाहेब, धनंजय, सुनील तटकरे, वळसे पाटील आम्ही समविचारी लोकांशी चर्चा करतोय. ४८ जागा आहेत. त्यासाठी काँग्रेस, कवाडे गट, शेकाप, सप, यांना सगळ्यांना एकत्र आणण्याचा आपला प्रयत्न आहे. याच्यातून एकासएक उमेदवार कसे देता येतील, कारण पहिले ध्येय हे आहे की, भाजप- शिवसेनेचा पराभव करणे. कदाचित त्यासाठी तुमच्या कोणाच्या मतदारसंघात काही ॲडजेस्टमेंट करावी लागेल. ती करावी लागली, तरी तुम्ही पाठिंबा द्या. ते आम्ही लक्षात ठेवू, उद्याच्या काळात आपले सरकार आल्यानंतर जिथं पक्षाकरिता नेतृत्वानी सांगितल्यानंतर दोन पावले मागे सरकण्याची ज्यांनी तयारी ठेवली आहे, त्यांना योग्य प्रकारचा मान सन्मान ठेवण्याची जबाबदारी आम्हा लोकांची राहील. हे पवारसाहेबांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला मी तुम्हाला सांगत आहे. याच्यामध्ये काही बदल घडणार नाही. आपण एकमेकांच्या विरोधात लढलो, तर काय घडतंय, हे आपण बघितले आहे. अनुभवले आहे. चार


राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ या भारतीय संविधानाची प्रत अजित पवार यांना भेट देताना शेजारी सुनील तटकरे, जयंत पाटील व इतर मान्यवर.

वर्षे आपण सहन करतोय. मार्केट कमिट्यांचे वाटोळे केले. सहकारी संस्थांचे वाटोळे केलं. कसेही नियम करतात. परवाची कोल्हापूर महानगरपालिकेची निवडणूक, कारण नसताना तिथे तुमचे माझे राष्ट्रवादी काँग्रेसचे पाच नगरसेवक अपात्र करण्याचे काम केले. आलं त्यांच्या मनात म्हणून झालं. १५-१५ वर्षे आम्ही तुमचे प्रतिनिधित्व केले. बाबांनो, सत्तेचा असा दुरुपयोग आणि गैरवापर कुठल्या पक्षाने केल्याचे मी पाहिले नव्हते, जे भाजप- शिवसेनेने केले. वाट्टेल ते करतात. सांगतात एक आणि करतात एक. कोणाला कशाही पद्धतीची भीती दाखवतात. कुठ पोलिसांचा वापर करतात. मला धुळे आणि नगरचे कार्यकर्ते सांगत होते, पोलिसांच्या देखत पैशाचे वाटप तिथे चालले होते, तरी पोलिस तेथे काही करत नव्हते. ही अवस्था. आताही काही निवडणुका झाल्या. काही क्लीप बाहेर यायला लागल्या आहेत. बघा, काय बोलतायेत, कशा पद्धतीने वागतायेत. कमी असले तरी अजूनही गप्प बसणार नाही. तिकडे गोव्यात कमी आमदार असूनही काँग्रेसला बाजूला करून यांनी यांचा मुख्यमंत्री केला.

सत्तेकरता काहीही करतील. कर्नाटकामध्ये कुठल्या कुठे भाव चालला होता. मणिपूरला तेच. मला आठवतंय, त्यावेळी मी आमदार होतो. जयंतराव होते. भुजबळसाहेब होते. १९९५ ची गोष्ट. काँग्रेसच्या ८० जागा आल्या. साहेबांना राज्यपालांनी सांगितले की, सिंगल लार्जेस पार्टी म्हणून मी तुम्हाला मुख्यमंत्रिपद द्यायला तयार आहे. साहेबांनी सांगितले की, नाही, जनतेने आम्हा नाकारले आहे. मी विरोधी पक्षात राहीन. आणि तेथे भाजप-शिवसेनेला सत्ता स्थापन करण्यासाठी संधी मिळाली. लोकशाहीत असं असतं. लोकशाहीत यशाने हुरळून जायचे नसत, आणि अपयशाने खचून जायचे नसते. याची जाणीव कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे. दुष्काळात असलेल्या माणसांना आपल्याला त्यातून सावरायचे आहे. त्याला मदत करायची आहे. त्यातून आपल्याला पुढे जायचे आहे. हे लक्षात ठेवा. पवारसाहेबांना मध्यंतरी एका दुर्धर आजाराचा सामना करावा लागला. साहेबांवर उपचार करणारे डॉक्टरदेखील त्यावेळी घाबरले. २००४ ची निवडणूक होती. साहेबांनी आमची बैठक घेतली. सेनापती नाहीये, तुम्हाला लढायचे आहे. काटा आला अंगावर. कित्येकांच्या डोळ्यात पाणी आले. साहेब ज्यावेळी ब्रीच कँडीमध्ये उपचार करत होते, त्यावेळी सहा महिन्यांचीच मुदत दिली. दुसरं कोणी असतं, तर पार खचून गेलं असतं. साहेबांना २००४ साली डॉक्टरांनी सांगितले की, सहा महिनेच. साहेबांनी त्या डॉक्टरला काय सांगितले, तू माझी चिंता करू नकोस. तुला वर पोचविल्याशिवाय मी जाणार नाही. एवढं धाडस. हेच जर तुम्हाला सांगितले तर, तुमची पिवळी होईल. गळाच्यानं खोटं बोलत नाही. असा आपला नेता दुर्दम्य आत्मविश्वास असल्याशिवाय संकटाशी लढण्याची ताकद येत नसते. ती साहेबांकडे आहे. तुम्ही पवारसाहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते आहात. त्यामुळे अशी संकटे येतील, जातील. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या पक्षाला केंद्रात आणि राज्यात सत्तेवर आणायचे आहे, ही खूणगाठ बांधायची आहे. बाबांनो, तिकीट कोणाला भेटेल. तुम्हाला भेटेल, मला भेटेल, कोणाला भेटेल सांगता येणार नाही. आपण तिकिटासाठी झटूयात. पण शेवटी ज्याला कोणाला उमेदवारी मिळेल, तो तुमच्या माझ्या जातीचा आहे का, पातीचा आहे का, धर्माचा आहे का, पंथाचा आहे का, हे पाहू नका, तर तो फक्त राष्ट्रवादीचा आहे का, घड्याळाचा आहे का, एवढंच बघा. आणि त्याच्या पाठीमागे उभे रहा. आताच्या या निवडणुकींचा हा निकाल लागला ना, कदाचित त्यामुळे लोकसभा- विधानसभा एकत्र लागण्याची शक्यता नाकारता येत

नाही. कदाचित. जर एकत्र निवडणुका लागल्या, तर सामोरे जाऊ. वेगवेगळ्या लढल्या तरी सामोरे जाऊ. पण राहिलेल्या दिवसात ते वाटेल ते करायला मागे पुढे पाहणार नाहीत. आमिषे दाखवतील, प्रलोभने दाखवतील, पण हे करत असताना वारं फिरलं तसं काही लोकं आपल्यामध्येही येतील. कदाचित काहींना घेतलेले तुम्हाला आवडेल, आवडणार नाही. पण, बेरजेचे राजकारण पवारसाहेबांनी गेल्या ५० वर्षांत आजपर्यंत केलेले आहे. बेरीज करताना कदाचित तुमच्या तालुक्यात-जिल्ह्यात काही वेगळा निर्णय झाला, तर त्याच्यात नाउमेद होऊ नका. कारण, शेवटी आपल्याला त्यातून एकच ध्येय गाठायचे आहे की, आपल्या विचाराचे सरकार भाजप-शिवसेनेचा दारुण पराभव करून महाराष्ट्रात आणि भारतात सत्तेवर आणायचे आहे. त्याकरिता आम्ही काही वेगळे निर्णय घेतले, तर चार वर्षे आम्ही अडचणीत लढलो, हा आताच कसा काय आठवला, असलं काही मनात आणू नका. काही थोड्या मतानी जर काही होणार असेल, आणि एखाद्या भागात आपल्याला उद्दीष्ठ साध्य करता येत नसेल, आणि जर कोणाला घेऊन ते साध्य करता येत असेल, तर आपण त्याला पाठिंबा द्या. बूथ कमिट्यांमध्ये आपण अडीच लाखापर्यंत पोचलो आहोत. आपल्याला सहा लाखापर्यंत पोचायचे आहे. तेही काम करत करत. अडचणीच्या काळात सावरत सावरत, शहरी भागातही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद वाढवत वाढवत मुंबई-विदर्भ भागातही आपल्याला साथ कशी भेटेल, याचा प्रयत्न आपण करूयात. कारण, शेवटी ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. या वयात पवारसाहेबांनी परवा कोकण पिंजून काढला. आता वेगवेगळे दौरे काढतायेत. मला तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही पण पक्षासाठी अधिकच वेळ निश्चितपणे देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशी माझी तुम्हाला विनंती आहे. हे करत असताना पक्षाला वेळ देताना तुम्ही कुठेही कमी पडू नका. मागे राहू नका. एक आठवण सांगतो की, घाशीराम कोतवाल नाटक होते. जब्बार पटेल आणि मोहन आगाशे पवारसाहेबांना भेटले. त्यांना परदेशात जायचे होते. पण, हे नाटक परदेशात जाऊ नये म्हणून शिवसैनिक खोपोली घाटात थांबले होते. आली बसकी यांना अडवायचे आणि यांचे विमान चुकवायचे. ही लोकं साहेबांना भेटली. चंद्रकांत किर्लोस्करांसोबत पवारसाहेबांचे मैत्रीचे संबंध होते. त्यांना पवारसाहेबांनी अडचण सांगितली. किर्लोस्करांचे विमान थोडे मोठे होते. पवारसाहेबांनी सर्वांना चार्टरमध्ये बसवले. खोपोली घाटत शिवसैनिक थांबले, कधी बस येती. पण विमान वरून गेलं. मुंबईत उतरलं आणि ते लंडनच्या विमान बसून निघून गेले. हे इकडं मातोश्रीला सांगतायेत, अजून आलचं नाही, बहुतेक कॅन्सल झालं वाटतं. ते म्हणाले, अरे ते गेल पार तिकडं लंडनला, तुम्ही काय तिथं बसलात. म्हणजे असा प्रसंग आल्यानंतर नेता कशा प्रकारे मार्ग काढू शकतो. हे येऱ्यागबाळ्याचे काम नाही. हे फक्त पवारसाहेबच करू शकतात. जयंत पाटलांनी सांगितले आहे की, येत्या वर्षभरात पक्षाच्या प्रत्येक नेत्यानी, पदाधिकाऱ्यानी काही काळ घर दार बाजूला ठेवून पक्ष कार्याला झोकून दिले पाहिजे. अगदी मोदीसाहेबांसारखं घरच्यांना सोडून, असं मी म्हणणार नाही. खरचं म्हणणार नाही. पण घरच्यांकडे लक्ष देऊन शक्यतो जास्त वेळ पक्षाला द्यावा, असं माझं पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला आवाहन आहे. असं काम करावं की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यात आणि देशात ताकदीने निवडून आणावा. बूथसाठी काम केलेल्या सारंग आणि सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो.





**अजित पवार यांच्या शुभहस्ते विजय लोखंडे यांना पिंपरी-चिंचवड जिल्हाध्यक्ष नेमणुकीचे पत्र देण्यात आले. तेव्हा शेजारी ईश्वर बाळबुधे, धनंजय मुंडे, सुनील तटकरे आणि जयंत पाटील.**



# जजबा है जिंदगी में परिवर्तन का

## छगन भुजबळ यांचे उद्‌गार

पवारसाहेबांबद्दल बोलायचे म्हणजे, दिवस संपेल पण माहिती संपणार नाही, एवढं चांगले काम आहे. सर्वप्रथम मी त्यांना आपणा सर्वांच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो, आणि यापुढेही त्यांना फार मोठे आयुष्य या समाजाची आणि देशाची सेवा करण्यासाठी लाभो अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो.

बूथ कमिट्या झाल्या आणि त्यासाठी चांगले काम करणाऱ्यांचा आपण सत्कार केला. त्यासाठी मी प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील, सारंग पाटील यांचे विशेष अभिनंदन करतो. कारण, त्यांनी या कामात विशेष लक्ष घातले. ज्यांनी यामध्ये चांगले काम केले, त्यांचे मी अभिनंदन करतो. पण, याच्यामध्ये ज्यांनी सातत्याने कष्ट केले, मेहनत घेतली, त्यामुळे आपण बराच मोठा पल्ला गाठलाय. पण, आपल्याला अजून बरचं काम करायचे आहे.

खरं तर पवारसाहेबांना घरातूनच सत्यशोधक समाजाचे विचार मिळाले. त्यांचे पिताश्री, मातोश्री हे सगळे सत्यशोधक विचारांचे. फुले, शाहू, आंबेडकर विचारांचे बाळकडू पवारसाहेबांना त्यांच्या घरातूनच मिळाले. त्यामुळे ज्या ज्या वेळेला सामाजिक प्रश्न निर्माण होतात. दलितांचे असो, आदिवासींचे असो, मागासवर्गीयांचे असोत, महिलांचे असोत, अशा वेळेस पवारसाहेब धाडसाने जो निर्णय घेतात, त्याचे कारण त्यांना घरातून मिळालेले बाळकडू हे कारण आहे. अनेक लोकं असे निर्णय घेताना मागे सरले असते. पण पवारसाहेब मागे सरले नाही. फुले, शाहू, आंबेडकरांचे वाचन तर त्यांचे आहेच, पण नुसतं वाचन करून नाही, तर त्याच्यात जे सांगितलेले आहे, ज्या ज्या वेळेला काम करण्याची संधी मिळाली. निर्णय घेण्याची संधी मिळाली, त्यावेळेला पवारसाहेबांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी त्या वेळेला मजबुतीने निर्णय घेतले. आरक्षणाच्या बाबतीत सुद्धा त्यांना महिलांना आरक्षण दिले. मागासवर्गीयांना आरक्षण दिले. शाहू महाराजांनंतर जर कोणी राज्यकर्त्यांनी या राज्यात आरक्षण दिले असेल, तर ते शरद पवार नावाच्या राज्यकर्त्यांनी. त्यासाठी मोठी हिंमत लागते. लोकं या बाजूचे असतात, त्या बाजूचे असतात. परंतु आपल्याला काय करायला पाहिजे. हे राज्य कोणासाठी आहे. हे स्वातंत्र्य कोणासाठी आहे. सामाजिक क्रांती म्हणजे काय आहे. देश पुढे न्यायचा आहे, म्हणजे काय पुढे न्यायचे आहे. सगळ्यांना बरोबर घेऊन जायचे आहे. शेवटचा माणूसही पहिल्यासोबत चालला पाहिजे. त्याच्याबरोबर आला पाहिजे. हे काम करायचे आहे. त्यासाठी पवारसाहेबांसारखा, म्हणजे पवारसाहेबच. त्यांच्यासारखा दुसरा कोणी नाहीच.

ज्यावेळी पवारसाहेब आजारी पडले. २००४ मध्ये. त्यावेळी येथेच फोर्टला त्यांची पत्रकार परिषद होती. त्यावेळी त्यांचे ऑपरेशन झालेले होते. त्यानंतर लोकसभेच्या निवडणुका होत्या. आणि पवारसाहेब तेथे पत्रकार परिषद घ्यायला आले.




अर्थात डॉक्टरांनी त्यांना मनाई केलेली असणार. आणि अक्षरशः रक्ताचे ओघळ या बाजूने येत होते. आणि त्यानंतरही कडक उन्हात पवारसाहेब लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही गेले. मी ज्यावेळी दिल्लीत त्यांना भेटायचो. त्यावेळी त्यांना बोलायला त्रास व्हायचा. काय बोलायचे, ते अर्धवट कळायचे. पण दहा वाजता बरोबर कृषी भवनात हजर असायचे. दहा ते पाच वाजेपर्यंत काम करायचे आणि मग परत हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंट. अशावेळी कोणाला भेटायचे नाही, इन्फेक्शन होईल, अमुकतमुक. पण, पवारसाहेब सकाळी आठ वाजल्यापासून पाच वाजेपर्यंत सातत्याने काम करणार. मी असं धाडसी व्यक्तिमत्त्व पाहिलेच नाही. लोकं आजारी पडल्यानंतर नको नको, झोपूनच राहूया. पण हे नाही. लोकांसाठी उभे राहिले. लोकांचे काम करत राहिले. फक्त निवडणुकीसाठी नाही. निवडणूक नसतानासुद्धा ते काम करत राहिले. आणि आजसुद्धा तुमच्या आमच्यापेक्षा जास्त काम तेच करतात आणि तुमच्या आमच्यापेक्षा जास्त दौरे तेच करतात. तुमच्या आमच्यापेक्षा तेच लोकांना जास्त भेटतात आणि तुमच्या आमच्यापेक्षा लोकांची पत्रे तेच जास्त वाचतात. आणि तुमच्या आमच्यापेक्षा लोकांना जास्त न्याय देण्याचे काम तेच करतात. कंटाळा करणार नाहीत. एक एक कागद हातात घेणार. वाचणार.

किती काम. वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले आहे. आता हे यशवंतराव चव्हाण सेंटर. इथं पवारसाहेब काम करतात. सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे काम इथून होतं. विशेष करून सामाजिक कार्यक्रम होतात. पुढं जरा गेले की, तुम्हाला मंत्रालय दिसेल. मुख्यमंत्री कसा असावा, राज्यकर्ता कसा असावा. मंत्रालयाकडे पाहिल्यावर पवारसाहेबांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. आणखी पुढे गेले की, क्रिकेट सेंटर. ज्या कामात त्यांनी हात घातला, थेट जागतिक क्रिकेटचे अध्यक्षच झाले. त्याच्या आणखी पुढे गेले की, साखर भवन, शेतकऱ्यांच्या कामासाठी. ऊस असेल, दूध असेल शेतकऱ्यांचे जे जे प्रश्न असतील, ते सोडविण्यासाठी. पुढे गेले की, नेहरू सेंटर. विज्ञान. लहान मुलांपासून अभ्यासकांना विज्ञान सेंटरमध्ये काय देता येईल. आणखी पुढे गेले की, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आहे. आमच्या नाशिकला जावा, यशवंतराव चव्हाण

मुक्त विद्यापीठ त्यांनी केले आहे. वेगवेगळ्या ठिकाणी वास्तू उभ्या आहेत. त्यांच्या माध्यमातून आपल्याला वेगवेगळ्या कामांची ओळख होत आहे. पुण्यामध्ये त्यांनी अशा असंख्य गोष्टी उभ्या केल्या. किंबहुना महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उभ्या केल्या. मी फक्त मुंबईकरता बोलतोय.

मला आपल्याला एक सांगणे आहे की, आपण ज्यावेळी भाषणं कराल, त्यावेळी पवारसाहेब शेतीमध्येच फार काम करतात. ग्रामीण भागातच फार काम करतात, एवढं बोलून थांबता येणार नाही. किंबहुना थांबता येणार नाही. याचे कारण आहे की, आता निवडणुकांत, लोकसभा असतील किंवा विधानसभा...शहरी भागात आज मोठ्या प्रमाणावर मतदार आहेत. आणि आपण पवारसाहेबांना जर शेती या विषयातच अडकून ठेवलं, तर लोकांना काय करायचे कळत नव्हतं. त्यावेळी कोणी बोलावले, साखर कारखान्यात मोळी टाकायला जायचे आहे, त्यावेळी पवारसाहेब जायचे. त्यावेळी ते भाषण करायचे की, सभासद असलेल्या आणि नसलेल्यांच्याही अगदी झोपडपट्टीतील मुलांच्या हातात हे कॉम्प्यूटर गेलेच पाहिजेत. मी त्यांच्या बरोबर फिरायचो. त्यांचा प्रत्येक ठिकाणी हाच धोशा. मुलांना कॉम्प्युटर द्या. मुलांना कॉम्प्युटर द्या. आता प्रत्येकाकडेच कॉम्प्युटर आहे. मोबाईलमध्येच सगळं आहे. पवारसाहेबांना पुढे काय आहे, याची जाणीव त्यावेळेला होती. त्याच्यासाठी त्यांनी काम केले. मी स्वतः त्याचा साक्षीदार आहे. या सगळ्या गोष्टी आपल्याला मांडाव्यात लागतील. बोलाव्या लागतील. सांगायला लागतील.

किती बोलावे. आता फक्त बोलणारे आहेत. किसानोंको



**श्री. प्रमोद हिंदुराव हे संविधानाची प्रत श्री. छगन भुजबळ यांना भेट देताना, शेजारी धनंजय मुंडे, सुनील तटकरे, अजित पवार, जयंत पाटील आणि दिलीप वळसे पाटील.**

काय वाटेल, पवारसाहेबांना फक्त शेतीच, बाकी काही नाही. अरे बाबांनो, असं नाही. इतर क्षेत्रात पवारसाहेबांनी इतरांपेक्षा सरस कामगिरी केलेली आहे. ते आपल्याला दाखवायचे आहे.

या मुंबई, नाशिक, पुणे भागामध्ये देशातील ८० टक्के ॲटोमोबाईल कारखाने आणलेले आहेत. मोटार बनविणारे, त्यांचे सुटे भाग बनविणारे, ते एक्स्पोर्ट करणारे, देशात विकणारे, हे कारखाने पवारसाहेबांनी आणले. उद्योगधंद्यात त्यांनी काम केले. विकासाचे काम कसे करावे, हे त्यांच्याकडून शिकले पाहिजे. हे काम आपल्याला दाखवावे लागले. सांगावे लागले. कारण, ज्यावेळी ९५ मध्ये सरकार गेले आणि पुढची पाच वर्षे देढ गुणा पैसा मिलना चाहिए की नही मिलना चाहिए. मिलना चाहिए की नही मिलना चाहिए. मै आपसे पुछना चाहता हूं, मिलना चाहिए की नही मिलना चाहिए. अरे मगर कहा है. मिलना चाहिए, मगर है कहा. आता तर जायची पण वेळ आली. जाऊदे लवकर जातील तेवढे बरं आहे. अहो लोकांसाठी नाही तर काय करतील आणि काय नाही.

अहो ते रिझर्व बँकेचे उर्जित पटेल गेले. त्यांच्यानंतर अरविंद गेले. रघुराम राजन गेले. सुब्रमण्यम गेले. अहो किती गेले. रिझर्व बँकेचा जो तो जातच आहे. यांनी सीबीआयची वाट लावली. सीबीआयचे अधिकारीच सीबीआयच्या अधिकाऱ्यांवर

रेड करतात. तो भ्रष्टाचारी, हा महा भ्रष्टाचारी. अहो, तुम्ही सगळे भ्रष्टाचारी. तुम्हाला काय अधिकार आहे, लोकांची चौकशी करायची आणि लोकांवर वेगवेगळ्या केस टाकायची. यांनी सगळ्यांना आणून ठेवले आहे. हसमुख अडिया, क्या उसका काम बढिया. सत्यानाश. नोटबंदी, खलास. लाखो धंदे बंद झाले. लहान लहान. परत उभे राहिले नाहीत.

शेतकऱ्यांच्या बाबतीत तर, आज आमच्या नाशिक येथे रास्ता रोको चालू आहे. कांद्याच्याबाबतीत. फेकून देतात कांदा. का, दीड महिन्यांपूर्वी बरा भाव होता. पण, ते शिर्डीला आले होते. त्यावेळी प्रधानमंत्री आवासची घरं देण्यासाठी लोकांना बोलावले होते. बसमधून. त्याच्यासाठी दोन- तीन कोटी रुपयांची ऑर्डर निघाली. सरकारची. अमुक तमुक जिल्ह्यात ५० लाख. इकडे



बूथ कमिटीच्या उत्तम कामाबद्दल राजेंद्र शिंगणे यांचा छगन भुजबळ सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना, शेजारी अजित पवार, जयंत पाटील व बुलढाणा जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी.

एक कोटी. एवढ्या बस आणायच्या. त्यात लोकं भरायची आणि प्रधानमंत्र्यांसमोर ती आणून बसवायची. आयुष्यात पहिल्यांदा असं बघितलं. पण ऑर्डर निघाली की लोकांना घेऊन या. पण कोणाला तिथं घर मिळालं. काही नाही. त्यावेळी त्यांना कानात कोणी तरी सांगितले की, कांदे फार महाग आहेत. गेले दिल्लीला. दिल्लीतील सगळ्या व्यापाऱ्यांवर रेड. लासलगावातील आमच्या सगळ्या व्यापाऱ्यांवर रेड. व्यापाऱ्यांनी धंदाच बंद करून टाकला. घ्यायचाच नाही कांदा. तो जो कांदा पडला, तो अजून तसाच आहे. आता तर रस्त्यावर कांदा ठेवतात आणि घेऊन जा, घेऊन जा म्हणतात. सगळ्यात गरीब जो शेतकरी आहे, तो कांद्याचा शेतकरी आहे. तो काही बागायती शेतकरी नाही. त्याला आठ रुपये किलोला खर्च येतो आणि त्याला आठ आणेसुद्धा मिळत नाही. ट्रॅक्टरचे भाडेही निघत नाही. म्हणून ते बाहेर आणून ठेवतात. घेऊन जा म्हणतात. काय परिस्थिती आहे.

दरवर्षी दोन कोटी बेरोजगारांना रोजगार देणार म्हणाले, दिले का कोणाला. कोणाला दिले. कोणाला नाही मिळाले. १५ लाख रुपये येणार, कुठे गेले १५ लाख रुपये. एक एक गोष्ट आहे, जी बोलाची कढी आणि बोलाचाच भात. काही नाही. शेवटी आज लोकं त्यांना धडा शिकवायला उभे राहिले आहेत. पण त्यांनी देशाला कित्येक वर्षे मागे टाकले आहे. लोकांना अडचणीत टाकले आहे.

मिडियाच्या लोकांनाही किती त्रास आहे, मला कल्पना आहे. राजदीप सरदेसाई असेल, बरखा दत्त असेल, प्रसून वाजपेयी असेल, निखिल वागळे असेल, तुम्ही त्यांच्या विरुद्ध बोलले की, कारवाई सुरू. मग एनडीटीव्ही असेल किंवा इतर ते रात्री डायरेक्ट ब्लॅक आउटच होतो. प्राइम टाइम चालू है, ब्लॅक आउट. त्यांच्या सर्व धंदाच त्या जाहिरातींवर आहे. जर तो ब्लॅक आउट झाला तर लोकं म्हणतात, तुम्हाला का जाहिरात द्यायची. सगळं चॅनेलच बंद पडतं. मग ते म्हणतात, जाऊदे. एक एकाला बाजूला करतात. नको बाबा तो. आमचा चॅनेल चालवायचा आहे. मीडियाचे तोंड बंद करण्याची कामगिरी त्या काळामध्ये झाली. आता काय बंद करणार ते. आता ते बिचारे दाखवतायेत, काँग्रेस इतना आगे है. बढोती ले रहै है. बीजेपी पिछे है. जर तुम्ही असं कराल, तर लोकं तुम्हाला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाहीत.




तुम्हाला आम्हाला स्वस्थ बसून चालणार नाही. माझी तुम्हाला विनंती आहे की, निवडणुकीच्या बाबतीत आपल्या मनात आहे, ते मनात ठेवा. यांना मुख्यमंत्री करायचे आहे, यांना पंतप्रधान करायेच आहे, हे कोणीही बोलू नका. तुम्हाला कल्पना नाही. मागच्या नाशिकच्या लोकसभेच्या निवडणुकीवेळी आमचे एक असेच बोलले. अबकी बार, पवारसाहेब. म्हटलो, झाले आता पाडापाडीलाच सुरवात झाली. हे लक्षात घ्या की, काँग्रेस आणि आपण एकत्रित जाणार आहोत. त्यामुळे ते बोलत असताना काय व्हायचे ते होईल ना. परंतु आपण बोलून करायचे नाही. आपण फार जवळचे आहोत, हे दाखविण्याचे काही कारण नाही. मी अशा लोकांना चमचा म्हणतो. पण, चमचा पूर्ण ताटच खलास करून टाकतो. आपण काम करायचे, काही बोलायचे नाही. आपला खासदार निवडून आणायचा. आपला आमदार निवडून आणायचा.

पवारसाहेबांची किंमत काय आहे, सगळं माहिती आहे. देशातील सर्व नेते जाणून आहेत. ते आपल्याला बोलायचे काय कारण आहे. आपण खासदार पाठवले पाहिजेत. खासदारच जर नाही पाठवले, तर काय होईल. त्यासाठी काम केले पाहिजे. खासदार पाठवायचे असतील, तर तुम्हाला सर्व लोकांना बरोबर घेऊन काम करावे लागेल. तुम्हाला मागासवर्गीयांना, एससीला, एसटीला, मराठा समाजाला सर्वांना बरोबर न्यावे लागेल. सगळ्यांना बरोबर घेऊन जावे लागेल. तुम्ही जर त्या नरेंद्र मोदीगत ५६ इंचाची छाती काढून चाललात तर ती ३६ इंचांची होऊन जाईल. परखड बोलतोय मी. राग येईल तुम्हाला. पण, या वेळीची निवडणूक तुम्हाला गफलतीने घेऊन चालणार नाही. कुठल्याही परिस्थितीत आपल्याला लोकसभा आणि महाराष्ट्राची विधानसभा जिंकायचीच आहे. त्यामुळे जेवढे नम्र होता येईल, तेवढे नम्र व्हा. प्रेमाने लोकांशी बोला. सर्वांना बरोबर घ्या. आपलं काम बोलतं, हे जर तुम्ही लक्षात ठेवलं तर,

हर कामयाबी पर अपना नाम होगा. आपके हर कदम पर दुनिया का सलमा होगा. मुश्कीले तो बहुत आयी. मुश्कीलोंका सामना हिंमत से करना. मुश्कीले तो बहुत डालेंगे. चूप बैठनेवाले नहीं है. मुश्कीलोंका सामना हिंमत से करना. एक दिन वक्त आपका गुलाम होगा.

लढाई आहे. मगर परिवर्तन करणार. परिवर्तन करने के लिए हमे बहुत झेलना पडेगा. बहुत कष्ट करना पडेगा.

ना थके पैर कभी. ना हिंमत हारी है.
ना थके पैर कभी. ना हिंमत हारी है.
जजबा है जिंदगी में परिवर्तन का
इसलिए सफर जारी है.

चलना है. डरना नही. कौन क्या करता है. परिवर्तन चाहिएना आपको, तो सफर जारी रखना पडेगा. त्रास देतील. देऊद्या ना. आम्हाला काय कमी त्रास झाला. दोन अडीच वर्षे. लोकांना वाटले हा काही बाहेर येणारच नाही. ज्यांनी आत टाकलं, त्यांना वाटलं की हा बाहेर जो गप्प बसलं, तो तोंडच उघडणार नाही. त्यांना माहिती नाही, माझं डबल चाललेलं आहे. कारण नसताना तुम्ही लोकांना त्रास देता. बदल्याची भावना नाही माझी. मला इतका त्रास झाला, त्याची सुद्धा फिकीर नाही.

प्रश्न असा आहे की, तुम्ही या देशातील लोकांचे वाटोळे केलयं, या देशाचे वाटोळे केले आहे. तुम्ही शेतकऱ्यांचे वाटोळे केले, तुम्ही मीडियाचे वाटोळे केले, तुम्ही रिझर्व बँकेचे वाटोळे केले. तुम्ही न्याय यंत्रणेचे वाटोळे केले, तुम्ही सगळ्यांचे वाटोळे केले. कुठंही जी घडी होती, ती नेस्तनाबूत केली. तुम्हाला फक्त नेहरूंवर बोलायचे. सोनिया गांधींवर बोलायचे. अरे, कुठे



नेहरूबाबा आणि कुठे तुम्ही. जरा बोलले की, मै छोटे जाती का हूं, इसलिए मुझे बोल रहे है. छोटे जातीचे काय, आम्ही पण छोटे जातीचेच आहोत ना. काय झालं. मैने चाय बेचा. अरे चाय कोन विकत नाही का रे. मी पण भाजी विकत होतो. आता मी पण सांगू का, मी भाजी विकत होतो. मला सांगायचे आहे की, अरे बाबा, तुला काम दिले आहे ना देश सांभाळण्याचे, देशाला पुढे नेण्याचे, त्या संदर्भात बोलणा तू. पण नाही. नेहरूंनी काय केले, इंदिरा गांधींनी काय केले. अरे, तुम्ही काय केले ते सांगा. लहानपणी काय झाले, राहू द्या आता ते काय झालं ते. ज्या स्टेशनबद्दल बोलतात, ते स्टेशनच नव्हतं त्यावेळी.

म्हणून लढाईस सुरवात होत आहे. किंबहुना ती सुरू झाली आहे. जोपर्यंत आपण विजयी होत नाही, तोपर्यंत आपण थांबायचे नाही. आणि कष्ट व त्रास होतोय, कधी आम्हाला, कधी या नेत्याला, कधी त्या नेत्याला, कधी कार्यकर्त्याला. कधी कोणाला नोटीस देतायेत, कधी कोणाला तडीपार करतायेत. काय काय करतायेत. आपल्याला कल्पना आहे की, कार्यकर्त्याला किती त्रास होता. हा आपल्या पक्षाचा नाही ना. ते आपल्याला सहन करावे लागेल.

जिंदगी के तपीश को मुस्कुराकर झेलिएगा
धूप चाहे कितनी भी हो समंदर सुख नही करते.

तुम्ही कितीही त्रास दिला तरी, समुद्र काय आटतो का. त्या समुद्रासारखे विशाल हृदय आणि हिंमत तुमच्यात पाहिजे. किती त्रास देणार. मी घाबरणार नाही. मागे हटणार नाही. माझी हिंमत कमी होणार नाही. मी समाजासाठी काम करतो आहे. मी लढत राहणार. मी बोलत राहणार. तुम्ही मला कितीही त्रास द्या. पवारसाहेबांना काय कमी त्रास आहे. देशातील अनेक नेत्यांना काही ना काही त्रास आहे. मनस्ताप देण्याचे काम सुरू आहे. अडचणीत टाकण्याचे काम सुरू आहे. पण, घाबरण्याचे काम नाही. कारण, तुमच्या आमच्या नेत्याचे नाव आहे, शरद पवार. सगळ्या क्षेत्रात ज्यांचे काम आहे. सगळ्या क्षेत्रात ज्यांचा अभ्यास आहे. आणि सगळ्या क्षेत्रात अभ्यास केल्यानंतर त्यातून निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यात ज्यांचा हातखंडा आहे. ज्यांची तेवढी किंमत आहे. ज्यांच्या शब्दाला तेवढे वजन आहे. असा नेता हिंदुस्थानात एकमेव आहे, त्यांचे नाव आहे, शरद पवार. त्यामुळे मी तुम्हाला अधिक न सांगता, एवढेच सांगेल, की हे जे स्वप्न आहे. पवारसाहेबांचे, तुमचे, आमचे, सर्वांचे.

ठीक आहे आपण आता समजायचे की, ही पाच वर्षे आयुष्यातील एका काळ रात्री सारखी गेली. परंतु आता ही काळ रात्र आपल्याला संपवावी लागेल. १४ साली असं वाटायचे की, काही तरी नवीन घडणार आहे. प्रत्येकाच्या घरावर सोन्याची कौले चढणार आहेत. प्रत्येकाच्या खात्यावर १५-१५ लाख रुपये येणार आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार आहेत. देशातील बेरोजगारांचे प्रश्न सुटणार आहेत. पण आता आबोसी, एससी, एसटी शिष्यवृत्तीचे पैसे जात नाही. सगळीकडे अंधार आहे. स्मार्ट सिटी सोडा, सगळंच. फक्त स्मार्ट पंतप्रधान आपल्याला दिसतात. जॅकेट घातलेले. आपल्याला काय वाटत होते. उषःकाल होता होता काळरात्र झाली. चला आयुष्याच्या पेटवा मशाली. आपल्याला लोकांना वाटले होते की, काही तरी नवीन होणार. पण या देशात काळ रात्र झाली. त्यासाठी आपल्याला पुन्हा एकदा उठले पाहिजे. आयुष्याच्या मशाली पेटवून उठले पाहिजे.

लोकशाहीला नख लावणारे जे सरकार इथं बसलेले आहे. संविधान जाळले तरी कोणावर एफआयआर होत नाही, आणि कुठे मनुस्मृती जाळली, तर त्याच्यावर लगेच गुन्हे दाखल केले. म्हणजे मनुस्मृती जाळली तर एफआयआर आणि संविधान जाळले तर काहीच नाही. आपला कोणत्या व्यक्तीला विरोध नाही. पण, मनुस्मृतीच्या माध्यमातून इथं जे दुष्टचक्र येऊ पाहत आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचे समतेचे चक्र उलटे फिरविण्याचे काम सध्या चालू आहे. आंबे खा, मुलेच होतील, असं म्हणतात. काय सांगायचे. म्हणून मी जास्त काही बोलत नाही. तुझे आंबे तूच खा. विज्ञानाची कास धरा. पवारसाहेबांनी पण तेच सांगितले. नेहरू सेंटरच्या माध्यमातून ते विज्ञानाचा प्रचार-प्रसार करत असतात. कशासाठी ते. भिडेंचे ते खरे असते, तर पवारसाहेबांनीसुद्धा बारामतीतल्या सर्व शेतात आंबेच आंबे लावले असते. लोकांच गंमत वाटते. कसं काय बोलतात काय. त्यामुळे त्यांना सांगितले पाहिजे की, आता तुमचं बास झाल. आता आम्हाला पवारसाहेबांचे ऐकायचे आहे. तुम्ही गेल्या चार वर्षात जे काम केले आहे, त्याची पावती तुम्हाला या तीन- चार राज्यात मिळाली आहे. बाकीच्या ज्या काही पावत्या आहेत, त्या तुम्हाला आम्ही पुढच्या निवडणुकीत जरूर घरी पाठवून देऊ.

# महाराष्ट्रातील प्रत्येक बूथवर कार्यकर्ते उभे करण्याचे स्वप्न

## जयंत पाटील यांचे उद्गार



आपण सर्वांनी चला देऊया मदतीचा हात ही संकल्पना ठेवून काम करण्याची आवश्यकता आहे. पवारसाहेबांचा वाढदिवस आहे, पण त्यांचीच अशी भूमिका आहे की, महाराष्ट्राचा फार मोठा भाग दुष्काळाने अडचणीत आलेला आहे. आपल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी त्या त्या भागात जाऊन मदतीचा हात देण्याची गरज आहे. म्हणून आपण आपल्या पातळीवर महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यात जे गाव संकटात आहे, दुष्काळात आहे. दुष्काळ जाहीर झाला आहे, पण सरकारच्या मदती पोचलेल्या नाहीत, तिथं जाऊन तिथल्या जनतेला आपल्या मदतीचा हात देण्याचा प्रयत्न सर्व कार्यकर्त्यांनी करायचा आहे. आदरणीय पवारसाहेबांच्या सूचनेनुसार वाढदिवसाला हारतुरे या सगळ्या गोष्टींना फाटा दिला आहे. आणि त्यांनी आवाहन केले आहे की, दुष्काळी भागात जाऊन दुष्काळी माणसाला मदत करण्याचे काम राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने करावे.

आपल्या सर्वांना माहिती आहे की, महाराष्ट्राची सेवा करताना सर्व क्षेत्रात सर्व विषयांना स्पर्श करणार नेता म्हणून महाराष्ट्र पवारसाहेबांकडे पाहतो. राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष म्हणून माझी अपेक्षा आहे की, जेवढे कष्ट पवारसाहेबांनी महाराष्ट्रात उपसले, देशात उपसले, महाराष्ट्राचा असा कोणताही भाग राहिला नाही की, ज्या ठिकाणी साहेबांनी दहा वेळेपेक्षा कमी वेळा भेटी दिल्या असतील. अनेक वेळा अनेक ठिकाणी जाऊन पवारसाहेबांनी त्या त्या भागातील शेतकऱ्यांना, नागरिकांना ग्रामीण भागातील, शहरी भागातील नागरिकांना दिलासा देण्याची भूमिका बजावली.

देशाचे कृषिमंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी सर्वांच्या समोर आहे. आणि म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वाढविण्याची जबाबदारी तेवढीच आपली आहे. त्यासाठी गेली चार महिने आपण एक वेगळी कल्पना राबवत आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक बूथवर बूथ कमिटी बांधण्याचे काम आपण करत आहोत. सुरवातीला काही जण माझ्या कानात सांगायचे, हे काय नवीन काढले. असा कधी पक्ष असतो का. असं कधी केलय का. आपण काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसवाले आपल्याला हे काय जमणार आहे का. अशा वेगवेगळ्या गोष्टी अनेकांनी माझ्या कानावर टाकण्याचा प्रयत्न केला. पण आपल्याला पक्ष तळागाळात पोचविण्यासाठी हेच केले पाहिजे, याची खात्री आपल्या नेत्यांची झाली, मग आपण हा कार्यक्रम हाती घेतला. सर्वसाधारणपणे या पूर्वी कमिट्या केल्या होत्या, असं नाही. पण, त्या कागदावर असायच्या आणि ज्या कागदावर कमिट्या असायच्या त्या प्रत्यक्ष बूथवर उभ्या राहणाऱ्या कार्यकर्त्यांच्या नसतात. मग तो कागद तसाच राहतो आणि मतदानाच्या दिवशी सकाळी सहा वाजता वेगळीच माणसं आपल्याला बोलवायला लागतात. महाराष्ट्रात



बूथ कमिट्या तयार करताना निवडणुका हा आपला उद्देश नाहीये. आपण आता हे लक्षात ठेवले पाहिजे की, पक्षबांधणी करण्यासाठी आपल्या सगळ्यांना आता तळागाळातून प्रयत्न केले पाहिजेत. आणि म्हणून त्या बूथ कमिटीवरचा प्रत्येक कार्यकर्ता, मग त्या बूथ कमिटीवरती २० सदस्य असतील, २५ सदस्य असतील, तर त्यांनी त्यांच्या मतदारयाद्या वाटून घ्यायच्या, घरं वाटून घ्यायची. जर एकाने आठ घरांची जबाबदारी घेतली, तर त्या आठ माणसांना आपला एकच मेसेंजर असणार. की जो त्या आठ घरात जाईल आणि प्रचार करेल. जो काही पक्षाचे काम करायचे असेल, ज्या काही योजना असेल ते करेल. ही निवडणुकीपुरती यंत्रणा आहे, हे डोक्यातून काढा. तर ही कायमस्वरूपाची यंत्रणा आहे.

पुढचा टप्पा हा आपला आहे की, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसची जी कार्यकारिणी आहे, जिल्हा कार्यकारिणी आहे, त्यांना या ॲपमध्ये एकत्रित करायचे. हे करत असताना खालून वर येत असणाऱ्या कार्यकर्त्याला जर सत्ता येत असताना आला आणि एखादे जबाबदारीचे पद घेऊन गेला, असं भविष्यकाळात होऊ नये, यासाठी पक्षाची बांधणी तळागाळात होत आहे. त्यामुळे कृपा करून याला दुर्लक्षित करू नका. निवडणुका झाल्यावर सत्ता येणार, हे आजच्या निवडणुकांवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मला चिंता वाटत नाही, पण याच धोरणाने पक्ष पुढे चालेल. हे सांगणं आज माझं कर्तव्य आहे. आणि या धोरणाने पक्ष चालला तरच पक्षाला जास्त महत्त्व येईल. ही भूमिका घेऊन आदरणीय पवारसाहेबांपासून सर्वांनी कामाला सुरवात केली आहे.

बूथवर काम करणे म्हणजे काय, याचे आपल्याला त्यांना प्रशिक्षण द्यायचे आहे. आज मला आनंद आहे की, बऱ्याच विधानसभा मतदारसंघात १०० टक्क्यांपेक्षा जास्त बूथ कमिट्या स्थापन झालेल्या आहेत. म्हणजे माझ्या मतदारसंघात २८३ बूथ असतील तर २८३ गुणिले १० म्हणजे २८३० कार्यकर्ते झाले की, आपण १०० टक्के काम झाले, असे म्हणतो. जर २८३० ऐवजी साडेचार हजार लोकं झाली, तर १५६ टक्के काम झाले, १८० टक्के काम झालं, असं आपण समजू शकतो. त्यामुळे ज्या मतदारसंघात १०० टक्के काम झालं, तेथील कार्यकर्त्यांना बोलावून अजितदादा, भुजबळसाहेबांना सांगितले की, या कार्यकर्त्यांच्या पाठीवर प्रोत्साहनाची थाप टाकावी. कौतुक करावे. मला अपेक्षा आहे की, उरलेल्या मतदारसंघातही हे काम झाले पाहिजे.

शेवटी आपली मानसिकता काय आहे की, हा मतदारसंघ आपण लढवत नाही तर कशाला काम करायचे. पण ही मानसिकता बंद झाली पाहिजे. मघाशी जी चित्रफीत पाहिली, त्याचे धोरणच हे आहे की, पवारसाहेबांनी महाराष्ट्रात सर्वस्पर्शी काम केलेले असल्यावर महाराष्ट्रात सर्वांत मोठा पक्ष हा आपलाच

असला पाहिजे, ही भावना असली पाहिजे. भले एखाद्या मतदारसंघात आपण चार विधानसभा निवडणुका लढवलेल्या नसतील, लोकसभेच्या लढवलेल्या नसतील, पण पक्ष वाढविण्यास आपल्याला कोणी बंदी तर नाही केली. पक्ष हा वाढवलाच पाहिजे. जर तिथे माणसे अस्तित्वात नसतील, कमी पडत असतील, तरी आपण त्या ठिकाणी बूथ लेवलच्या कमिट्या करूयात. बूथ लेवलच्या कमिट्या तयार करून त्या ठिकाणी पक्षाला एक आकार तयार होईल. आता तुमच्या मनात प्रश्न असेल की, या कमिट्या करून करायचे काय. तर या कमिट्या केल्यानंतर आपण संपूर्ण महाराष्ट्रात या कमिटी सदस्यांचे मतदारसंघ मेळावे किंवा शिबिरे घेणार आहोत. आपण त्यासाठी वक्ते निश्चित केले आहेत. वक्त्यांचे शिबिर लोणावळ्याला झाले आहे, आता त्या यादीत सगळे माझ्या आसपास फिरणारे होते. मी म्हटलो, हे असे असेल तर काही बरोबर नाही. तेव्हापासून आम्ही आमच्या धोरणात सुधारणा केल्या. तसं, जे अजितदादांच्या, भुजबळसाहेबांच्या, तटकरेसाहेबांच्या, धनंजय मुंडेच्या पुढे पुढे करतात त्या सगळ्या नेत्यांना विनंती आहे की, त्यांना फक्त विचारा की, तुझ्या मतदारसंघात बूथ कमिटी झाली का. आणि जर हो म्हटला तर त्याला विचारा की, तुझ्या बूथ कमिटीचा नंबर सांग. त्यामुळे आता दादांकडे कोणी वेगळ्या कामाला गेले तर ते सांगतात, आधी पक्ष सत्तेत आणा.

सांगायचा उद्देश हाच आहे की, कार्यकर्त्यांनी मनापासून काम करावे. मला सांगायला आनंद होत आहे की, आजपर्यंत महाराष्ट्रात २ लाख ३० हजार कार्यकर्ते बूथ कमिटीवर एनरोल



राज्याच्या ओबीसी सेलचे प्रमुक ईश्वर बाळबुधे हे संविधानाची प्रत सुनील तटकरे यांना भेट देताना, शेजारी राजेश टोपे, धनंजय मुंडे, अजित पवार व जयंत पाटील.

लवकरच एक शिबिर होईल. आणि देशातील जनतेसमोरचे प्रश्न आणि भाजप- शिवसेनेच्या त्रुटी, चुका भ्रष्टाचार, त्यांचे चुकीचे निर्णय अर्थव्यवस्थेला किती घातक आहेत, शेतकऱ्यांना किती घातक आहेत, याचे विवेचन प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील दोन- तीन हजार कार्यकर्त्यांना करताना एखादा मोठा नेताही तेथे येऊन मार्गदर्शन करणार आहे. त्यामुळे प्रत्येक विधानसभा मतदारसंघातही आपल्याला काम करायचे आहे. म्हणून माझी सर्वांना विनंती आहे की, आपण हे गांभीर्याने घेतले पाहिजे. फक्त पवारसाहेबांच्या भोवती फिरले म्हणजे, पक्षाचे काम झाले, हे मी अध्यक्ष जयंत पाटील मानणार नाही.

मी एक उदाहरण देतो. आमची राजारामबापू बँक आहे. तिच्या अध्यक्षांनी मला एक यादी दिली. हे थकलेले आहेत. झाले आहेत. आता फक्त एनरोल झाले म्हणजे काम झाले, असं नाही. तर व्यवस्था अशी आहे की, मी महाराष्ट्राचा अध्यक्ष असेल तरी मी जिल्हा अध्यक्षाचे नाव, नंबर, फोटो माझ्या मोबाईलमध्ये घातलय. मग त्या जिल्हाध्यक्षांनी गुगल स्टोअरवरून ते अप डाऊनलोड केले की, मते ॲप चालू होतं. मग त्याची जबाबदारी आहे की, तालुका किंवा विधानसभा अध्यक्षांचे डिटेल्स घालायचे. मग त्याचे ॲप चालते. मग तालुकाध्यक्षांनी बूथ कमिटीच्या अध्यक्षांचे डिटेल्स घालायचे, मग बूथ कमिटीच्या अध्यक्षांनी १०-२०-३० सदस्यांचे डिटेल्स घालायचे. आपले कार्यकर्ते जर कामाला लागले तर महाराष्ट्रात कोणाचीही ताकद नसेल, एवढी ताकद आपली आहे, हा माझा गेल्या पंधरा दिवसात आलेला अनुभव आहे. रोज सहा हजार, आठ हजार, दहा हजार कार्यकर्ते

एनरोल होत आहेत. फक्त एनरोल होऊन चालत नाही, तर ते ॲप गुगल स्टोअरवरून डाऊनलोड केले पाहिजे. मग माझ्या मोबाईलवर त्या बूथ सदस्याच्या नावासमोरचा रंग आहे, तो हिरवा होतो. नाहीतर ते पिवळे राहते. त्यांनी आपले एनसीपी कनेक्ट ॲप डाऊनलोड केले नाही आणि त्याचा वापर सुरू केलेला नाही. आपल्याला लेवल गाठायची आहे की, प्रत्येक बूथ लेवलच्या कार्यकर्त्याचे अप चालू झाले पाहिजे.

काही कार्यकर्ते साधा फोन वापरतात. त्यावरून ॲप डाऊनलोड होणार नाही. त्याला आपला साधा मेसेज जाऊ शकेल. पण, मी त्या ॲपवरून जर एक मेसेज टाकला, तर त्या आता दोन लाख ३० हजार आहेत, पण पाच एक लाख कार्यकर्ते या पुढच्या एक दोन महिन्यात एनरोल होतील. त्या पाच लाख कार्यकर्त्यांना



सारंग पाटील हे संविधानाची प्रत दिलीप वळसे पाटील यांना भेट देताना.

एक झटक्यात मेसेज पोचवू. नऊ लाखापर्यंत जाण्याची क्षमता आपण आपल्या ॲपमध्ये केलेली आहे. त्यामुळे बूथ लेवलचा कार्यकर्ता त्याच्याकडील माहिती तालुक्याला, जिल्ह्याला, राज्याला देऊ शकतो. मागणी करू शकतो. परिस्थितीची जाणीव करून देऊ शकतो. दुहेरी संवाद आहे. वरून खालपर्यंत आणि खालून वरपर्यंत. म्हणून हे संवादाचे नवीन अस्त्र आहे, ते आपल्या मतदारसंघात पोचेल, याचे काम करावे.

मी पक्षाचा अध्यक्ष म्हणून पक्षाला सुचवले आहे की, या कामात ज्या विधानसभा मतदारसंघात दुर्लक्ष होतय, बऱ्याच लोकांना वाटतयं की, आपल्या कार्यकर्त्यांची यादी जर बाहेर मिळाली, तर आपले गुपित उघड होईल. तर ती त्या ॲपशिवाय कुठेही डाऊनलोड होऊ शकत नाही. बाहेर जाऊ शकत नाही. जो बूथचा अध्यक्ष आहे, त्याला त्याच्या १५ लोकांशिवाय पलीकडची माहिती येऊ शकत नाही. जो तालुक्याचा प्रमुख आहे, जो विधानसभा लढणार आहे, त्याच्याशिवाय कोणाकडेही माहिती जाऊ शकत नाही. जिल्हाध्यक्षाकडे जाऊ शकते. प्रदेशाध्यक्षांकडे जाऊ शकते. म्हणजे माहिती हॅक करण्याची व्यवस्था यामध्ये नाही. त्यामुळे ज्यांना वाटते की, आपली माहिती घेतली जाईल. पण, गावात कोणालाही विचारले की, या बूथवर कोण काम करतं आणि त्या बूथवर कोण काम करते, तर कोणीही सांगेल. त्यामुळे कृपाकरून या सिस्टिममध्ये सर्वांनी आले पाहिजे. हा पक्षाचा धोरणात्मक निर्णय आहे.

पवारसाहेबांच्या वाढदिवसानिमित्ताने आपण ताकदीने काम करायला सुरवात करूयात. २५ डिसेंबर नंतर १५ दिवस आपण स्थानिक प्रश्नांसंबंधी आंदोलन करायचे आहे. राष्ट्रवादीचे आंदोलन दुष्काळापासून पाण्याचा प्रश्न असेल, तालुकाध्यक्षांनी आणि तालुक्याच्या पुढाऱ्यांनी आंदोलन १५ दिवस करण्याची भूमिका आपण घेतलेली आहे. हा आपला धोरणात्मक निर्णय झालेला आहे. त्यानंतर १५ जानेवारीपासून आपण बूथ लेवलच्या कमिट्यांची शिबिरे चालू करत आहोत. ती शिबिरे म्हणजे सभाच होणार आहे. प्रत्येक मतदारसंघातील तीन-चार हजार कार्यकर्त्यांना बोलवणार आहात. चार ते पाच तासांचे ते शिबिर होणार आहे. त्याचे उद्घाटन आणि समारोप आपल्या मान्यवर नेत्यांच्या उपस्थित होणार आहे. त्यामुळे त्या शिबिरांनी अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यानंतर येणाऱ्या लोकसभा निवडणुकींच्या तयारीसाठी लोकांच्या प्रश्नांशी जोडून अधिक ताकदीने काम करण्याची गरज आहे.


ज्यांनी हे काम केले त्यांचे अभिनंदन. कारण, हे काम अवघड आहे. पण, ज्यांनी हे काम केलेले नाही, जे निवांत मागे टेकून आहेत. तर मी पक्षाकडे परवानगी मागणार आहे, की नेमणुका आपण केल्या, सर्वांच्या मनाने, पण जिल्ह्यामध्ये कामच नसेल, तिथल्या जिल्हाध्यक्षाला नारळ देण्याची परवानगी मला पक्षाने द्यावी. आणि काही लोकांना निरोप दिल्याशिवाय बाकीचे कामाला लागणार नाही. शेवटी सर्वांना इंजेक्शन टोचायचे नसते, पण एकाला टोचल्यानंतर बाकीचे कामाला लागतात. शेवटी आपल्याला हे काम करायचे आहे. पवारसाहेबांना जर त्यांच्या वाढदिवसाची खरी भेट द्यायची असेल, तर महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना मी आवाहन करेन की, बूथ कमिटीच आपण जो हा कार्यक्रम केला आहे, तो महाराष्ट्रातील ९१ हजार बूथपर्यंत आपण पोचवूया. महाराष्ट्रातील प्रत्येक बूथवर कार्यकर्ते उभे करण्याचे स्वप्न आपण बाळगूया. पवारसाहेबांना ७८ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत असताना, हीच शपथ घेऊन आपण बाहेर पडाल, अशी अपेक्षा मी बाळगतो.

आदरणीय पवारसाहेबांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत असताना मी देशातील तमाम महिलांच्या वतीने ऋण व्यक्त करते, कारण त्यांच्यामुळे आम्ही देशातील महिला या ठिकाणी पोचलो आहोत, ते साहेबांमुळे आहोत. त्यामुळे मी सर्वांच्या वतीने येथे साहेबांचे ऋण व्यक्त करते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोणीतरी विचारले की, एक यशस्वी व्यक्ती आणि एक महान व्यक्तीमध्ये काय फरक आहे. बाबासाहेब म्हणाले, जो समाजसेवेसाठी सतत तयार असतो, तो व्यक्ती महान असतो. महापुरुष असतो. आता आपण चित्रफीत पाहिली. २४ तासातील १८ तास काम करणारी जी व्यक्ती आहे, तो महापुरुष नाही तर काय आहे. जो व्यक्ती लोकप्रतिनिधीच्या रुपामध्ये समाज आणि संविधानाप्रती बांधीलकी प्रत्येक क्षण ठेवतो, तो महापुरुष नाही तर कोण आहे. ज्या ज्या वेळी समाजामध्ये असमानता दिसली, ज्या ज्या वेळी अन्याय समोर आला, त्यावेळी जो व्यक्ती ठामपणे पारंपरिक व्यक्तींच्या विरोधात हिमतीने, शक्तीने उभा राहिला, अशांना आपण समाजसुधारकच म्हणणार. मग ते राजाराम मोहन राय असो, शाहू महाराज असो, महात्मा फुले असो, सावित्रीबाई फुले असो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असो, यशवंतराव चव्हाण असो की शरदचंद्र पवार असो.

हे जे महापुरुष आहेत, त्यांना एक दृष्टी, समाजसेवेची भावना, आणि स्वतःला समाजासाठी झोकून देण्याचे त्यांचे जे कार्य आहे, हे सर्व देशाने मान्य केले आहे. त्यामुळे आम्ही महिला ऋण व्यक्त करतो. १९९२ मध्ये पवारसाहेब हे ज्यावेळी





सक्षणा सलगर या भारतीय संविधानाची प्रत फौजिया खान यांना भेट देताना, शेजारी चित्रा वाघ.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, त्यावेळी पवारसाहेबांनी पहिल्यांदा एक निर्णय घेतला, आणि तो फार महत्त्वाचा निर्णय होता आणि तो निर्णय पवारसाहेबांची दृष्टी काय आहे, ते दाखवणारा होता.

असं सांगण्यात येते की, ५० टक्के वर्गाला जर मागे ठेवले तर कुठलाही देश प्रगती करू शकणार नाही. ही दूरदृष्टी ठेवून पवारसाहेबांनी पहिल्यांदा महिला बालविकास विभाग स्थापन केला. हा विभाग स्वतंत्र केला. हा विभाग दुसऱ्या विभागाशी जोडलेला होता. त्यांनी हा विभाग स्वतंत्र केला आणि स्वतःकडे म्हणजे मुख्यमंत्र्यांकडे हा विभाग घेतला. एकदा मुख्यमंत्र्यांकडे विभाग असला की, त्याला एक दर्जा मिळतो, एक सन्मान मिळतो. राजकीय ताकद त्याच्या मागे असते.

त्यानंतर महिला धोरण आखण्यात आले. त्यानंतर महिला धोरणाचा ड्राफ्ट तयार करण्यात आला. प्रवाहाच्या विरोधात जाणे फार अवघड असते. महिलांसाठी हा निर्णय घेत असताना अनेक अडथळे आले. अनेक वेळा पवारसाहेब मिटिंगमध्ये तासनतास बसून राहिले. अनेक वेळा तो प्रस्ताव परत गेला. पवारसाहेबांनी तो परत आणला. शेवटी महिला धोरण मंजूर करण्यात आले. कॅबिनेटने त्याला मान्यता दिली. त्यानंतर महिला धोरण सुरू झाले. त्यानंतर पवारसाहेब पंतप्रधानांकडे गेले. त्यांनी तिकडे लोकसभेच्या सभासदांना सादरीकरण केले की, आम्ही महाराष्ट्रामध्ये महिला धोरण आणले आहे, ते सगळ्या देशात आले

# मोदींचा तीन तलाकचा निर्णय हा कावळ्याला कोंबडा म्हणून विकण्याचा प्रयत्न

## फौजिया खान यांची टीका

पाहिजे. त्यानंतर राष्ट्रीय महिला धोरण आणण्यात आले. ज्याचा परिणाम आपण बघतो की, माझी भगिनी आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आहे. त्याला आरक्षण देण्यात आले आहे. नोकऱ्यांमध्ये आरक्षण आहे. राजकारणात आरक्षण आहे. आज जो फरक आपल्याला दिसतोय, कारण पवारसाहेबांनी महिलांना ताकद देण्याचे काम केले. तसं केलं नसतं तर आपला देश पुढे गेला नसता. कारण, ५० टक्क्यांना मागे ठेवून ते झाले नसते.

महिला धोरणामुळे अनेक योजना आल्या. या महिला धोरणाबाबत पवारसाहेबांची जी दूरदृष्टी होती, आज येथे मला सांगायला अभिमान वाटतो. फक्त महिला म्हणून नाही, जिथे जिथे पवारसाहेबांना असमानता दिसली, तिथे तिथे त्यांनी निर्णय घेतला, आणि त्यांना ताकद देण्याचा प्रयत्न केला.

आपल्या पक्षातील महिला शाखेची रचना बघा. कुठल्या समाजातील महिलेला कुठले स्थान दिले. फक्त स्थानच दिले नाही, तर त्यांनी आम्हाला पूर्णपणे स्वातंत्र्य दिले आहे की, तुम्ही काहीही निर्णय घ्या, आम्ही हस्तक्षेप करणार नाही. कारण, हे फक्त बोलण्यासाठीचे निर्णय नाहीयेत. असं कुठल्याही पक्षात आपल्याला बघायला मिळत नाहीये. कारण, मोदीजी निर्णय घेताना त्यांच्या महत्त्वाच्या मंत्र्यांनाही विश्वासात घेत नाही. त्यांनाही त्यांनी स्वातंत्र्य दिलेले नाही. आज आरबीआय, सीबीआयला स्वातंत्र्य नाही. पण, आज आपल्या पक्षातील जी लोकशाही आहे, त्याबद्दल मला अभिमान आहे. हे फक्त आणि फक्त पवारसाहेबच करू शकतात. कारण त्यांना १०० टक्क्यांचा विकास करायचा आहे. त्यांना ती दूरदृष्टी आहे.

आज मोदीजींनी तीन तलाकचा निर्णय घेतला. पवारसाहेबांनी काय निर्णय घेतला, तर देशातील सर्व महिलांची ताकद वाढली पाहिजे. दूरदृष्टी आणि मार्केटिंगमध्ये फरक आहे. मोदीजी कावळ्याला कोंबडा सांगून विकायचा प्रयत्न करतायेत. पण, कावळा कावळाच राहणार आणि कोंबडा कोंबडा राहणार. म्हणून दूरदृष्टी ठेवणाऱ्या या नेत्याला शुभेच्छा देण्यासाठी मी येथे उभी आहे. संपूर्ण महिलांच्या वतीने मी त्यांचे आभार मानते. त्यांचे ऋण व्यक्त करते.





# आगामी निवडणुकीची मोर्चेबांधणी, डावपेच व व्यूहरचना

आकाश
नवी दिल्ली

नववर्षात - २०१९मध्ये - देशाने प्रवेश केला आहे. १७वी लोकसभा निवडण्यासाठीची सार्वत्रिक निवडणूक आता तीन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. वेळापत्रकानुसार एप्रिल महिन्यापासून मतदानाच्या फेऱ्या सुरु होणे अपेक्षित आहे. सत्तापक्ष असलेला भाजप, प्रमुख विरोधी पक्ष असलेला काँग्रेस पक्ष आणि अन्य प्रादेशिक पक्षांनी आपापल्या पध्दतीने या निवडणुकीसाठी राजकीय मोर्चेबांधणी सुरु केली आहे. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये सत्तापक्षाला म्हणजेच भाजपला पाचपैकी एकाही राज्यात यश मिळू शकलेले नाही. ज्या तीन हिंदी भाषक राज्यांमध्ये - राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगढ - त्यांची सरकारे होती तेथे पक्षाचा पराभव झाला. तेथे काँग्रेसची सरकारे स्थापन झाली आहेत. एकप्रकारे सत्तापक्षाची ही निवडणुकीसाठी दोन्ही बाजूंकडून मोर्चेबांधणी, डावपेच व व्यूहरचना आखण्यास प्रारंभ झालेला आहे. सर्वच राजकीय पक्ष आपापले पत्ते आताच उघडण्यास तयार नाहीत आणि पत्ते अगदी छातीशी ठेवूनच ते सावधपणे खेळत आहेत.

या पार्श्वभूमीवरच दोन्ही बाजूंकडील संभाव्य राजकीय व्यूहरचनेचा अंदाज बांधण्यात येत आहे. स्थूल मानाने सांगायचे झाल्यास सत्तापक्षाने म्हणजेच भाजपने तीन राज्यातील पीछेहाटीनंतर आघाडीच्या राजकारणाला प्राधान्य दिलेले आहे. याचा सरळ अर्थ असा निघतो की भाजपला स्वबळावर बहुमत मिळण्याबाबत बहुधा शंका येत असावी. २०१४च्या निवडणुकीत पक्षाने इतिहासात प्रथमच २८२ जागा जिंकून स्वबळाचे बहुमत मिळविले होते. बहुमताचा जादूचा आकडा २७२ किंवा २७३




कमलनाथ यांची विजयी मिरवणूक

पीछेहाटच मानली जाते. त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकीवर या पराभवाची पडछाया अटळ राहणार आहे. त्यामुळेच भाजपमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दुसरीकडे काँग्रेसची तिन्ही राज्यात सरकारे स्थापन झाल्याने त्या पक्षात उत्साह दुथडी भरुन वाहणे अत्यंत स्वाभाविक आहे. विशेषतः छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशात पंधरा वर्षानंतर सत्तास्थापनेची संधी मिळाल्याचा काँग्रेसला आनंद विशेषत्वाने आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेच्या आगामी निवडणुकीत भाजपला केंद्रातील सत्ता टिकविण्याचे आव्हान आहे तर भाजपच्या विरोधातील पक्षांना केंद्रातील सत्तेतून भाजपला दूर करण्याचे आव्हान आहे. दोन्ही बाजूंकडील स्पर्धा ही तीव्र राहणार आहे. भाजपचे म्हणजेच पक्षाचे नेतृत्व(अमित शहा) आणि सरकारचे नेतृत्व(पंतप्रधान नरेंद्र मोदी) या दोघांवरच या 'कसोटी'तून पार होण्याची प्रमुख जबाबदारी आहे. आगामी मानला जातो. म्हणजेच या जादुई आकड्यापेक्षा भाजपला ९ जागा अधिक मिळाल्या होत्या. परंतु नंतरच्या काळात विविध कारणांनी भाजपचे संख्याबळ कमीकमी होत जात सध्या ते २७२वर घसरले आहे. त्यामुळेच भाजपला म्हणजेच मोदी-शहा जोडीला, अटलबिहारी वाजपेयींच्या काळातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीची आठवण होऊ लागली आहे. अर्थात अजुनही वर्तमान सरकार हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) म्हणूनच ओळखले जाते, कारण त्यामध्ये अकाली दल, शिवसेना, राष्ट्रीय लोक-जनशक्ति पार्टी(राम विलास पास्वान) संयुक्त जनता दल, अपना दल यासारख्या प्रादेशिक पक्षांना सामावून घेण्यात आले आहे. अर्थात या घटकपक्षांना सामावून घेताना भाजपच्या नेतृत्वाने त्यांना कस्पटासमान लेखले आहे हे निःसंशय आहे. त्यामुळेच आता भाजपची राजकीय पीछेहाट व त्यातून भाजपला मित्रपक्षांच्या

सहकार्याची वाटू लागलेली निकड यामुळे भाजपबरोबर जाणारे प्रादेशिक पक्ष काहीसे शिरजोर होणे अपरिहार्य आहे. तसे घडतही आहे. त्यांच्या मागण्यांचा दबाव भाजपवर वाढत चालला आहे. गेली चार वर्षे स्वतःच्या गुर्मीत राहिलेले सत्तापक्षाचे नेतृत्व आता या प्रादेशिक पक्षांची साथ मिळविण्यासाठी प्रसंगी आगतिक होताना आढळू लागले आहे.

भाजपबरोबर आघाडीत आणि सरकारमध्ये सामील असलेले दोन पक्ष आता वेगळे झाले आहेत. तेलगु देशमने भाजपबरोबरची आघाडी सोडली. जम्मू-काश्मीरमध्ये पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी म्हणजेच पीडीपी व भाजपचा संसार संपुष्टात आला. ताजे उदाहरण राष्ट्रीय लोक-समता पार्टीचे देता येईल. उपेंद्र कुशवाहा हे केंद्रात राज्यमंत्री होते आणि त्यांना बिहारमधील जागावाटपात भाजपने तुच्छपणे वागणूक दिल्याने त्यांनी भाजपबरोबरचे संबंध तोडून काँग्रेस व राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्वाखालील बिहारमधील 'महागठबंधन'मध्ये प्रवेश केला. महाराष्ट्रातलेच उदाहरण द्यायचे झाल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटनेने भाजपच्या आघाडीतून बाहेरचा रस्ता धरला. महाराष्ट्रात आणि केंद्र सरकारमध्ये सामील शिवसेनेने काही महिन्यांपूर्वी ते भाजपबरोबर निवडणूक लढविणार नसल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर भाजप नेतृत्वाने शिवसेनेबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी काही पावले उचलली. मंडळे-महामंडळे, विधानपरिषदेचे उपसभापतिपद वगैरे देऊन त्यांनी शिवसेनेची राजकीय नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. काहीकाळ शिवसेनेने कटुता कमी झाल्याचे संकेत दिले. परंतु ताज्या पंढरपूरच्या सभेत शिवसेनेच्या नेतृत्वाने काँग्रेसअध्यक्ष राहूल गांधी यांच्या भाषेचा आधार घेऊन 'चौकीदार चोर आहे' असा थेट हल्ला चढविल्याने पुन्हा एकदा भाजप व शिवसेना यांच्यातील संबंधांबाबत भलेमोठे प्रश्नचिन्ह उत्पन्न झाले आहे. जाणकार राजकीय निरीक्षकांच्या म्हणण्यानुसार अखेरच्या क्षणी भाजप आणि शिवसेनेची युति होईल. शिवसेनेने आघाडीसाठी घातलेल्या अटींमध्ये समसमान जागावाटप आणि लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणुका घेणे यांचा समावेश आहे. शिवसेनेला लोकसभेमध्येही २४ जागा लढवायच्या आहेत तसेच विधानसभेतही महाराष्ट्रातली प्रादेशिक पक्ष या नात्याने भाजपपेक्षा अधिक जागा किंवा किमानपक्षी १४४ जागा पदरात पाडायच्या आहेत.

या अटींवर दोन्ही पक्षात होणाऱ्या वाटाघाटींच्या फलनिष्पत्तीवर उभय पक्षातील आघाडीचे भवितव्य अवलंबुन राहील. भाजपच्या वर्तमान आघाडीत सामील अपना दल या पक्षानेही आपली नखे काढली आहेत. या पक्षाच्या अनुप्रिया पटेल या केंद्रीय मंत्रिमंडळात आरोग्य राज्यमंत्री आहेत. त्यांचे पति आशिष त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. पूर्वी अपना दल हा एकसंध पक्ष होता. अनुप्रिया पटेल यांच्या मातुःश्री व भगिनीही त्यात होत्या.त्यात फाटाफूट होऊन त्या वेगळ्या झाल्या व अनुप्रिया व त्यांच्या पतीने वेगळा गट स्थापन केला. उत्तर प्रदेशातील कुर्मी समाजाचे हा पक्ष प्रामुख्याने प्रतिनिधित्व करतो. जर हा पक्ष वेगळा झाल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाराणसी येथून लढणे अवघड होऊ शकते कारण वाराणसी लोकसभा मतदारसंघात समाविष्ट तीन विधानसभा मतदारसंघात या पक्षाचा वरचष्मा आहे. त्यामुळे या पक्षालाही चुचकारण्याची पाळी भाजपवर आलेली आहे. थोडक्यात भाजपला आपली आघाडी एकत्रित



राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर कार्यकर्त्यांच्या गराड्यात अशोक गेहलोत.



कशी राखायची यासाठी आटोकाट प्रयत्न करावे लागत आहेत. त्यासाठी प्रसंगी नमते घ्यावे लागत आहे. जे मोदी-शहा जोडीला पचविणे अवघड जात आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपचे सरचिटणीस राम माधव यांनी उत्तरेत भाजपचे काही सहकारी व मित्रपक्ष दुरावलेले असले तरी दक्षिणेत आणि ईशान्य भारतातील काही प्रादेशिक पक्षांबरोबर हातमिळवणी करुन उत्तरेत भाजपच्या जागांमध्ये होणारी संभाव्य तूट दक्षिण व ईशान्य भारतातून भरुन काढण्याचा मनसुबा व्यक्त केला आहे. त्यानुसार त्यांनी आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसचे जगनमोहन रेड्डी, तमीळनाडूत जयललिता यांच्या निधनानंतर पोरका झालेला अण्णा द्रमुक पक्ष यांच्याशी संपर्क साधलेला आहे. तमीळनाडूतील राजकारण आजही द्रविडी विचारसरणी व तत्वज्ञानाभोवती केंद्रित असल्याने तेथे भाजपची डाळ शिजणे अवघड आहे. त्यातही नेतृत्वाअभावी पोरक्या झालेल्या अण्णा द्रमुकची पीछेहाट होत असल्याची चिन्हे आहेत. जयललिता यांच्या सहकारी ससिकला आणि त्यांचे नातेवाईक(भाचे किंवा पुतणे) असलेले उद्योगपति व राजकीय नेते टीटीव्ही दिनकरण यांनी स्थापन केलेल्या पक्षाकडे अण्णा द्रमुकच्या कार्यकर्त्यांचा ओढा असल्याचे आढळून येऊ लागले आहे. ससिकला व दिनकरण हे पूर्वी बरोबर नव्हते पण आता एकत्र आले आहेत. त्यांच्याकडे साधनसंपत्तीही भरपूर आहे. आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणी ससिकला तुरुंगात आहेत परंतु दिनकरण हे पक्षाची जमवाजमव करीत आहेत. जयललिता यांच्या निधनाने रिकाम्या झालेल्या जागेवर निवडणूक लढवून दिनकरण विजयी झाले व त्यांनी अधिकृत अण्णा द्रमुक पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करुन आपला जोर सिध्द केला होता. आता भाजपने भ्रष्टाचाराचा मुद्दा बाजुला ठेवून केवळ मतांचे गणित मांडताना प्रसंगी ससिकला आणि दिनकरण यांचीही साथ घेण्याची तयारी केल्याचे समजते. याच्याच जोडीला भाजप नेतृत्वाने मांडलेल्या गणितानुसार जे प्रादेशिक पक्ष भाजपबरोबर हातमिळवणी करु इच्छित नाहीत ते भाजप-विरोधी पक्षांच्या आघाडीत सामील होणार नाहीत यासाठीही काही रणनीती किंवा डावपेच आखण्यात आले आहेत. ओडीशामधील बिजु जनता दल किंवा तेलंगणातील सत्तारूढ तेलंगणा राष्ट्रसमितीसारख्या पक्षांचा यात समावेश होतो. समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षासारख्या पक्षांनाही भाजपने डोळे वटारून दाखवलेले आहेत. या पक्षांचे प्रमुख असलेल्या नेत्यांच्या विरोधात बेहिशोबी मालमत्तेच्या प्रकरणांचा आधार घेऊन भाजप त्यांना धाक दाखवू पहात आहे.

याच मालिकेत तेलंगणा राष्ट्रसमितीचे प्रमुख व तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव(केसीआर) यांनी पुन्हा एकदा 'फेडरल फ्रंट'चे पिल्लू सोडले आहे. 'बिगर भाजप-बिगर काँग्रेस' प्रादेशिक पक्षांची स्वतंत्र आघाडी स्थापन करण्यासाठी त्यांनी 'भारत-यात्रा' सुरु केली आहे. आतापर्यंत त्यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी(तृणमूल काँग्रेस), ओडीशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक(बिजु जनता दल) यांच्याशी वार्तालाप केला आहे. या दोन्ही मुख्यमंत्र्यांनी त्यांना थंडा प्रतिसाद दिलेला आहे. ममता बॅनर्जी यांनी तर राव यांच्याबरोबर संयुक्त निवेदनाची बाबही टाळली. परंतु अचानक उत्तर प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री व समाजवादी पक्ष ताब्यात घेऊन अध्यक्ष झालेले तरुण नेते अखिलेश यादव यांनी चंद्रशेखर राव यांच्या कल्पनेला पाठिंबा दिला. परंतु बहुधा त्यांची कानउघाडणी झाली असावी कारण मागाहून चंद्रशेखर राव यांनी त्यांना भेटण्याची तयारी करताच अखिलेश यांनी धूम ठोकली.



सध्या अखिलेश आणि बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती (अखिलेश यांच्या बुआ जी) यांच्यातील संबंध अतिशय जिव्हाळ्याचे आहेत. मायावती यांनी चंद्रशेखर राव यांच्या प्रस्तावाकडे पाठ फिरविल्याने अखिलेश






यांनाही कोलांट उडी मारणे भाग पडले. परंतु राव सुध्दा असे राजकारणी आहेत की त्यांनी एकीकडे भाजप व काँग्रेसच्या विरोधात प्रादेशिक पक्षांची आघाडी स्थापनेच्या कल्पनेवर काम सुरु केल्यावर दिल्लीत येऊन त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. त्यामुळेच विरोधी पक्षांच्या आघाडीसाठी पुढाकार घेतलेल्या आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी, 'राव बहुधा त्यांच्या आघाडीच्या प्रयत्नांबद्दलची माहिती मोदींना सांगण्यास गेले असावेत' असा टोला लगावला.

भाजपच्या आघाडी करण्यावर आता मर्यादा येत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांनी धाकदपटशाचे राजकारण करुन विरोधी पक्षांच्या आघाडीच्या प्रयत्नात अडथळे आणण्यास सुरुवात केली आहे. परंतु त्यासही मर्यादा आहेत कारण एकदा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर कुणी कुणाचा नसतो आणि मग त्यानंतर 'फ्री फॉर ऑल' म्हणजेच सर्व राजकीय पक्ष पूर्णपणे मुक्त झालेले असतात. त्यामुळे समाजवादी पक्ष किंवा बहुजन समाज पक्ष यांच्यावर त्यांनी कितीही दबाव आणला तरी तो निवडणुका जाहीर होई पर्यंतच चालेल, त्यानंतर चालणार नाही. त्यातही उत्तर प्रदेशातील जातीवर आधारित राजकारणाची बाब लक्षात घेता समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाच्या आघाडीत काँग्रेसला सामील करुन न घेणे हाही एक रणनीतीचाच भाग मानला जात आहे. याचे कारण उत्तर प्रदेशात एकेकाळी काँग्रेस पक्षाच्या व्होटबँकेत ब्राह्मण समाज प्रमुख होता. कालांतराने १२ ते १३ टक्के संख्याने असलेला ब्राह्मण समाज भाजपकडे वळला. सध्या उत्तर प्रदेशाची सर्व राजकीय सूत्रे भाजपने ठाकुर किंवा राजपूत असलेल्या योगी आदित्यनाथ यांच्याकडे सोपविलेली आहेत. त्यामुळे या नव्या सामाजिक समीकरणात ब्राह्मण समाज स्वतः ला दुर्लक्षित मानू लागला आहे आणि या समाजात भाजपबद्दल सार्वत्रिक नाराजी आढळून येते. त्याचप्रमाणे अनुसूचित जाति-जमातींवरील अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील जाचक तरतुदी मोदी सरकारने कायम राखल्यानेही हा समाज संतप्त आहे. मध्य प्रदेशातही हा समाज मोठ्या प्रमाणात भाजपच्या विरोधात गेलेला आढळला. त्याचीच पुनरावृत्ती उत्तर प्रदेशात होऊ शकते. त्यामुळे काँग्रेस पक्ष स्वतंत्रपणे निवडणुका लढल्यास हा समाज तसेच अन्य सामाजिक समूह मिळून काँग्रेसला थोडेफार यश मिळू शकते असे मानले जाते. त्यामुळेही समाजवादी व बहुजन समाज यांच्या आघाडीत सामील न होणे हा रणनीतीचाही भाग असू शकेल असे मानले जाते.

बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दल(लालूप्रसाद), काँग्रेस, जीतनराम मांझी, नव्याने सामील झालेले उपेंद्र कुशवाह यांची आघाडी अपेक्षित आहे. एवढे पक्ष असल्याने जागांसाठी रस्सीखेच होणे अटळ आहे. तसेच हे विजयी समीकरण मानले जात असल्यानेही त्याचा सर्वाधिक वाटा आपल्याला मिळावा यासाठी चढाओढ होणार



आहे. महाराष्ट्रातही काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य समविचारी पक्ष व संघटनांमध्ये आघाडी झालेलीच आहे. आंध्र प्रदेशात तेलगु देशम व काँग्रेसमध्ये आघाडी अपेक्षित आहे. राहूल गांधी

यांच्या म्हणण्यानुसार पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसने 'एकला चलो रे'ची तयारी केलेली आहे. काँग्रेस पक्षाला तीन हिंदी भाषक राज्यांमध्ये मिळालेल्या यशामुळे या पक्षात चैतन्य आलेले आहे. त्याचे रुपांतर अहंकारात न होण्याची खबरदारी पक्षाला घ्यावी लागेल. कारण जेव्हा जेव्हा काँग्रेस किंवा भाजपला असे यश मिळते तेव्हा ते त्यांच्या नेतृत्वात असे भिनते की मग ते सहकारी व मित्रपक्षांना कस्पटा सारखे वागवू लागतात.

निवडणुका जवळ आल्या की या पक्षांना मित्रपक्षांच्या आधाराची जाणीव होऊ लागते आणि ते जमिनीवर येतात. सुदैवाने अद्याप काँग्रेस नेतृत्व तुलनेने जमिनीवर आहे. याचे कारण हेही आहे की तीन राज्यात सरकारे स्थापन करण्यात पक्षाला यश आलेले असले तरी पक्षाला काठावरचे बहुमत आहे(छत्तीसगढ वगळता) आणि त्यामुळे त्यांना मित्रपक्षांना दुखावणे शक्य होणार नाही. त्यामुळेच आतापर्यंतच्या हालचाली लक्षात घेता प्रत्येक पक्षाने आपापली ताकद असलेल्या ठिकाणी भाजपच्या विरोधातील सर्व राजकीय शक्तींचे नेतृत्व करणे आणि निवडणुकीनंतर एकत्र येणे अशी सर्वसाधारण रणनीती आखलेली आहे. आतापर्यंत तरी ती यशस्वीपणे वाटचाल करताना आढळत आहे.



भाजपच्या विरोधातील राजकीय शक्तींच्या आघाडीबाबत असंख्य गोष्टी बोलल्या जात आहेत. विशेषतः अशी आघाडी टिकाऊ नसेल हा नेहमीचा आक्षेप व्यक्त केला जातो. परंतु १९९८ पासून देशात आघाडीचे राजकारण यशस्वीपणे सुरु आहे. त्यामुळे आता त्यामध्ये आक्षेप घेण्याचे कारण उरलेले नाही. एच.डी. देवेगौडा पंतप्रधान असताना त्यांची व त्यांच्या सरकारची यथेच्छ टिंगल करण्यात आली व अजुनही केली जाते. परंतु त्यांच्या कारकिर्दीत सादर झालेल्या अर्थसंकल्पाला 'ड्रीम बजेट' किंवा 'स्वप्नवत अर्थसंकल्प' म्हणून नावाजले गेले होते. पी.चिदंबरम यांनी तो सादर केला होता आणि त्याला मागे टाकणारा अर्थसंकल्प अद्याप सादर व्हायचा आहे. थोडक्यात देशाचे संघराज्यात्मक स्वरुप लक्षात घेता आघाडीचे राजकारण व आघाडीचे सरकार यांची टिंगल करण्याचे कारण नाही आणि त्याला गैर मानण्याचेही कारण नाही. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए-१' या सरकारने अनेक चांगले आर्थिक व पायाभूत क्षेत्र विकासाचे पुढाकार घेऊन अर्थव्यवस्थेला चालना दिली होती. तर मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए-१ सरकारने पहिल्या फेरीत अनेक चांगली कामे केली होती. माहितीचा अधिकार, घरगुती हिंसा विरोधी कायदा, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे अनेक चांगले निर्णय पहिल्या कारकिर्दीत झाले होते. शेतीच्या क्षेत्राची भरभराट याच काळात सुरु झाली होती. युपीए-१ मध्ये डाव्या आघाडीचे समर्थन सरकारला प्राप्त होते आणि एका किमान-समान कार्यक्रमाच्या आधारे ते सरकार चालत होते. 'युपीए-२' मध्ये डाव्या आघाडीशी फारकत झालेली होती आणि त्यातून काँग्रेसचा एकांगी कारभार सुरु झालेला होता. परिणामी २०१४ मध्ये काँग्रेसची ४४ जागांवर पोहोचण्यापर्यंत घसरण झाली. त्यावेळी काँग्रेसने घायकुतीला येऊन सरकारच्या अखेरच्या काळात अन्न सुरक्षा योजना लागू करण्याचा एक आगतिक प्रयत्न केलेला होता. परंतु तोपर्यंत फार उशीर झालेला होता. काँग्रेसला त्यांच्या एकांगी राज्यकारभाराची शिक्षा जनतेने दिली.

२०१९ मध्ये होणारी निवडणूक महत्वपूर्ण राहील आणि तेच या वर्षाचे ठळक आकर्षण राहील. कारण वर्तमान सत्ताधाऱ्यांना त्यांची सत्ता टिकविण्याचे आव्हान आहे. वर्तमान राज्यकर्त्यांची पाच वर्षांची कारकिर्द वादग्रस्त राहिली आहे. राजकीय व सामाजिक या दोन्ही आघाड्यांवर या राज्यकर्त्यांनी अत्यंत आक्रमक अशा भूमिका घेऊन एका सार्वत्रिक संघर्षाचे वातावरण देशात निर्माण केले. राजकीय प्रतिस्पर्धी व विरोधकांना जेरबंद कसे करता येईल यासाठी राजवटीने प्रयत्नांची शर्थ केलेली आढळते.

समाजातील विविध समूहांमध्ये व विशेषतः अल्पसंख्यक व बहुसंख्यक समाजात तेढ निर्माण करणे आणि त्यातून धार्मिक ध्रुवीकरण साधून बहुसंख्यक मते सर्वाधिक प्रमाणात स्वतःच्या पदरात कशी पडतील यासाठीही पध्दतशीर व योजनाबध्दरीत्या प्रयत्न करण्यात आले. लोकसभेची निवडणूक जवळ येत जाईल तसे हे प्रकार वाढत जाणार आहेत. त्यामुळेच २०१९ची लोकसभेची निवडणूक ही महत्वाची असेल. भारतात सर्वसमावेशक राजकारण व राज्यकारभाराला प्राधान्य राखायचे की बहुसंख्यक वर्चस्वाची व्यवस्था स्वीकारायची याचा निर्णय या निवडणुकीने होणे अपेक्षित आहे. २०१९ या वर्षात प्रवेश करताना आनंदापेक्षा चिंता अधिक भेडसावत आहेत. निवडणुकीच्या माध्यमातून त्या चिंतांचे निराकरण झाल्यास या देशात आनंदाचे वातावरण परत येऊ शकेल. अन्यथा देशाच्या भावी वाटचालीबद्दल भलेमोठे प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे!





# संसद व विधिमंडळात महिलांना

**देशाच्या लोकसंख्येत महिलांचा वाटा ५०% आहे. परंतु संख्येच्या प्रमाणात विकासाची समान संधी त्यांना प्राप्त होत नव्हती. म्हणून २५ वर्षांपूर्वी सरकारने महिला धोरण जाहीर केले. या धोरणाला २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या बैठकीला शरद पवार यांनी केलेले हे मर्गदर्शन.**

महिला धोरणाला २५ वर्षे झाली. त्याच्यामध्ये आपण काय कमावले?, काय गमावले?, याचा आढावा घेण्याची संधी आपल्याला या निमित्ताने आलेली आहे. जे चांगले आहे, त्याबद्दल आपण आनंद व्यक्त करूया! या धोरणाचा खऱ्या अर्थाने जो समान अधिकाराचा हेतू होता, तो ज्या ज्या क्षेत्रांमध्ये कृतीमध्ये आला नसेल, तो आणण्यासाठी धोरणे काय बदलायची, काय मागणी करायची, याचा विचार या बैठकीच्या माध्यमातून होईल. फौजिया खान यांनी मला सांगितले, ही बैठक काही अंतिम नाही. आणखी काही बैठका घेण्याचा त्यांचा मानस आहे. नागपूरला बैठक घेऊन विदर्भातल्या भगिनींना निमंत्रित करावे, औरंगाबादला



# आरक्षण द्यायला हवे

## शरद पवार यांचे विचार

घेऊन मराठवाड्यातल्या भगिनींना निमंत्रित करावे, पुणे किंवा ठाण्यामध्ये कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील भगिनींना निमंत्रित करावे, या सगळ्यांची सामूहिक बैठक झाल्यानंतर, पुन्हा एक बैठक घेऊन त्यात या सगळ्याची टिपण्णी तुमच्यासमोर मांडून नवीन महिला धोरण काय करायचे? याचा विचार त्यात करून तो राज्य व केन्द्र सरकार यांच्यासमोर मांडावा, अशी भावना त्यांच्या मनात आहे आणि हे काम कोणत्याही राजकीय पक्षाच्या वतीने केले जाणार नाही. आपण या ठिकाणी बैठक बोलावली, त्याचे महत्त्वाचे कारण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ही महाराष्ट्रातल्या व देशातल्या वेगवेगळ्या प्रश्नांच्यासंबंधी विविध विचारांच्या लोकांना निमंत्रित करून एक चर्चेचे सूत्र चालवून काही धोरणांच्या संदर्भात विचार करणारी संस्था आहे. म्हणून, या व्यासपीठाचा उपयोग तुमच्या कामासाठी करावा, हा त्याच्या पाठिमागचा हेतू आहे.

महिला व महिलांचे अधिकार याबाबतीत अनेक गोष्टी आपल्यासमोर मांडल्या गेल्या आहेत. आपल्या सगळ्यांच्यासमोर काही व्यक्तींनी आपल्या अंत:करणात एक आदर्श म्हणून स्थान मिळविले आहे. त्याच्यामध्ये महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचा उल्लेख आपण प्रकर्षाने करतो. त्या कालखंडात शैक्षणिक संधीसुद्धा मिळत नव्हती आणि हे काही जोतिबा



फुल्यांना पटले नाही. म्हणून, ते त्या काळात जेथे राहायचे, तेथून जवळच असलेल्या भिडे वाड्यात त्यांनी मुलींची शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्या शाळेत शिक्षक मिळत नव्हते म्हणून त्यांनी सावित्रीबाईंना शिकवले व सावित्रीबाईंवर मुलींना शिक्षण देण्याची जबाबदारी सोपवली आणि स्त्री शिक्षणाचा पाया जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी खऱ्या अर्थाने घातला, असे म्हटल्यास ती अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

जोतिबा फुले हे आधुनिक विचारांचे पुरस्कर्ते होते. म्हणजे, १८८०-९० या काळात एक व्यक्ती आधुनिकतेचा विचार मांडते, ही काही लहानसहान गोष्ट नाही. त्याचे एकच उदाहरण द्यायचे झाले तर, मुंबईत गेट वे ऑफ़ इंडिया आहे. गेट वे ऑफ इंडियाची वास्तू बांधली, त्याचे कारण ब्रिटिशांचे राज्य इथे होते आणि ब्रिटिश राजपुत्र हा भारताला भेट देणार होता. म्हणून त्याच्या स्वागतासाठी ती वास्तू तेथे बांधली. राजपुत्राच्या स्वागतासाठी अनेक लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या ठिकाणी एका कोपऱ्यात जोतिबा फुले उभे होते. साधे धोतर, फेटा, अंगात बंडी घातलेला हा शेतकरी त्या ठिकाणी उभा राहिला होता. ब्रिटिश राजपुत्र बोटीतून उतरले व गेट वे ऑफ इंडियातून येत असताना पोलिसांनी जोतिबांना बाजूला करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजपुत्राने ते पाहिले. ते म्हणाले, त्यांना काही तरी बोलायचे आहे. त्यांना बोलण्याची संधी द्या.'' (अलॉऊ हिम टू स्पीक). ती संधी मिळाल्यावर जोतिबा फुले यांनी त्यांना मागणीची सनद (चार्टर ऑफ़ डिमांड) दिली. त्यात चार मागण्या होत्या. त्या मागण्या पुरुष, महिला वर्ग यांच्यासंदर्भात नव्हत्या. एकूण राज्याच्या शेती व अन्य क्षेत्रातील प्रश्नाबाबत होत्या. आमच्याकडे शेतीचे उत्पन्न घटायला लागले आहे, असे त्यांनी सांगितले आणि शेतीचे उत्पादन चांगले करायचे असेल तर, त्यांनी शब्द वापरला...आमचा शाळू. शाळू म्हणजे ज्वारी. ज्वारीचे उत्पन्न वाढवायचे असेल तर, विलायतेतून संकर आणून संकरित वाण तयार करावे. ज्याला आपण 'हायब्रीड' म्हणतो, तो विचार जोतिबांनी त्या काळात केला होता. त्यांनी दुसरा प्रश्न मांडला होता, शेतीला जोडधंदा कशाचा असेल, आमची भगिनी कशावर अवलंबून असेल तर तो म्हणजे, दुधाचा जोडधंदा! आणि दुधाचा जोडधदा करायचा असेल तर, आमच्याकडील गाईंचे दुधाचे प्रमाण कमी झालेले आहे. त्याचे महत्त्वाचे कारण, जे वळू, गाय वापरले जातात ते सम रक्ताचे आहेत. त्याच्यामध्ये बदल केला पाहिजे. हा बदल करायचे असेल तर, तुम्ही विलायतेतून वाण पाठवा. या ठिकाणी नवीन संकरित जात तयार करा. त्या शिवाय दुधाचे उत्पन्न वाढणार नाही. दुधाचे उत्पन्न जोपर्यंत वाढणार नाही, तोपर्यंत आमच्या घरातल्या स्त्रीला सन्मान मिळणार नाही.

जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले, त्यात जोतिबांनासुद्धा स्त्रियांचे अधिकार, स्त्रियांचा सन्मान, स्त्रियांचे शिक्षण यात अधिक रस होता आणि तीच भूमिका मांडत त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. त्यामुळे आम्ही लोकांनी जेव्हा धोरण राबविण्याचा विचार केला, त्या वेळी एकमुखाने आम्ही विचार केला की, जोतिबा व सावित्री हे आमचे आदर्श आहेत. तो आदर्श ठेवून आम्ही पुढे जाणार आणि त्या आदर्शाला अभिप्रेत असलेली महिलांची मिटिंग या राज्यात घेण्याची गरज आहे. त्या वेळी आजच्या सारख्या अनेक चर्चा त्या वेळी केल्या. त्या वेळी त्या विभागाची जबाबदारी घेणाऱ्या चंद्रा अय्यंगार या ठिकाणी आहेत. त्यांनी आयोजन करून शेवटी ही मिटिंग ठरविण्यात आली.

आता त्याच्यात समान वागणूक द्यायची असेल तर, अनेक गोष्टी आहेत. कायदे बदलले पाहिजेत. अनेक कायदे असे आहेत की, ज्यात पुरुषांचा विचार अधिक केला जातो. स्त्रियांचा नाही. ते कायदे बदलण्याची काळजी घेतली. आरक्षणाचा एक मुद्दा होता. त्याचाही निर्णय घेतला. मग, ग्रामपंचायत असेल, तालुका पंचायत असेल, जिल्हा परिषद असेल, सहकारी संस्था असेल, या सगळ्यांमध्ये आरक्षणाचा विचार त्या वेळी केला. फारसा पटला नव्हता. पण, एकदा निर्णय राबवायचा ठरविल्यानंतर आणि राज्यप्रमुखांनीच निर्णय घेतल्यानंतर मग कोणी फारसे बोलत नाही. याचा अनुभव मला आला. आत्ताच या ठिकाणी सांगितले, भगिनींना महानगरपालिका, नगरपालिकेत अधिकार दिला, तो अधिकार चांगल्या पद्धतीने राबविणाऱ्या अनेक भगिनी आहेत. पण, त्या सबंध त्या संस्थेत दोष असल्याचे मला जाणवले. नाव सांगत नाही, पण मी एके दिवशी एका शहरात गेलो होतो. माझी एक पद्धत असायची, कोणत्याही शहरात गेल्यावर तिथल्या नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीतील पदाधिकाऱ्यांना बोलवायचे, महिला भगिनींनाही बोलवायचे व त्यांना मुक्तपणे काम करू दिले जाते का असे विचारायचे. एका शहरात गेल्यावर महानगरपालिकेच्या सदस्यांना बोलावले. स्थायी समितीचे अध्यक्षपद एका भगिनीच्याकडे होते आणि ती जागा राखीवमधून आली होती. मी त्यांना त्यांचा अनुभव विचारला. त्या म्हणाल्या आमचा अनुभव काही फार चांगला नाही. म्हणजे, तुम्हाला काम करू देत नाहीत का? असे मी विचारले. त्यावर त्या म्हणाल्या, काम करू देतात. पण, सगळ्यांना पाकिटे जातात. मला पाकीट दिले जात नाही. पाकीटप्रकरण मला काही आवडले नाही. पण, महिला इतक्या स्पष्टपणे बोलू लागल्या हे आपल्याला पाहावयास मिळते. आज आपण जे आरक्षण आणले आहे, त्यामुळे महिलांना निश्चितपणे फायदा झाला आहे. २५ वर्षांनंतर जेव्हा आपण हे बघतो तेव्हा हे आरक्षणापुरतेच मर्यादित ठेवायचे का? याचा विचार केला पाहिजे. हे आरक्षण संसद व विधिमंडळात नेण्यासाठी काही पावले टाकता येतील का? याचा विचार आपण केला पाहिजे. माझे स्पष्ट मत आहे, यासंबंधीचा विचार करण्याची वेळ आलेली आहे आणि या संबंधीचा आग्रह कोणत्याही राजकीय पक्षाने कोणतीही अभिलाषा न ठेवता धरला पाहिजे. राजकीय पक्षांच्या प्रमुखांनी व त्या पक्षांच्या भगिनींनी एक प्रकारचा दबाव आणून ते धोरण कृतीत आणण्याची भूमिका घेण्यास भाग पाडणे, याची आज अत्यंत आवश्यकता आहे. सबंध कायदेविषयक धोरणात्मक नीती ही संसदेत ठरते, विधिमंडळात ठरते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपण संधी दिली, ही चांगली गोष्ट आहे. पण, तेवढ्यावर संतुष्ट राहून चालणार नाही. म्हणून त्याचा विचार आपण २५ वर्षांनंतर केला पाहिजे.

मी तर नीलमताई, विद्याताई यांना असे सूचवेन की, महाराष्ट्रातल्याच नव्हे तर, देशातल्या विविध विधिमंडळांतील व संसदेतील भगिनींची एक बैठक तुम्ही बोलवा. आम्ही पाठिमागून सगळी मदत तुम्हाला करतो. या सगळ्या महिलांना बोलावून आपण त्यांच्यात एकवाच्यता करू शकलो व त्याची मांडणी आपण देशाचे नेतृत्व करणाऱ्यांसमोर, राष्ट्रीय पक्षांच्या प्रमुखांसमोर करू शकलो. तर मला खात्री आहे, त्याचा विचार हा केल्याशिवाय राहणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, आम्हा लोकांना म्हणजे, निर्णय घेणाऱ्या राजकीय लोकांना जेव्हा आमचे भवितव्य संकटात आहे, असे जाणवू लागते तेव्हा काही गोष्टी आम्ही मान्य करतो. तेव्हा हे भवितव्य संकटात आहे, अशी स्थिती निर्माण करण्याचे काम भगिनींना करायचे आहे. हे वेगळे वातावरण आपण निर्माण करू. ठीक आहे. ५० टक्के नाही. २५ टक्के, ३० टक्के. सुरुवात तर करू. आम्ही सुरूवात केली तेव्हा ३३ टक्के आरक्षण दिले होते. नंतर ते ५० टक्के केले.

आणखी एक चित्र दिसते. नुकताच मी रत्नागिरी येथे होतो. तेथे गझे नावाच्या गृहस्थांचा एक मोठा प्रकल्प आहे. मी तो मुद्दाम पाहण्यास गेलो होतो. तिथे हजारो कोटी रुपयांच्या माश्यांच्या (फिश) पदार्थांची निर्यात होती. त्या मोठ्या कारखान्यात ५० टक्के महिला काम करतात. त्या महिला सर्व धर्माच्या होत्या.



त्यात हिंदू होत्या, मुस्लीम होत्या. उपेक्षित समाजाच्या होत्या. त्यांना त्यांचा अनुभव विचारला असता त्यांनी त्यांचा अनुभव अतिशय उत्तम असल्याचे सांगितले. मी असे अनेक कारखाने बघितले, जिथे ४० टक्के, ५० टक्के मुलीच काम करतात त्यांना कामाची संधी दिली की, त्यात कौशल्याची कमतरता पडत नाही, असा माझा स्वत:चा अनुभव आहे.

आपण या ठिकाणी प्रॉपर्टीच्या अधिकाराची चर्चा केली. त्याच्यात शंभर टक्के सुधारणा झाली असे मला जाणवत नाही.

निर्णय झाला आहे. पण, त्याची शंभर टक्के अंमलबजावणी होत नाही. खूप वेळेला तिची अंमलबजावणी न होण्यामध्ये स्त्रियांचासुद्धा वाटा आहे. स्त्रियाच म्हणतात, घरात उगीच काही वाद नको. भावाचे व माझे संबंध चांगले आहेत. वडिलांना त्रास द्यायला नको, अशी मते मांडली जातात. जोपर्यंत तिला आर्थिक अधिकार मिळत नाहीत तोपर्यंत तिला खऱ्या अर्थाने सक्षमता येणार नाही. म्हणून, प्रॉपर्टीचा अधिकार हा राबविला पाहिजे. तो राबवता येत नसेल तर, कायद्यात आणखी काही दुरुस्ती करण्याची गरज आहे का, याचा विचार केला पाहिजे.

मागे मी अनेकदा सांगितले होते की, जेव्हा विधिमंडळात आम्ही प्रॉपर्टीचा अधिकार देण्याचा निर्णय घेतला तेव्हा सगळे आमदार हे चांगलेच अस्वस्थ झाले होते. शेवटी निर्णय घेतला. विधेयक मांडले. विधानसभेसमोर ते विधेयक आले. चर्चा चांगली सुरू झाली. रात्री आठ वाजता मी घरी निघून गेलो व आमचे

म्हणजे, आमची प्रॉपर्टी तिकडे जाणार वगैरे वगैरे....मी त्यांना म्हटले, तुम्हाला किती मुलगे व मुली आहेत. ते म्हणाले, तीन मुलगे आहेत. मग तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? असे म्हणता ते म्हणाले समजले नाही. त्यांना म्हटले, तुम्हाला तीन सुना येणार. येताना ५० टक्के प्रॉपर्टी घेऊन येणार, मग तुम्हाला काय अडचण आहे? तेव्हा ते म्हणाले, हे माझ्या ध्यानातच आले नव्हते. आज आपण निर्णय घेतला. त्याची तंतोतंत अंमलबजावणी कशी होईल, याचा विचार आपण करण्याची गरज आहे.

आणखी एका गोष्टीची येथे चर्चा झाली, ती म्हणजे लिंग भेद, स्त्री-पुरुष भेदाच्या संदर्भातली! आपण दुसरा एक विचार करण्याची गरज आहे. आपण बजेट करतो, उदाहरणार्थ- शिक्षणाचे. शिक्षणासाठीचे बजेट हे काही पुरुषांसाठी वेगळे, महिलांसाठी वेगळे, मुलांसाठी वेगळे असे नसते. समाजातील सर्व घटकांना उपयुक्त असे निर्णय राज्यकर्त्यांना घ्यावे लागतात.



गरिबीमुळे मुस्लिम कुटुंब झोपडपट्टीत राहात असून तेथूनच मुलींची श्रीमंताना विक्री केली जाते.

जे चीफ होते, त्यांना म्हणालो, आता तुम्ही हे करून घ्या. रात्री ११-१२ वाजता त्यांचा फोन आला. ते म्हणाले, लोक ऐकायला तयार नाहीत. तुम्हीच येथे यायची गरज आहे. आज कामकाज तहकूब करू. उद्या पुन्हा चर्चा करू असे सर्व म्हणत आहेत. त्यावर मी सांगितले, ते चालणार नाही. हा पक्षाचा निर्णय आहे. आपल्याला अंमलात आणलाच पाहिजे. आजच विधेयक मंजूर झाले पाहिजे. कोण-कोण विरोध करतात, असे विचारता त्यांनी ३-४ नावे सांगितली. मी प्रत्येकाला फोनवर बोलावून घेतले व समजून सांगितले. एकजण फारच हट्टी होते. त्यांना विचारले, तुमचा काय प्रॉब्लेम आहे? ते म्हणाले, माझ्या घरातले वातावरण सगळे बिघडेल. म्हणजे काय होईल, असे विचारता ते म्हणाले, मुलीला लग्नानंतर तिकडची प्रॉपर्टी मिळणार व आमचीही द्यायची

त्यामुळे सर्व ठिकाणी लिंग भेदाचा प्रश्न येणार नाही. मात्र, स्त्रिया आणि मुली यांच्या हिताच्या जपणुकीचे जे जे कार्यक्रम असतील, त्याच्यासाठी तरतुदी करण्याच्या बाबतीत कौशल्य दाखविणे व त्या बाबतीत खबरदारी घेणे, याची आज खरी गरज आहे.

मला आठवतेय, मी एकदा राज्यात असताना, मागासवर्गीय समाजाच्या प्रश्नांची चर्चा करीत होतो. आमच्या असे लक्षात आले की, एकूण संख्येच्या प्रमाणात आम्ही मागासवर्गीयांच्या विकासाकडे लक्ष देत नाही. आम्ही निर्णय घेतला की, मागासवर्गीयांची एकूण संख्येच्या जितकी टक्के संख्या आहे, तितकी टक्के तरतूद मागासवर्गीयांसाठी बजेटमध्ये करायची. आणि महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की, ज्यांनी संख्येच्या प्रमाणात अर्थपुरवठा करण्याची भूमिका स्वीकारली.

ती काही प्रमाणात मुलींच्या बाबतीत करणे शक्य आहे व मला असे वाटते, की ते आपण आग्रहाने मांडू शकू.

या ठिकाणी प्रशासनाच्या संदर्भात थोडी चर्चा झाली. आता प्रशासनात भगिनी दिसतात. पदावरही दिसतात. पण, मी काही याच्यात समाधानी नाही. आपल्यापैकी काही जणी पोलीस खात्यात आहेत. या पोलीस खात्याबद्दल माझी एक तक्रार आहे. पोलीस खात्यातील महिला पोलीस अधिकाऱ्यांना योग्य प्रकारची जबाबदारी दिली जात नाही. त्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे. हिंदुस्थानातील अनेक राज्यांत महिला 'मुख्य सचिव'(चीफ सेक्रेटरी) झाल्या आहेत. महाराष्ट्रात अजूनपर्यंत एकही महिला चीफ सेक्रेटरी झालेली नाही. माझ्यासह सगळ्यांचे ते एका दृष्टीने अपयश आहे. २-३ महिला चीफ सेक्रेटरी होण्याच्या टप्प्यावर आल्या होत्या. मात्र, त्यांना संधी न देता अन्य कोणाचा विचार झाला. त्याचे महत्त्वाचे कारण, दलित समाजाला आरक्षण आहे. पण, मुस्लीम समाजाला नाही. तुम्ही महाराष्ट्रातल्या कोणत्याही ग्रामीण भागात गेलात, तेथील मुस्लीम मोहल्ल्यात गेल्यावर तेथील वातावरण, समाजजीवन व अन्य भागातले समाजजीवन व वातावरण यात अंतर दिसते. मुस्लीम मोहल्ल्यात दारिद्र्य, मागासलेपणा असल्याचे चित्र दिसते आणि त्यातही मुस्लीम महिला अधिक दुर्लक्षित असल्याचे दिसून येते. या सगळ्या वर्गाला आपण बरोबर आणण्याची काळजी घेतली पाहिजे.

या सगळ्यामध्ये आणखी एक चित्र बघायला मिळते. मुले आणि मुलींमधील मुलींचे प्रमाण हे कमी झाले आहे. आज सामाजिक विषमतेचे जे राज्याच्या काही भागात चित्र दिसत आहे, त्याचा परिणाम जेंडर इक्वॅलिटीमध्ये आपल्याला बघायला मिळते. या ठिकाणी आम्हा लोकांची ही जबाबदारी आहे, जे निर्णय घेतात, धोरणे ठरवितात, लोकप्रतिनिधी यांना या प्रश्नात



गरिबी व आर्थिक दारिद्र्यामुळे आदिवासी महिला दिवसरात्र काम करूनही दोन वेळच्या अन्नाला महाग असतात. त्यामुळे कुपोषणाचा सामना त्यांच्या पाचवीला पुजला आहे.

म्हणजे, निर्णय घेण्याची जबाबदारी ज्यांच्यावर, आम्हा लोकांवर आहे, त्यांच्यात आत्मविश्वासाची जी मानसिकता हवी आहे, ती नसल्याने कर्तृत्वाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची कमतरता नसतानासुद्धा ही संधी दिली जात नाही, हे चित्र या ठिकाणी दिसते. हे चित्र आपल्याला बदलावे लागेल आणि आपल्या सामूहिक दबावातूनच हे चित्र बदलण्याची काळजी घेतली पाहिजे.

आणखी एका गोष्टीबद्दल सांगायचे आहे की, मी जे राज्यात बघत असतो, आदिवासी, दलित आणि विशेषत: मुस्लीम, या तीन वर्गांतील भगिनींच्यामध्ये किंबहुना त्या वर्गातच दारिद्र्य फार दिसते, मागासलेपणा जास्त दिसतो. त्यासाठी आपल्याला वेगळी धोरणे राबविण्याची गरज आहे. आदिवासी व लक्ष घालावे लागेल. मला एवढेच सांगायचे आहे, आज आपण ही जी सुरुवात केली, आता आपण इथे थांबायला नको. तुम्ही वेगवेगळ्या विभागात बसून चर्चा करायची ती करा. तुमचे एकत्रित टिपण तयार करा. नंतर, राज्य सरकार व राजकीय पक्ष यांची एक संयुक्त बैठक आपण घेऊ आणि त्यांच्या समन्वयातून हा विचार घेऊन महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाला गती दिली तरच महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे, अशी भूमिका आपल्याला मांडता येईल. अन्यथा, महाराष्ट्र हे प्रगत राज्य असल्याचा दावा आपल्याला करता येणार नाही आणि ही स्थिती राहू द्यायची नाही, असा निकाल घेऊन आपण कामाला लागू या.



# 'छेडछाडमुक्त महाराष्ट्र' करू शकल्यास महिलांचे मोठे योगदान ठरेल

## सुप्रिया सुळे यांचे विचार

तुमच्या सगळ्यांच्या फीडबॅकमधून सातत्याने एक गोष्ट समोर येतेय, त्याबद्दल माझी गाभा समितीला(कोअर कमिटी) विनंती आहे की, आकडेवारीचे विश्लेषण आपण केल्यानंतर गेल्या २५ वर्षांतील आकडेवारीचा परिणाम काय झाला आहे, हे आपण पाहिले पाहिजे. आपण आपले अनुभव नेहमी सांगत असतो. परंतु, वस्तुस्थिती काय आहे? हे पाहणे गरजेचे आहे. ज्यांच्याकडे तज्ज्ञ लोक आहेत, अशा टाटा कन्सल्टन्सीसारख्या संस्थांची मदत घेऊन नेमका काय परिणाम झाला तो पाहिला पाहिजे व नंतर त्याच्यावरचे धोरण ठरवले गेले पाहिजे. विभागनिहाय आपण बैठका घेतल्या त्या ऐवजी जिल्हानिहाय घ्यायला हव्यात. खरे तर तालुकानिहाय बैठका हव्यात पण,



आपल्याकडे तेवढा वेळ नसल्याने जिल्हानिहाय बैठकांची गरज आहे. त्यात समाजातील सर्व घटकांना बरोबर घेणे आवश्यक आहे. आत्ता या ठिकाणी पालघर जिल्ह्यातील कुपोषणाचा मुद्दा मांडला. आमच्या पुणे जिल्हा परिषदेने पूर्णपणे जिल्हा कुपोषण मुक्त केला आहे. पक्षपात बाजूला ठेवून एकमेकांना सहाय्य केले पाहिजे. अशी जेव्हा धोरणे येतात तेव्हा पक्षाचा मुद्दाच येत नाही. महिलांच्या धोरणात सुधारणा असावी, कुपोषण कमी झाले पाहिजे, यावर कोणाचेच मतभेद असण्याचे कारण नाही. त्यामुळे पालघरला जिल्हा परिषदेचा जो कार्यक्रम आहे, तो जर आमच्या जिल्ह्याशी संलग्न केला तर, आमच्या अनुभवाची देवघेव करता येईल.

आता स्त्री-पुरुष समानता, महिलांचे हक्क याबाबत आपण बोलतो. गेल्या २५ वर्षांत महिलांच्यात खूप बदल झालेले आहेत. २५ वर्षांपूर्वी घराचा उंबरठा ओलांडताना महिलांच्या फक्त बांगड्या दिसत होत्या. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. आदिवासी पाड्यावरील एक ताई येथे व्यासपीठावरून बोलते, हा २५ वर्षांतील केवढा मोठा बदल म्हणावा लागेल. हुंडा अजूनही आहे. रोख पैशाची जागा आता कपाटे, गाड्यांनी घेतली आहे. हा विषय कोणाच्याही भाषणात आला नाही, याचे मला आश्चर्य वाटते. बालविवाह हाही प्रश्न अजूनही समाजात आहे. कायदे करून सामाजिक प्रश्न सुटत नाहीत, याची जाणिव बहुतेकांना आहे. कायदे करून सामाजिक प्रश्न सुटत असते तर, या देशातील बलात्कार हे कधीच कमी झाले असते. या प्रश्नावर आपण सगळ्यांची एक गोलमेज परिषद झाली पाहिजे, असे मला वाटते.

एकल महिलांचे प्रश्न आज खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. २५ वर्षांपूर्वी या प्रकारचे प्रश्न नव्हते. एकल महिलांना भाड्याने घरे दिली जात नाहीत, असे असंख्य प्रश्न आहेत. एका गोष्टीचा मला आनंद वाटतो की, याच्यात पुरुषही मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. एरव्ही महिलांचे प्रश्न म्हटले की, महिलाच चर्चा करतात, महिलाच वाद घालतात. आपण कितीही धोरणे केली तरी, जोपर्यंत मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. महाराष्ट्रात मुलांच्या व मुलींच्या संख्येच्या प्रमाणाचा प्रश्न आता फार मोठा राहिला नाही. त्या संदर्भात फार मोठे काम केले आहे. सरकार कोणाचेही असले तरी सातत्याने कामे ही होतच असतात. मात्र, बलात्कार हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे 'छेडछाडमुक्त महाराष्ट्र' आपण करू शकलो तर, महिलांचे ते फार मोठे योगदान ठरेल.

पवार साहेबांनी महाराष्ट्रात एकही महिला चीफ सेक्रेटरी झाली नाही, असा मुद्दा मांडला होता. माझा विचार थोडा वेगळा मांडते. महिला अधिकारी झाली तर, त्यातून एक चांगला संदेश जातो, ही खरी गोष्ट आहे. पण, त्याच्यातून सगळे प्रश्न सुटणार आहेत का? सुटणार नाहीत. समजा एखादी महिला पंतप्रधान झाली, जे आपल्याकडे घडले आहे. पण, कौटुंबिक हिंसाचार संपला का? तर, नाही संपला! म्हणून, या गोष्टीचा सखोल विचार करून समाजात काय परिवर्तन करता येईल, याचा विचार केला पाहिजे. मला वाटते सामाजिक प्रश्नावर चर्चा करून काही मार्ग काढू शकलो तर ते एक मोठे योगदान ठरेल. महिला चळवळीसाठी योगदान देणाऱ्या कुमुद बन्सल यांच्यासारख्या अनेक महिला आज हयात नाहीत, हे या चळवळीचे फार मोठे नुकसान आहे. त्याचेही एक डॉक्युमेन्टेशन केले पाहिजे. पुढच्या पिढीला कळले तरी पाहिजे की, या चळवळीसाठी कोणीकोणी कसे कार्य केले आहे. हे डॉक्युमेन्टेशन राहून गेले आहे. ते केले जावे असे वाटते.





# शिक्षणाच्या हक्काची वयोमर्यादा १८ पर्यंत वाढवावी : वंदना चव्हाण



आपण २५ वर्षांपूर्वी महिला धोरण केले व आज त्यामुळे आमूलाग्र बदल समाजात झालेला आपल्याला दिसतो आहे. आणखीन करण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांच्या स्तरावर आणि एसटीजीएसच्या स्तरावर व सगळीकडे 'महिला व मुली' असा उल्लेख केला जाता. तेव्हा आपण 'महिला व मुली' असा फरक केला तर तो खूप महत्त्वाचा ठरेल. आपण आपल्या राजकीय मसुद्यात क्षमतावृद्धीचा(कपॅसिटी बिल्डिंग) उल्लेख आहे. मघाशी उल्लेख झाला. आम्ही जेव्हा ९२ मध्ये निवडून आलो, त्या वेळी साहेब आपण मुख्यमंत्री होते. देशभर महिलांना ३३ टक्के आरक्षण येण्यापूर्वी आपण महाराष्ट्रात महिलांना ३० टक्के आरक्षण लागू केले. महिलांना आरक्षण देणारे देशातली पहिली व्यक्ती साहेब आपण आहात. त्या वेळी सरकारने क्षमतावृद्धीचा कार्यक्रम अंमलात आणला होता. आता तो बंद झालेला आहे. क्षमतावृद्धी कार्यक्रमाची नितांत गरज आहे. काहीजण म्हणतात, पाण्यात पडल्यावर पोहायला येते. ते खरे असले तरी जे तीन वर्षात होणार ते एकाच वर्षांत झाले तर ते हवेच आहे.

मसुद्यातील दुसरा मुद्दा आरोग्याचा आहे. आरोग्याचा विचार करताना कुटुंब नियोजन हे अत्यंत आवश्यक आहे. मासिक पाळीतील समस्यांचीही महिलांना पुरेशी माहिती नसते. शिक्षणाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास शिक्षणाचा हक्कात ६ ते १४ वयोगटांपर्यंत शिक्षण हे अनिवार्य करण्यात आलेले आहे. तज्ज्ञ सांगतात की, ० ते ६ या वयोगटात मेंदू अधिक विकसीत होतो, त्यामुळे आपण हे कसे साध्य करू शकू हा मला प्रश्न आहे. त्यामुळे याचाही समावेश धोरणात होणे गरजेचे आहे. आता १४ वय म्हणजे, प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण हे वेगवेगळे आहे. आम्ही जेव्हा शाळेत सातवीच्या मुलांना सेंड-ऑफ देण्यासाठी जातो तेव्हा नवीन शाळेत जायला मिळणार म्हणून मुले खूष असतात. मात्र, मुली आम्हाला येऊन सांगतात, मॅडम, मला पुढे खूप शिकायचे आहे. पण, माझे आईवडिल, माझे लग्न करून देतायेत. अगदी दुर्गम क्षेत्रात जाण्याची गरज नाही. विद्येचे माहेर घर असलेल्या पुण्यातही वालविवाह होत आहेत. शैक्षणिक धोरणात असा उल्लेख हवाय की, शिक्षणाचा हक्क हा १६ किंवा १८ वयापर्यंत वाढविण्यात आला पाहिजे. सर्व शिक्षण अभियान व माध्यमिक शिक्षण अभियान एकत्र करून सरकारने समग्र शिक्षण केले आहे. सरकारचे हे सकारात्मक पाऊल आहे. कामाच्या ठिकाणी(वर्क प्लेस) पाळणा घरे अत्यंत आवश्यक आहे. मसुद्यात त्याचा उल्लेख आहे. कायद्याने ते अनिवार्य केलेले असूनही दुर्दैवाने, अद्याप त्याची अंमलबजावणी होत नाही. आणखी एक विषय आहे. आमचे जे काही मित्र सी.ओ. आहेत ते सांगतात की, महिलांना बाळंतपणाची रजा द्यावी लागते, त्यासाठी पाळणाघरे ठेवावी लागतात. त्यामुळे महिलांना नोकरीवर घेण्याचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. त्यामुळे आकडेवारीनुसार शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त असले तरी, टक्केवारीनिहाय आपण कमी पडत आहोत. नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे होणे गरजेचे आहे. त्याचा धोरणाच्या मसुद्यात उल्लेख व्हायला हवा. अलिकडे शहरीकरण फार मोठ्या प्रमाणात वाढतेय, त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो, त्याकडेही लक्ष द्यायला हवे.



# महिला धोरणामुळे स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध झाले : निर्मला सामंत



१९९४ मध्ये जे महिला धोरण जाहीर झाले, त्याचे श्रेय शरद पवार साहेबांना जाते, आज आपण जे येथे आहोत, ते त्यांच्यामुळे यात कोणाचेही दुमत असू शकत नाही. पहिला राष्ट्रीय महिला आयोग १९९२ ला स्थापन झाला दिल्लीत स्थापन झाल्यानंतर ते लगेचच महाराष्ट्रातही १९९३ ला स्थापन झाले. दिल्ली पाठोपाठ महिला आयोगाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. १९९४ ला महाराष्ट्रात महिला धोरण जाहीर झाले. त्यानंतर १ जून १९९४ ला ७४ वी घटनादुरुस्ती लागू करण्यात आली. लोकसभा, विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण अद्याप नाही. पवार साहेबांनी ते मनावर घेतले तर लवकर होईल.

महाराष्ट्रात महिला धोरण जाहीर झाले, त्याला २५ वर्षे पूर्ण होत असल्याने आपण त्याचा आढावा घेत आहोत. १९९४ ला जे महिला धोरण जाहीर झाले ते देशातले पहिले महिला धोरण असून त्याचे जनक पवार साहेबच आहेत. हे क्रांतिकारक धोरण असल्याचे आपण म्हणतो, कारण निर्णय प्रक्रियेत महिलांना केंद्रस्थानी ठेवावे. त्यासाठी तिचा रिसोर्स अलोकेशनमध्ये वाटा असावा. आज आपण जे जेंडर बजेट बघतो, त्याचे बीज यात घातले गेले होते. जेंडर बजेट म्हणजे रिसोर्सेस अलोकेशन! तिचा अनेक क्षेत्रांत विकास व्हावा, असे धोरणाचे मूलभूत स्थान आहे. त्याच्यात मॅग्ना चार्टा हा शब्द सर्वप्रथम वापरण्यात आला व त्याचे स्वागत सर्वच थरातून करण्यात आले. त्याच्यात असा उल्लेख आहे की, सावित्रीबाई फुले यांच्यासारख्या ज्या अनेक क्रांतिकारक स्त्रिया होऊन गेल्या, त्या चळवळीतील त्यांच्या वारस या पुरुष नाहीत तर, महिला आहेत, मुली आहेत. त्यांचा जो हक्क आहे, तो त्यांना देण्याचे यात अधोरेखीत करण्यात आलेले आहे. म्हणून, त्यांना समान दर्जा देणे, घटनात्मक अधिकार देणे, याबद्दल सरकार वचनबद्ध आहे. त्यातील जे गाभा धोरण आहे, त्याच्यात स्त्रियांच्या गुणात्मक दर्जाचा उल्लेख आहे. स्त्रिया या समाजाच्या विकासातील महत्त्वाचा घटक आहे, हे स्वीकारून हे धोरण तयार केले आहे. ९४ चे महिला धोरण हे सरकारी असले तरी, ते क्रांतिकारी आहे. कारण, या धोरणात प्रथमच 'महिला सबलीकरण' हा शब्द वापरण्यात आला. महिला सबलीकरण या नवीन संकल्पनेचा जन्म झाला. त्या नंतर मी पवार साहेबांची अनेक भाषणे ऐकायची. हे जरी झाले तरी पुरुषी मानसिकता बदलत नाही. त्यामुळे हे महिला धोरण अत्यावश्यक आहे. महिला धोरणामुळे स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध झाले. म्हणून, तिच्याकडे अनुकंपेने न पाहता ती सशस्त्र आहे. त्यामुळे पुरुष तिला काही प्रमाणात सबल मानू लागला. त्यामुळे स्त्रीमुक्तीच्या व्याख्येत बसेल असे हे धोरण आहे. आज जो महिलांना वडिलोपार्जित संपत्तीत वाटा मिळतो, त्याचे बीज या महिला धोरणात आहे. महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. गेल्या २५ वर्षांत आपण पाहिले तर, महिलांच्यात सकारात्मक बदल हा झालेलाच आहे. ९४ ला जेव्हा धोरण झाले तेव्हा दर तीन वर्षांनी त्याचा आढावा घ्यायचा असे ठरले होते. त्याप्रमाणे वेळोवेळी आढावा घेतला गेला. राजकीय क्षेत्रात महिला सबलीकरणामुळे लाखो महिला आज ग्रामपंचायत आदि ठिकाणी दिसतात. महिलांना सर्व क्षेत्रांत पुढे आणण्याचे पवार साहेबांनी खूप प्रयत्न केला. असा प्रयत्न करणारे देशातील ते एकमेव नेते आहेत.



# मानवतेच्या दिशेचा प्रवास महत्त्वाचा : श्रुती गणपते



मी जेव्हा खानदेशातून बाहेर पडून राज्यातील विविध भागात फिरायला लागले तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, माझ्या धुळे जिल्ह्यापासून पुणे जिल्ह्यापर्यंत महिलांचे प्रश्न एकाच स्वरूपाचे आहेत. निर्णय प्रक्रियेत महिलांना कोठेही सहभागी करून घेतले जात नाही. 'मला पुरुषांची बरोबरी करायची आहे', ही मानसिकताही आपल्याला बदलायला पाहिजे, असे मला वाटते. कारण, मला बलात्कार, छेडछाडीच्याबाबतीत पुरुषांशी बरोबरी करायची नाही. बाई एक माणूस म्हणून तिला जगण्याचा अधिकार निसर्गानेच दिला होता. निसर्गाने तिला दिलेला अधिकार आपण आज मान्य करायला लागलो. म्हणून, तिला स्वातंत्र्य देण्याची भाषा करायची नाही, असे मी नेहमी सांगते. तुम्ही दिले नाही, तुम्ही आज मान्य करायला शिकता आहात, ही मानसिकता आपण बदलायला पाहिजे. सर, मी वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन काम करते. तेव्हा आपण म्हणता त्याप्रमाणे पितृसत्ताक व्यवस्थेचे वाहक स्त्री-पुरुष दोघेही आहेत. ते दोघेही बरोबरीने काम करीत आहेत. दोघेही त्याला बळकट करण्याचे काम करीत आहेत व काहीजण त्याला तडा देण्याचे काम करीत आहेत. पोलिसाकडे गेल्यास पोलीसही त्या पितृसत्ताक व्यवस्थेतून आलेला असतो. तो ग्रामसेवक असो, पोलीस पाटील असो, तो त्याच व्यवस्थेतून आलेला असतो. मी मुद्दाम अशा पदाचा उल्लेख करते की, ज्यांचा महिलांशी अधिक संबंध येतो. पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, ग्रामसेविका, यांच्या मनात ही समानतेची संकल्पना जोपर्यंत सुस्पष्ट होत नाही, तोपर्यंत तिला तिथे स्थान मिळणे जरा अवघड आहे, असे मला वाटते. ज्या भागातून मी आलेली आहे, तिथून घरातून बाहेर पडताना अजूनही मला परवानगीच काढावी लागते.



मला माझे मित्रही म्हणतात, तुला पुरुष व्हायचे आहे का? पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आम्हाला बलात्कारात, छेडछाडीत, मारहाणीत, कौटुंबिक हिंसाचारात सहभागी व्हायचे नाही. आम्हाला पुरुष व्हायचेच नाही. आम्हाला माणूस व्हायचे आहे. शामची आई'मधील वाक्य आहे, स्त्री ही जन्मत:नसते, घडवली जाते, तसेच, पुरुषही जन्मत: नसतो, तो घडवला जातो. मग हे स्त्री-पुरुष ज्या कुटुंबातून घडवले जातात, ज्या समाजात घडवले जातात, ज्या अनुकरणातून ते शिकत असतात, त्या सगळ्या पद्धतीचा आपण सगळ्यांनी विचार केला पाहिजे. कुटुंब संस्था पातळीवर या सगळ्या गोष्टी केल्या पाहिजेत. लिंग समानतेबाबत बघायला गेलात तर, शाळांमध्ये शिक्षकांची वाईट परिस्थिती आहे, शिक्षिकांचीही वाईट परिस्थिती आहे. ग्रामसेवकाकडे गेला तरी त्याच्यातही न्यूनतेची भावना असते.

बायकांच्या पातळीवर एक महत्त्वाचा मुद्दा असतो. बाई पुढे जायला लागली की, पुरुषसत्ताक व्यवस्थेकडे शेवटचे एक अस्त्र असते, ते म्हणजे, तिच्या चारित्र्यावर चिखलपफेक करणे होय. या संदर्भात तस्लीमा नसरीनची एक कविता आहे. ज्या वेळी तुमच्या चारित्र्यावरती बोलले जाते, ते त्याचे शेवटचे हत्यार असते. तेव्हा जोरजोरात हसा व त्याला सांगा आता तुझ्याकडची हत्यारे संपलेली आहेत.

शेवटी, मी महिलांना पुन्हा विनंती करेन की, लिंग समानता, लिंग विषमता या संकल्पना माणसाच्या मनात खोलवर रुतलेल्या आहेत, त्या दूर होत नाही, स्त्री-पुरुष हे समान आहेत. निसर्गाने स्त्री-पुरुष भेद पुनर्जननासाठी निर्माण केलेले आहेत. त्याच्या अलिकडे व पलिकडे कोणताही भेद नाही. ही संकल्पना मनामनात जोपर्यंत रुजवली जात नाही तोपर्यंत स्त्रियांना दुय्यम वागणूक ही मिळतच राहणार. त्यामुळे लिंग समानतेविषयी अधिक विचार करावा. सगळ्या अधिकाऱ्यांचे लिंग समानतेविषयी प्रशिक्षण घ्यावे. आपल्याला मानवतेच्या दिशेने जायचे आहे. बाईने तिचे बाईपण बाजूला ठेवावे, पुरुषांनी पुरुषपण बाजूला ठेवावे. आपल्याला मानवतेच्या दिशेने प्रवास करायचा आहे.

# Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

पाटणचे लोकप्रिय नेते विक्रमसिंह पाटणकर महाराष्ट्राच्या राष्ट्रवादीचे अध्यक्ष आमदार जयंतराव पाटील ज्यांचे आत्ताच आपण विचार ऐकले ते पाटण तालुक्याचे सुपुत्र आणि सिक्किम राज्याचे राज्यपाल श्रीनिवास पाटील हया सोहळयास उपस्थित असलेले सातारा जिल्हा परीषद अध्यक्ष त्यांचे सर्व सहकारी, ज्यांच्या प्रयत्नाने आणि पुढाकाराणे आज हा जो सोहळा होतोय ते डॉ.अशोक शीलवंत आमचे सहकारी भगवानराव वैराट, आता आपण ज्यांचे विचार ऐकले ते प्रशांत पगारे, उपस्थित असणारे सर्व मान्यवर आणि उपस्थित सहकारी, बंधु आणि भगिनींनो, एक अतिशय महत्वाच्या आणि सांस्कृतिक निष्ठा आणि विचारांच्या दृष्टीने मोलाचे कार्यक्रमासाठी आपण याठिकाणी उपस्थित आहोत. पाटण

**अशोक सर्वांगिण सोसायटी, पुणे यांच्या वतीने पाटण तालुक्यातील ठोमसे गावात सुमारे २५ लाख रुपये खर्च करून नव्याने उभारण्यात आलेल्या पॅगोडाचा लोकार्पण सोहळा श्री. शरद पवार व श्री. श्रीनिवास पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. त्याप्रसंगी शरद पवार यांनी केलेले हे भाषण.**

तालुक्यातील दुर्गम कपारीतले हे ठोंमसे गाव अतिवृष्टी हे या विभागाचे वैशिष्टय, लहानगाव, शेतकरी जमिन मर्यादित, निसर्गाची अनेकवेळा अवकृपा आणि या सर्व संकटावर मात करुन सन्मानाने जगण्याची धडपड करणारा हा सगळा परीसर, आज मुंबई शहरामध्ये आपण गेलो की, कष्टकरणाऱ्या वर्गासंबंधीची जर माहिती घेतली मग तो माथाडी कामगार असेल, लोखंडी क्षेत्रातील कामगार असेल, अन्य क्षेत्रातला कामगार असेल त्यात आपल्याला कटाक्षाने पाटण तालुक्याची संख्या बघायला मिळते. आज पुण्यासारख्या ठिकाणी पिंपरी चिंचवड ही औद्योगिक नगरी झाली, त्या पिंपरी चिंचवड या औद्योगिक नगरीत घाम गाळण्याच्यासाठी, त्याचे सोने तयार करण्याच्यासाठी, देशाला

म्यानमारहून मिळालेल्या गौतम बुद्धांच्या अस्थी व छत्री पॅगोडात ठेवण्यात आली असून अस्थिंचे शरद पवार पूजन करताना, शेजारी अशोक शीलवंत, सौ. कल्पना शीलवंत, शीलरत्न शीलवंत व इतर मान्यवर.



# राज्य घटनेची मोडतोड करून मनुवाद आणण्याचा भाजप सरकारचा डाव



अशोक सर्वांगीण सोसायटीतर्फे शरद पवार यांना अशोकरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी श्री. पवार यांना श्रीनिवास पाटील यांच्या शुभहस्ते मानपत्र प्रदान करण्यात आले. तेव्हा शेजारी जयंत पाटील, अशोक शीलवंत, राजरत्न आणि नगरसेविका सुलक्षणा शीलवंत.

संपत्ती तयार करण्याच्यासाठी जे भूमिपुत्र येतात त्यामध्ये या सभोवतालच्या परिसराची संख्या खुप अधिक आहे. आणि मग अशा एका लहान गावातील अशोक शिलवंत प्राथमिक शिक्षण इथेच केले, माध्यमिक शिक्षण इथे केले, महाविद्यालयीन शिक्षण कराडला केले आणि बाकिच्या उद्योगासाठी पिंपरी चिंचवडला आले आणि नुसतेच आले नाहीतर तिथल्या लोकांचा विश्वास संपादन करण्याच्यासाठी ते यशस्वी झाले. मला आठवतय काही वर्षाच्यापूर्वी माझ्याकडे शिलवंत आले आणि त्यांनी सुचविले की, मी एका बँकेची सुरुवात करतोय, त्याच्या उद्घाटनाला या, मी म्हणालो काय? म्हणाले की, मी एक बँक सुरु करतोय, मी म्हणालो शिलवंत तुम्ही पाटण तालुक्यातले, अडचणीतून आलेले, आणि तुम्ही बँक काढताय? ते म्हणाले होय, बँक काढतोय. आणि ही बँक कोणासाठी काढताय? ते म्हणाले ज्यांच्यासाठी बँकेचे दरवाजे बंद असतात त्यांच्यासाठी मला बँक काढायचीय. काही लोक असतात, बँकेमध्ये अनेकप्रकारचे लोक बघायला मिळतात. मी गेल्या आठ दहा दिवसापूर्वी ठाणे जिल्हयातील आदिवासी पट्टयात होतो आणि आदिवासी पट्टयात गेल्यानंतर तिथल्या आदिवाश्याने माझ्याकडे तक्रार केली की, आम्हाला बँकेत सन्मानाची वागणूक मिळत नाही, मला वेळ होता आणि मी बँकेमध्ये गेलो, त्या आदिवाश्याला घेवून गेलो, त्याच्या अंगावर कपडा नव्हता, फक्त लंगोटी होती. आणि तो कष्टकरी त्याच्या रास्त मागण्यांच्यासाठी आला होता. अधिकाऱ्याने घाईघाईने आम्हाला खुर्ची दिली, आणखीन एक गृहस्थ तेथे आले होते, त्यांच्या गळयामध्ये टाय होता, त्यांनाही खुर्ची दिली, पण त्या आदिवाश्याला काही बस म्हणाले नाही. मी बँकेच्या साहेबाला म्हटल ही काय तुमची पद्धत आहे. तुमच्या पुढे दोन लोक आले, एक नेकटाय लावलेला त्याला तुम्ही खुर्ची देता आणि दूसरा लंगोटीवाला त्याच्याकडे तुम्ही बघत नाही, दोघांनीही चारइंची फडक बांधलय कोणी कुठे बांधलय एवढाच फरक आहे. एकाच्या गळयात आहे, आणि एकाचे खाली आहे. पण गळयाच म्हणून तुम्ही त्याला खुर्ची देता आणि खाली आहे त्याला तुम्ही अपमानाची वागणूक देता. ही गोष्ट चालणार नाही. ही गोष्ट आम्हीलोक सहन करणार नाही. या बँकींगसिस्टीम मध्ये लहान मानसाला शक्तिदेण्याचे धोरण बँकेचे राष्ट्रीयकरण करण्यासाठीचे धोरण इंदिरा गांधीजींनी स्विकारले आणि या धोरणातून या देशाचे चित्र बदलल आणि जर बदलल नसेल तर डॉ.अशोक शिलवंत सारखे लोक पुढे येतील आणि बँका काढतील आणि जेव्हा त्यांनी बँक काढायचा प्रस्ताव माझ्या समोर दिला तेव्हा मी तातडीने होय म्हणालो आणि त्यांच्या बँकेच्या उद्घाटनालाही मी गेलो. आणि मला आनंद आहे की, माणसाला सन्मानाने जगण्याचे साधन या बँकींग सिस्टीम मध्ये करुन देण्याचा प्रयत्न अशोक शिलवंत व त्यांचे सर्व सहकारी करीत आहेत. आज अनेक कार्यक्रम त्यांनी हातामध्ये घेतले आहेत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला नवीन दिशा दिली, आज लोक अस म्हणतात आणि ते सत्य आहे या देशाचे शिल्पकार बाबासाहेब आहेत, घटना त्यांनी दिली, ही घटना मोडूनतोडून नवीन मनुवाद आणण्याचा प्रयत्न धर्मांध व जातीयवादी असलेल्या भाजप सरकारचा आहे. हा प्रयत्न आपल्याला एकजुटीने हाणून पाडावा लागेल, त्यासाठी जनतेत जागृती होणे गरजेचे आहे. सामान्य माणसाला अधिकार दिले पण त्यापेक्षा कितीतरी मोठ्या गोष्टी त्यांनी आपल्या जीवनात केल्या आहेत. आपल्याला या देशामध्ये माहित नाही की, स्वातंत्र्याच्या आधिच्या काळात जे मंत्रीमंडळ होत त्या मंत्रीमंडळात बाबासाहेब आंबेडकर जलसंधारण खात्याचे मंत्री होते. आणि त्यावेळी



त्यांनी काही महत्वाचे निर्णय घेतले. आज या देशामध्ये नदी जोडण्याचा विचार मांडला जातो. हा नदी जोडण्याचा विचार ऐंशी वर्षापूर्वी बाबासाहेबांनी दिला होता. आणि नुसताच नदी जोडण्याचा विचार मांडला नाही त्यांनी सांगितले की या देशात शेती संपन्न करायचे असेल तर या सर्व नद्यांचे पाणी एकत्र केले पाहिजे, धरणे बांधली पाहिजे, कालवे बांधले पाहिजेत, तुम्हाला आश्‍चर्य वाटेल हिंदुस्थानातील एक महत्वाचे धरण हे पंजाबमध्ये भांक्रानांगल आहे आणि या भाक्रानांगलचा प्रशासकिय निर्णय



हा बाबासाहेबांनी घेतला होता. आणि बाबासाहेब इथेच थांबले नाही, धरण बांधून विज तयार केली पाहिजे. अन्यमार्गाची विज ही पर्यावरणाला बाधा निर्माण करते, हायड्रो पॉवर पासून विज बनवली पाहिजे, कोयना धरणामध्ये हायड्रोपावरची विज ही बाबासाहेबांमुळे निर्माण केली जाऊ लागली, आणि ते इथेच थांबले नाहीतर सबंध देशामध्ये विजेचे जाळ निर्माण करण्यासाठी पावरग्रीड कॉर्पोरेशन या देशात काम करते, त्याची स्थापना ऐशी वर्षापूर्वी बाबासाहेबांनी केली. या देशामध्ये जेवढे कामगार आहेत, कष्टकरी आहेत त्यांच्या संरक्षणाच्या कायद्याची सुरुवात स्वातंष्याच्या आगोदर मजूर खात्याचे मंत्री असताना केली. समाजात समता निर्माण करण्यासाठी त्यांनी बौद्ध धम्म स्विकारला. गौतम बुद्धांच्या धम्माच्या या धर्माचा जगामध्ये प्रतिष्ठा निर्माण करण्याच्यासाठीचे काम आज बाबासाहेबांनी केलेले आहे. मला कामा निमित्त बाहेर देशात जावे लागते, मी एकदा मलेशियात बँकॉकच्या जवळ गौतमबुद्धांचा ६० ते ७० फुट उंचीचा पुतळा झोपलेल्या अवस्थेत त्या ठिकाणी पाहिला आहे. जगातले लोक त्याठिकाणी दर्शनाला येतात. त्या देशातील लोकांशी सुसंवाद करण्याची संधी मला मिळाली आणि त्यांनी विचारले की भारताचे हे फारमोठे देणे आहे आम्हाला, बुद्धांनी आम्हाला आदर्श दिला, बुद्धांनी शिकविले की, शेवटच्या माणसाच्या गरिबातल्या गरीब



शेवटच्या माणसाचे आश्रू पुसण्याचे काम तुला करायचे आहे, आणि त्यासाठी राजसत्ता सोडण्याची तयारी सुद्धा दाखविली पाहिजे. आणि बुद्धांनी तो विचार स्विकारला, राजसत्ता त्याग करुन मानवाच्या कल्याणासाठी योगदान दिले. जगात बुद्धांचे विचार पाठविण्याचे काम बाबासाहेबांनी केले. आणि बुद्धांच्या विचाराने भारताला ओळखतात. मला अतिशय आनंद आहे की, या लहानशा गावात बुद्धांची मुर्ती बसविली, पॅगोडा बसविला, बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे, महात्मा फुले, या महामानवांची पुतळे बसविले असे अनेक मान्यवर ज्यांनी समाजासाठी योगदान दिले, त्यांचे पुतळे बसविण्याचे काम शिलवंतांनी केले त्याबद्दल शिलवंतांचे अभिनंदन करतो, पुढच्या कामासाठी विशिष्ट वेळेत मला निघावे लागत आहे त्याबद्दल आपल्या सर्वांची परवानगी घेवून रजा घेतो. जय हिंद, जय बुद्ध, जय भारत!

# ज्यावेळी देशातील निवडणूका होतील त्यावेळी देशातील चित्र बदललेले असेल : शरद पवार



काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण व माणिकराव ठाकरे यांनी शरद पवार यांची समक्ष भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी डावीकडून जयदत्त क्षीरसागर, सचिन साठे, सुनील तटकरे, शिवाजीराव गर्जे व इतर मान्यवर.

**मुंबई : हा चार राज्याचा प्रश्न नाही तर यापुढे लोकांना ज्याठिकाणी संधी मिळेल त्या ठिकाणी आणि ज्यावेळी निवडणूका होतील त्यावेळी देशातील चित्र बदललेले दिसेल असा जबरदस्त विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला.**

खासदार शरद पवार यांच्या ७८ व्या वाढदिवसानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आपल्या कार्यकर्त्यांकडून अभिष्टचिंतन स्वीकारण्यासाठी आलेल्या शरद पवारांनी मिडियाशी बोलताना आपली भूमिका मांडली.

काल चार राज्यांचा लागलेला निकाल पाहता लोकांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केली आहे. कालचे जे निकाल आले आहेत त्याबद्दल भाजप सोडून इतर पक्ष यांच्यामध्ये समाधान आहे.भाजपला पर्याय देण्यासाठी काँग्रेस हा पर्याय महत्वाचा आहे असेही शरद पवार यांनी सांगितले.

सुप्रिम कोर्टाच्या चार न्यायाधीशांनी पत्रकार परिषद घेतली...आरबीआयच्या गव्हर्नरची नेमणूक सत्ताधारी पक्षांनी केली होती त्याचाही राजीनामा त्यांनी दिला आहे... सीबीआयमधील वाद समोर आला आहे. काही मर्यादा ठेवायला पाहिजे. पंतप्रधानांनी जी काही आश्वासने दिली होती ती या निवडणूकीत ते विसरले आणि फक्त एक कुटुंब मांडत राहिले. ज्यांनी पंडित नेहरु, इंदिरा गांधी यांना पाहिले नाही. मात्र तरीही एका कुटुंबावर हल्ला करत राहिले त्याचा परिणाम असा निघाला आहे. दरम्यान त्यांच्यावर हल्ले का करण्यात आले याबाबत लोकांमध्ये प्रश्न होता असेही शरद पवार यांनी सांगितले.

देशाच्या संविधानावर हल्ला झाला. त्याबद्दलही लोकांनी नाराजी व्यक्त केली आहे. शेतकरी, आदिवासी यांचा फटका बसेल असे वाटले होते. मात्र शहरी भागात ही ५० टक्के त्यांना फटका बसला आहे ही परिवर्तनाची सुरुवात आहे असे स्पष्ट मत शरद पवार यांनी व्यक्त केले. काँग्रेसने नेतृत्व नवीन पिढीकडे सोपवलं ते लोकांनी मान्य केलं आहे. आघाडी नाही मात्र देशपातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी सर्वांनी आपले मतभेद विसरुन एकत्र येण्याचे आवाहनही शरद पवार यांनी यावेळी केले.

तिसरी आघाडी किंवा युपीए ३ असं काही नाही असणार. मात्र देशपातळीवरील प्रश्नासाठी आपापसातील मतभेद विसरुन एकत्र आले पाहिजे अशी स्पष्ट भूमिकाही खासदार शरद पवार

यांनी मांडले.

दरम्यान निवडणूकीपर्यंत भाजप नेतृत्वाला ठोकण्याचे काम शिवसेना करेल आणि निवडणूकीमध्ये एकत्र येतील याबाबत शंका नाही असा टोलाही शरद पवार यांनी शिवसेनेला लगावला.

**जाणता राजाला' शुभेच्छा देण्यासाठी अफाट गर्दी...**

वयाची अठ्ठयाहत्तरी...चेहऱ्यावर कोणताही थकवा नाही... शुभेच्छा देण्यासाठी महाराष्ट्रातून आलेल्या तमाम कार्यकर्त्याला तितक्याच उत्साहाने हसतच हस्तांदोलन...कधी मायेचा हात पाठीवर फिरवत तर कधी सोबत उभं राहून फोटोसेशन...असं जवळजवळ चार तास उभं राहून...महाराष्ट्राच्या या जाणता राजाने आपल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वीकारल्या...

'जाणता राजा' खासदार शरद पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहामध्ये अक्षरश: अलोट गर्दीचा महापूर पाहायला मिळाला... राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यालयाच्यावतीने राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या ७८ व्या वाढदिवसाचा शुभेच्छा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्या लोकनेत्याला शुभेच्छा देण्यासाठी रांगाच रांगा लावल्या होत्या.

राज्यात भीषण दुष्काळ असून त्यामध्ये बळीराजा होरपळत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी आपल्या वाढदिवशी पुष्पहार, पुष्पगुच्छ किंवा भव्य असा कार्यक्रम सोहळा न घेण्याचा निर्णय घेतला होता आणि कार्यक्रमांचा शक्य तो निधी दुष्काळग्रस्तांना देण्याचे आवाहन केले होते त्यानुसार प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी पक्षाच्यावतीने 'चला देऊया मदतीचा हात' ही संकल्पना अंमलात आणण्याचे आवाहन केले होते.

खासदार शरद पवार यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये महाराष्ट्रातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या न थकता जवळजवळ चार तास उभे राहून शुभेच्छा स्वीकारल्या.

याचवेळी खासदार शरद पवार यांच्याकडे दुष्काळग्रस्तांसाठीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमाच्याठिकाणी खासदार शरद पवार यांच्या आयुष्यातील घटनांचा वेध घेणारे प्रसंग फोटोप्रदर्शनातून मांडण्यात आले होते.

खासदार शरद पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी पक्षातील कार्यकर्ते, नेते, पदाधिकारी जसे उपस्थित होते तसेच विविध पक्षातील राजकीय नेते, पदाधिकारी मोठया संख्येने यशवंतराव प्रतिष्ठानमध्ये उपस्थित होते. यावेळी विशेष उपस्थिती ही काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, कर्नाटकचे माजी गृहमंत्री पी.जी.आर.सिंदिया यांची होती. सुरुवातीला राष्ट्रवादीचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील, ज्येष्ठ नेते आणि माजी उपमुख्यमंत्री आमदार छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री खासदार विजयसिंह मोहिते पाटील,राष्ट्रीय सरचिटणीस सुनिल तटकरे, राष्ट्रीय प्रवक्ते नवाब मलिक, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, विधानसभेचे माजी अध्यक्ष आमदार दिलीप वळसेपाटील, माजी मंत्री मनोहर नाईक, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड,पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार हेमंत टकले, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ आदी नेत्यांसह सर्व आमदार, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.शिवाय राजपत्रित अधिकारी आणि एमसीएचे पदाधिकारी यांनीही शरद पवारसाहेबांना शुभेच्छा दिल्या.



**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी गोळा केलेला सुमारे पावणे दोन लाख रुपयांच्या निधीचा धनादेश अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष गफार मलिक यांच्या नेतृत्वाखाली श्री. शरद पवार यांना सुपूर्त करण्यात आला. त्यावेळी मुस्लिम समाजातील राज्यातील अनेक नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## घंटाकर्ण, नवी दिल्ली
## चव्हाटा


# कुणाची वाचा बसली, कुणाला कंठ फुटला?

नुकत्याच पाच राज्यातल्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. भाजपला एकाही राज्यात विजय मिळवता आला नाही. अगदी ५ विरुध्द ० !

भाजपच्या.... त्याही पेक्षा विष्णु-अवतार - ब्रह्मांडनायक, महानायक आणि त्यांचे सहनायक यांच्या भ्रमाचा भोपळा फुटला ! विजयानंतर सर्वांनाच कंठ फुटलेला असतो. सर्वचजण पोपटासारखे त्यावर बोलत असतात. पण या पराभवाने काय झाले कुणास ठाऊक ?? विष्णुअवतारी ब्रह्मांडनायक चूप ! एकदम चूप !! त्यांचे सहनायक ...... ते पण एकदम गप्प !! अरे असं कसं ? त्रिपुरात विजय मिळविल्यानंतर जणूकाही देशभरात विजय मिळाल्याचा जल्लोष या दोन्ही नायकांनी केला होता. पक्षाच्या नव्यानेच बांधलेल्या सप्ततारांकित आलिशान मुख्यालयाच्या वरच्या मजल्यावरच्या सज्ज्यातून दोघा नायकांनी खाली जमलेल्या भाजपच्या नेत्यांना हात हलवून प्रोत्साहित केले होते. ते नेतेही प्रफुल्लित होऊन विभोर झाले होते !!

व्वाह ! काय तो सोहळा !!!!

पण तीन राज्यात पराभव काय तो झाला आणि दोन्ही नायकांची वाचाच बसली की हो ? विजयाचा उन्माद सोपा असतो पण पराभव पचवायला फार धैर्य व हिंमत लागते! सर्वसाधारणपणे अशा मोठ्या पराभवानंतर पक्षनेतृत्व आत्मपरीक्षण व कारणमीमांसेचे निवेदन करीत असते. परंतु या पराभवामुळे आलेली बधीरता अशी होती की साधे एवढे




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



निवेदन करण्याची शुध्दही जोडगोळीला राहिली नाही ! पण जोडगोळीची वाचा बसली तरी अन्य कुणाला तरी वाचा फुटली ! होय, केंद्रीय परिवहन, रस्तेबांधणी मंत्री नितिन गडकरी यांनी हिमतीने धाडसी विधाने करुन स्वतःचा गड राखला !

गडकरींनी तीन विधाने केली. - विजयाचे श्रेय घेण्याप्रमाणेच पराभवाची जबाबदारीही नेतृत्वाने घेतली पाहिजे, जर पक्षाचे आमदार-खासदार व कार्यकर्ते अनुचित वर्तन करीत असतील तर त्याची जबाबदारी पक्षाध्यक्षावर येते, पंडित नेहरूंची प्रशंसा ! तिन्ही निवेदने ही सरळसरळ पक्ष आणि सरकारच्या नेतृत्वाविरुध्द होती ! याचा अर्थ काय? अर्थ एकच.......... गडकरी बोलले पण त्यांचा बोलविता धनीही कुणीतरी आहे ! त्या धन्याला वर्तमान नेतृत्वाचे वर्तन आचरण नापसंत आहे ! भाजपच्याच वर्तुळातून काही मंडळींनी त्यांच्या या बोलण्याचा आणखी एक अर्थ सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार गडकरी पक्षाध्यक्ष होते. त्यांना दुसऱ्यांदा पक्षाध्यक्ष होऊ न देण्याचा घाट भाजपमधील काही मंडळींनी घातला होता आणि तो यशस्वी केला होता. गडकरींना पक्षाध्यक्षपद सोडावे लागले होते. त्याची 'परतफेड' गडकरी करीत आहेत असे या अंतःस्थांचे म्हणणे पडले. कानावर असेही आले की मध्य प्रदेशाचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान हेही दोन्ही नायकांवर विलक्षण नाराज आहेत. प्रचाराची धुरा आपल्या हातात असती तर मध्य प्रदेशात पुन्हा भाजपचे सरकार स्थापन होऊ शकले असते व तेवढा निसटता विजय मिळविता आला असता. परंतु या दोघांनी केलेला प्रचार, प्रचारातली भाषा आणि गांधी कुटुंबियांना पातळी सोडून केलेले 'टार्गेट' याची जनमानसात व विशेषतः युवकांमध्ये प्रतिकूल प्रतिक्रिया झाल्याची तक्रारच चौहान यांनी संघ नेतृत्वाकडे केल्याचे समजते. आता हळूहळू हे लोण संसदीय पक्षापर्यंतही पोहोचताना आढळते.



असे सांगतात की गेल्या दोन संसदीय पक्ष बैठकीत दोन्ही महानायक अनुपस्थित होते. त्यांच्याऐवजी राजनाथसिंग, रविशंकर प्रसाद यांना 'बॅटिंग' करायला पाठविण्यात आले. पण आता सहनायक उर्फ पक्षाध्यक्षांनी भाजप खासदारांना राज्यवार भेटण्यास सुरुवात केली आहे. ते त्यांना बोलायला सांगतात आणि कुणी काही मुद्दे उपस्थित केल्यास त्यावर 'सोल्यूशन'(तोडगा) तुम्हीच सांगा असेही बोलतात. पण पराभवामुळे नायक-जोडीची गुर्मी कमी झाल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये विलक्षण आनंद आहे!!!

राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!




## आभार यात्रा ?? अजिबात नाही !!!

मध्य प्रदेशात भाजपची निसटती हार झालेली असली तरी जनमानसात शिवराजसिंग चौहान यांच्या पराभवाचे दुःख आहे असे सांगितले जाते. शिवराजसिंग यांना बहुधा याची जाणीव असावी. त्यामुळे त्यांनी राजकीय रणनीतीचा भाग म्हणून मुद्दाम मतदारांनी दिलेल्या जनादेशाबद्दल त्यांना धन्यवाद देण्यासाठी 'आभार यात्रा' काढण्याचे ठरविले.

यात्रेचे आयोजन करण्यात आले. बाकीचे तपशीलही ठरविण्यात आले. अचानक पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाकडून निरोप गेला 'आभार यात्रा वगैरे काही काढण्याची गरज नाही!' बिचारे शिवराजसिंह मुकाट्याने हात चोळत गप्प बसले. परंतु भाजपच्या वर्तमान नेतृत्वाबद्दल त्यांच्या मनातली नाराजी वाढत चालली आहे हे निश्चित ! तेच नव्हे तर त्यांचे शेजारी छत्तीसगढचे माजी मुख्यमंत्री रमणसिंग हेही मनातल्या मनात राष्ट्रीय नेतृत्वाबद्दलच्या नाराजीचे कढ गिळत बसले आहेत. असे सांगतात की छत्तीसगढमधील पराभवाला योगी आदित्यनाथ यांच्या सभा कारणीभूत ठरल्या. छत्तीसगदढमध्ये योगी महाराजांच्या सर्वाधिक सभा झाल्या होत्या. तेथील एका भाजपनेत्याच्या म्हणण्यानुसार पंतप्रधान, भाजप अध्यक्ष आणि योगी महाराज यांच्या सभा ज्याज्या मतदारसंघांमध्ये झाल्या तेथील बहुतेक भाजप उमेदवारांवर हरण्याची नामुष्की आली. आता भाजप अंतर्गत कशी नाराजी पसरलेली आहे आणि चिघळत चालली आहे याचा अंदाज यावा !




## सिंहस्थ पर्व आणि पराभव ??

मध्य प्रदेशात भाजपचा निसटता पराभव झाला. अगदी हातातोंडाशी आलेला सत्तेचा घास हिरावून घेतला गेला. या पराभवाचे खापर फोडायचे कुणावर ? शिवराजसिंग समर्थक याचे खापर आता सिंहस्थ पर्वावर फोडत असल्याचे सांगण्यात येते. सिंहस्थ पर्व ही काय भानगड आहे बुवा ? सिंहस्थ पर्व म्हणजे कुंभमेळा हो ! नाशिकला होतो, तसाच हरिद्वार, उज्जैन, प्रयागलाही(अलाहाबाद) होतो ना ! दर बारा वर्षांनी ही पर्वणी येत असते. २०१६ मध्ये शिवराजसिंग चौहान यांनी उज्जैनच्या सिंहस्थाचे यजमानपद भूषविले होते. आता कार्यकर्ते मंडळींचे म्हणणे असे आहे की जो मुख्यमंत्री हे यजमानपद भूषवितो त्याला मुख्यमंत्रीपदाला मुकावे लागते ! बाप रे ! याची उदाहरणे दाखलेही ते देतात.



राज्याचे पहिले मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांच्या कारकिर्दीत सिंहस्थाची पर्वणी आली होती आणि काही महिन्यातच त्यांचे निधन झाले. त्यानंतर गोविंद नारायणसिंग हे मुख्यमंत्री असताना त्यांनाही सिंहस्थाचे यजमानपद स्वीकारावे लागले होते आणि त्यांनाही काही महिन्यातच मुख्यमंत्रीपदावरुन पायउतार व्हावे लागले होते. ही घटना १९६८ची ! भाजपचेच मुख्यमंत्री असलेले सुंदरलाल पटवा यांच्यावरही ही पाळी आली होती. १९८० व १९९२ मध्ये ! साध्वी व संन्यासी असलेल्या उमा भारती यासुध्दा या चक्रातून सुटू शकल्या नाहीत. २००३ मध्ये त्या मुख्यमंत्री

झाल्या आणि २००४च्या सिंहस्थानंतर त्यांना वादग्रस्त अवस्थेत मुख्यमंत्रीपद सोडावे लागले होते. २०१६चे उदाहरण वर दिलेलेच आहे.

आता उज्जैनमधील पुढील सिंहस्थ २०२८ मध्ये आहे. कमलनाथ यांची कारकिर्द तेवढी चालणार असेल तर त्यांनाही सिंहस्थाचे यजमानपद स्वीकारायचे की नाही याचा निर्णय करावा लागेल. अन्यथा.......... ? वर अनेक उदाहरणे दिलेलीच आहेत !


## काँग्रेस...छप्पर फाड विजय?

देवानंदच्या फंटूश सिनेमातलं गाजलेलं गाणं--- देने वाला जब भी देता पूरा छप्पर फाड के देता....! राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या तीन राज्यात काँग्रेसला मिळालेला विजय आणि सरकारस्थापना याचा पक्षाला झालेला आनंद काय तो वर्णावा?? कर्नाटकात देवेगौडा-कुमारस्वामी पिता-पुत्रांच्या मदतीने काँग्रेसने भाजपला मात दिली. परंतु अखेर तेथे आघाडीचे संयुक्त सरकारच स्थापन होऊ शकले. सत्तेत भागीदारी करावी लागली. पण राजस्थान व मध्य प्रदेशात निसटते....काठावरचे बहुमत मिळाले तरी सरकार काँग्रेसचेच स्थापन झाले याचा वेगळा आनंद पक्षाला झाला. छत्तीसगढमध्ये तर निर्विवाद बहुमत मिळाले. गेली पावणेपाच वर्षे हुलकावणी देत असलेले यश काँग्रेसला अखेर गवसले ! अति-प्रतीक्षेतील यशाचे सुख व आनंद काही औरच !! परंतु विजयाबरोबर नव्या जबाबदाऱ्या आणि आव्हानेही येत असतात. पक्षाध्यक्ष झाल्यानंतर राहूल गांधी यांना प्रथमच एक नव्हे तर तीन राज्यातल्या नेत्यांच्या निवडीचे आव्हान स्वीकारावे लागले होते. ते त्यांनी यशस्वीपणे पार पाडले. पण गोष्टी तेथेच थांबत नाहीत. तिन्ही राज्यातले मुख्यमंत्री हे तेथील प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षही होते. तर अशोक गेहलोत काँग्रेस महासमितीच्या संघटनेचे सरचिटणीस होते. एक व्यक्ती -एक पद या निकषानुसार आता या नेत्यांना एक पद रिकामे करावे लागणार आहे आणि त्यामुळे होणाऱ्या रिक्त जागा भरण्याची जबाबदारी राहूल गांधींवर असेल ! राजस्थानात उपमुख्यमंत्री झालेले सचिन पायलट हे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. कमलनाथ मध्य प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते तर छत्तीसगढचे मुख्यमंत्री भूपेश बघेल तेथील प्रदेश काँग्रेस अध्यक्ष होते. कमलनाथ हे हरयानाची सूत्रेही सांभाळत होते.

यामुळे राहूल गांधी यांना आता या तीन प्रदेशात नवे काँग्रेस अध्यक्ष नेमावे लागतील. हरयाना राज्याची सूत्रे




राष्ट्रवादी स्वाभिमानी आधार! राष्ट्रवादी विचार !!



कुणा सरचिटणीसाकडे सोपवावी लागतील. प्रश्न उरतो तो महासमितीच्या पक्षसंघटनेच्या सरचिटणीसांचा ! गेहलोत यांच्यापूर्वी या जागेवर जनार्दन द्विवेदी ते काम पहात असत. राहूल गांधी अध्यक्ष झाल्यानंतरच्या फेरबदलात द्विवेदी यांना हे पद सोडावे लागले. आता या पदासाठी काँग्रेस वर्तुळातून पुन्हा त्यांच्या नावाची चर्चा कानावर पडू लागली आहे. प्रश्न आहे तो द्विवेदी यांना ते मान्य असेल काय? लोकसभा निवडणुकीपूर्वी राहूल गांधी यांना पक्षसंघटनेची डागडुजी करावी लागणार आहे. ती जबाबदारी ते कशी पार पाडतात हेही पहावे लागेल !

## अनावधान की मुद्दाम ?

संसदेत कधीकधी असे प्रसंग येतात की त्याची संगती किंवा त्याचा अर्थ कसा लावायचा असा प्रश्न पडतो. जम्मू-काश्मीरमध्ये राष्ट्रपति राजवट लागू करणाऱ्या ठरावावर चर्चा चालू होती. काँग्रेसतर्फे शशि थरुर बाजू मांडत होते. आपल्या निवेदनात त्यांनी भाजप व पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी - पीडीपी यांची आघाडी कशी अनैसर्गिक होती हे स्पष्ट करताना इंग्रजीत 'अन-नॅचरल मॅरेज' असे वर्णन केले. गृहमंत्री राजनाथसिंग यांनी चर्चेला उत्तर देताना थरुर यांच्या 'अन-नॅचरल मॅरेज' या शेऱ्याचा उल्लेख केला. राजनाथसिंग हे विनोद करण्याबद्दल फारसे ओळखले जात नाहीत. ते म्हणाले, 'भाजप-पीडीपीची आघाडी(लग्न) अनैसर्गिक(अन-नॅचरल) होती की नाही हे सांगू शकत नाही पण कोणत्याही विवाहाचा विच्छेद होऊ नये हीच इच्छा असते !'

या त्यांच्या विधानावर थरुर यांनी राज्यपालांच्या वादग्रस्त भूमिकेचा उल्लेख केला. परंतु अचानक पीठासीन अधिकाऱ्यांकडून आलेल्या टिप्पणीने हंशा पिकला पण काही सदस्यांमध्ये धक्क्याची भावना आढळून आली. विवाहविषयक टिप्पण्यांची देवाणघेवाण होतानाच पीठासीन अधिकाऱ्यांनी राजनाथसिंग यांना म्हटले , 'तुम्ही त्यांना (थरुर यांना उद्देशुन) विवाह तज्ञ समजता काय ?' त्यांच्या टिप्पणीने भाजपच्या सदस्यांमध्ये हंशा पिकला. परंतु काही वरिष्ठ सदस्यांना हे रुचले नाही. डॉ.फारुक अब्दुल्ला तर चांगलेच संतापले व







त्यांनी जागेवरुनच हसणाऱ्या सदस्यांना 'शरम आनी चाहिए' असा शेरा मारला. त्यावर भाजप सदस्य आक्रमक होऊ पहात होते पण राजनाथसिंग यांनी धोका

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

ओळखून त्यांना शांत केले. शशि थरुर यांचा सुनंदा पुष्कर यांच्याबरोबर झालेला विवाह, त्यातून निर्माण झालेले वाद, त्या दोघांमधली भांडणे आणि अखेरीस सुनंदा पुष्कर यांचा झालेला संशयास्पद मृत्यु या पार्श्वभूमीवर झालेल्या शेरेबाजीचा अर्थ न कळण्याइतके थरुर निर्बुध्द नाहीत. ते अस्वस्थ झालेले दिसून येत होते. कधीकधी अनावधानाने म्हणा किंवा अन्य हेतुने म्हणा हे प्रकार घडतात पण जबाबदार मंडळींकडून ते घडतात तेव्हा ते खटकणारे असते! विशेषतः कुणाच्या खासगी -वैयक्तिक आयुष्यावर जर आपल्या शेरेबाजीची छाया पडत असेल तर जबाबदार पदांवरील मंडळींकडून संयमाची अपेक्षा करणे गैर नाही !

## अच्छे दिन ?? आये थे कब ????

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु झाले. परंतु तीन हिंदी भाषक राज्यातली सरकारे गमावण्याच्या दुःखद प्रसंगाने त्याची सुरुवात झाली. संसदेच्या बारा प्रवेशद्वारांपैकी चार नंबरचे प्रवेशद्वार महत्वाचे आहे. या दारातून मंत्री, खासदार व पत्रकार, वरिष्ठ अधिकारी ये-जा करतात. या दरवाज्याच्या समोरच 'बाईट' देण्यासाठी सोपे व्हावे म्हणून इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी तंबू उभारण्यात येतो. एके दिवशी भाजपच्या मार्गदर्शक मंडळाचे सदस्य आणि आपल्या मार्मिक, टोकदार व बोचऱ्या टिप्पण्यांसाठी प्रसिध्द असलेल्या मुरलीमनोहर जोशी यांचे आगमन झाले. या दिवशी अत्यंत थंड व बोचरे वहात होते. जोशी यांना सगळेजण 'डॉक्टरसाब' म्हणून संबोधतात. ते गाडीतून उतरल्यावर जवळच उभ्या असलेल्या पत्रकारांनी 'डॉक्टरसाब, आज हवा बहुते तेज बह रही है!' अशी टिप्पणी केली. जोशींनी त्यावर 'हं' म्हणून संमतीदर्शक मान हलविली. तेवढ्यात दुसऱ्या पत्रकाराने पुस्ती जोडली, 'इस तेज हवा में अच्छे दिन बह न जाय ?' (या वाऱ्याने अच्छे दिन उडून न जावोत) त्यावर मिष्किल जोशींनी तत्काळ हजरजबाबीपणा दाखवून, '(अच्छे दिन) आये थे कब ??' अशी टिप्पणी करताच उपस्थित पत्रकारांमध्ये एकच हंशा पिकला !





## सुपातले आणि सुपाबाहेरचे??



जात्यामधले दाणे रडती, सुपातले हसती....... ! मराठीतले हे एक भावगीत आहे आणि त्या आशयाची म्हणही आहे. या प्रसंगातही सूप आहे. पण ते प्यायचे आहे ! धान्य पाखडण्याचे नव्हे ! तर मंडळी तुम्ही एका अतिशय वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत सहभागी आहात. अत्यंत महत्वाच्या निर्णयासाठीची ती बैठक आहे. प्रदीर्घ चर्चेनंतर काही वेळेसाठी चर्चा थांबते. साहजिकच त्या वेळी चहा-कॉफी, बिस्किटे यासारखा अल्पोपहार केला जाणे अपेक्षित असते. भोजनाच्या आसपासची वेळ असेल तर सूपही उपस्थितांना सादर केले जाते. हा काही फार खर्चिक विषय नसतो तर त्यात शिष्टाचाराचा भाग असतो. तीन राज्यांचे मुख्यमंत्री निवडण्यासाठीची अंतिम बैठक काँग्रेस अध्यक्ष राहूल गांधी यांच्या '१२ तुघलक लेन' येथील निवासस्थानी झाली. या बैठकीत राहूल यांच्याशिवास सोनिया गांधी, प्रियंका गांधी, ए.के.अँटनी, गुलाम नबी आजाद व अन्य काही मोजके वरिष्ठ काँग्रेसनेते सहभागी होते. माहीतगारांनी वर सांगितल्याप्रमाणे भरपूर चर्चा होऊन बैठक काही वेळासाठी थांबली. त्यामुळे थोडी पांगापांगही झाली. कुणी स्वच्छतागृहात गेले, कुणी आणखी काही कारणास्तव बाहेरच्या व्हरांड्यात गेले. खोलीतील मुख्य टेबलावर राहूल, सोनिया व प्रियंका बसले होते. त्यांच्या मागे ठेवलेल्या खुर्च्यांमध्ये अँटनी व इतर एक-दोघे बसलेले होते. एवढ्यात घरगुती सहाय्यक तेथे आला. त्याच्या हातात ट्रे होता. वाफाळणारे सूप घेऊन तो आला होता.





अपेक्षा होती की तो प्रथम राहूल, सोनिया व प्रियंका यांना सूप देऊन पुन्हा उरलेल्या उपस्थितांसाठीही सूप घेऊन येईल. तिघेही सर्वोच्च नेते सूप पिता पिता चर्चा करीत राहिले. त्यांच्या मागे अँटनी व इतर नेते गप्पा मारत बसले. पण त्यांच्यासाठी काही सूप आले नाही. हे सूप राहूल यांच्या निवासस्थानाजवळच असलेल्या क्लॅरिजेस या सुप्रसिध्द हॉटेलातून मागविण्यात आले होते. बिचारे वरिष्ठ नेते ! केवळ चर्चा म्हणजेच चर्वितचरण करीत बसले ! 'सुपा'तले आणि 'सुपा'बाहेरचे !

## याला योगायोग म्हणावे काय ?

एखादी भेट काही व्यक्तींमध्ये परिवर्तन घडवू शकते. यात अघटित असे काही नाही. विश्वच परिवर्तनशील असते. त्यामागील कार्यकारणभाव काहीही असो ! सध्याच्या सरकारचेच घ्या ना ! सर्वोच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात जवळपास १४ उच्च न्यायालयीन न्यायाधीशांच्या नेमणुकांची शिफारस केंद्र सरकारकडे केली होती आणि 'अहो आश्चर्यम' ? सर्वच्या सर्व नावांना संपूर्ण मंजुरी ! यापूर्वी तुम्हाला आठवत असेल की सर्वोच्च न्यायालयाने काही नावांची शिफारस करुनही केंद्र सरकारने त्या नेमणुकांमध्ये हरकती काढून त्या अडवून ठेवल्या होत्या ! पण आता मात्र नावे पाठवताच ती मंजूर ! विशेष म्हणजे ज्या चार न्यायाधीशांनी गेल्या वर्षीच्या जानेवारीत बंडाचा पवित्रा घेतला होता त्यात वर्तमान सरन्यायाधीशांचाही समावेश होता. त्यामुळेच सरकारने त्यांच्या तर्फे केल्या गेलेल्या शिफारशी तत्काळ मान्य करणे काहीसे चकित करणारे ठरले. पंतप्रधान - ज्यांना त्यांच्या पक्षसहकाऱ्याने विष्णु अवतार म्हटले आहे - चतुर आहेत. त्यांना माणसे कळतात आणि माणसांना स्वतःकडे वळविण्याची कला ते जाणत असावेत. 'बिमस्टेक' हा काही आशियाई देशांचा विभागीय समूह आहे. 'सार्क' प्रमाणे! या समूहाच्या सदस्य राष्ट्रांमधील न्यायाधीशांची आंतरराष्ट्रीय परिषद दिल्लीत नुकतीच झाली. सरन्यायाधीश तिचे यजमान होते. राजशिष्टाचाराप्रमाणे रात्रीभोजन आयोजित करण्यात आले होते. केवळ उपचाराचा भाग म्हणून देशाच्या पंतप्रधानांनाही निमंत्रण गेले. खरं तर अशा भोजनांना पंतप्रधान सर्वसाधारणपणे जात नाहीत. पण आमचे पंतप्रधान पडले 'धक्कातंत्र-तज्ञ'! त्यांनी अचानक या रात्रिभोजनाला हजर राहण्याचे ठरविले आणि तेथे गेले देखील. सर्वोच्च न्यायालय संकुल परिसरातच त्याचे आयोजन होते. पंतप्रधान येत असल्याचे कळल्याने सारीच धावाधाव !

पंतप्रधान आले, त्यांनी अनौपचारिकपणे सर्वांशी संवाद साधला. पंतप्रधान तेथून निघण्याचे नावच घेईनात ! नऊ वाजून गेले. औपचारिक भोजने ही तासाभरात संपत असतात. पण पंतप्रधान कोणत्या मूड मध्ये होते कुणास ठाऊक? अचानक त्यांनी विचारले आता सरन्यायाधीशांची कोर्टरुम किंवा चेंबर पाहता येईल का ? म्हणजे सरन्यायाधीशांचे कोर्ट पाहण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधानांची इच्छा म्हणजे तो हुकूमच असतो. तत्काळ कोर्टाच्या किल्ल्या आणण्याची व्यवस्था करण्यात आली. कोर्ट उघडण्यात आले. पंतप्रधान त्या कक्षात गेले आणि काही काळ त्यांनी सर्वत्र निरीक्षण केले. तेथल्या एका खुर्चीवर काहीकाळ ते बसलेही! पुन्हा त्यांनी अचानक सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला ! 'चहा मिळू शकेल काय ?' पुन्हा इच्छा म्हणजे हुकूम! चहा सादर करण्यात आला. हे सर्व होता होता रात्रीचे दहा वाजून गेले. सरन्यायाधीशही पंतप्रधानांबरोबर कायम होतेच! रात्री दहानंतर सर्वांना चकित अवस्थेत सोडून पंतप्रधान त्यांच्या निवासस्थानाकडे रवाना झाले. या सर्व कृतीचा हेतु काय असावा ? सरन्यायाधीशांना प्रभावित करायचा? कुणास ठाऊक???



# विरोधी पक्षनेत्यांचे अनौपचारिक संमेलन

**ता.३ जानेवारी २०१९.** स्थळ : राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल पटेल यांचे दिल्लीतील निवासस्थान - २६ गुरुद्वारा रकाबगंज मार्ग. राजधानी दिल्लीतला हिवाळा ही सुखद पर्वणी असते. याच काळात विविध राजकीय नेते आणि सार्वजनिक क्षेत्रात सक्रिय असलेली आघाडीची मंडळी आपापल्या मित्रमंडळींचे स्नेहमिलनाचे कार्यक्रम करीत असतात. कडक थंडीत ऊबदार कपडे अंगावर परिधान करुन आलिशान बंगल्याच्या हिरवळीवर सुखद उन्हाचा आनंद घेत मित्रमंडळींसमवेत भोजनाचा आस्वाद घेणे यासारखा परमानंद नसतो. हीच पर्वणी पटेल यांनी साधली होती. दरवर्षी पटेल यांच्या निवासस्थानी जानेवारीतील काहीशी बोचणारी थंडी आणि त्यावर मात करण्यासाठी हवीहवीशी वाटणारी उन्हांची किरणे यांच्या सहवासात दुपारचे भोजन आयोजित केले जात असते. त्याप्रमाणे यावर्षी देखील ३ जानेवारीच्या दुपारी पटेल यांच्या बंगल्याच्या हिरवळीवर मित्रमंडळी जमा झाली होती. या भोजनात पत्रकार आणि विविध पक्षातली राजकीय नेते मंडळी सहभागी होत असतात आणि मग अनौपचारिक गप्पांचा फड जमतो. यावेळी या भोजनाचे महत्वही वेगळेच होते. लोकसभेच्या निवडणुका आता तीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या आहेत. विरोधी पक्षांची भाजपच्या विरोधात जुळवाजुळव सुरु आहे. त्यामुळे या भोजनात कोणकोण विरोधी नेते सहभागी होतात याकडे पत्रकार मंडळींचे लक्ष होतेच. तसे घडलेही!

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, विजयसिंह मोहिते पाटील, धनंजय महाडिक, माजिद मेमन, मधुकर कुकडे, लक्षद्वीपचे खासदार महंमद फैझल या घरच्या मंडळींबरोबरच विरोधी पक्षांच्या नेत्यांमध्ये काँग्रेसचे खजिनदार अहमद पटेल, मुंबई विभागीय काँग्रेसचे अध्यक्ष संजय निरुपम, नॅशनल कॉन्फरन्सचे फारुक अब्दुल्ला, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी, द्रमुकच्या खासदार व करुणानिधींच्या कन्या कनिमोळी, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, जया बच्चन आणि अन्य खासदा, बहुजन समाज पक्षाचे सतीश मिश्रा व अन्य खासदार, तृणमूल काँग्रेसतर्फे डेरेक ओब्रायन व दिनेश त्रिवेदी, राष्ट्रीय जनता दलाच्या मिसा भारती (लालूंच्या कन्या), भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे डी. राजा अशी मंडळी उपस्थित होती.

सर्व नेते खेळीमेळीने एकमेकांबरोबर तसेच पत्रकारांबरोबर अनौपचारिक गप्पा मारत होते. सोबतीला विविध अशा स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वादही घेतला जात होता. यातच कुणीतरी हे भोजन म्हणजे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे अनौपचारिक संमेलनच आहे तर एक फोटो होऊन जाऊ द्यात असे म्हटले. फोटोची टूम निघाली आणि सर्व नेत्यांनी देखील त्याला दिलखुलास प्रतिसाद देत फोटोला पोज दिल्या. मग काय पत्रकारांनी फटाफट मोबाईल कॅमेऱ्यानेच हा प्रसंग टिपला.

या सर्व कार्यक्रमात सर्वच नेत्यांनी विरोधी पक्षांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने शरद पवार यांनी केलेले प्रयत्न आणि पुढेही त्यांनी याचे नेतृत्व करावे अशी इच्छा व्यक्त केली. काँग्रेसच्या नेत्यांनी तर पवार आमचेच आहेत आणि त्यांच्या ज्येष्ठतेचा सर्वजण सन्मान करतात अशी टिप्पणी केली. त्यावर पवार यांनी मिष्किलपणे 'मी १९५८ मध्ये काँग्रेसमध्ये सक्रिय झालो होतो' असे सांगून त्यांचा काँग्रेस पक्ष व काँग्रेस संस्कृतीशी असलेल्या घनिष्ठ संबंधाचा उल्लेख केला. एक वाजता सुरु झालेला हा कार्यक्रम इतका रंगला की चार-साडेचार वाजल्याचेही लक्षात आले नाही. त्यानंतर मात्र मंडळी आपापल्या कामाला निघून गेली. परंतु भाजपचा मुकाबला करण्यासाठी विविध प्रकारे या विरोधी पक्षांनी आपापली रणनीती आखलेली आहे आणि तिचा आताच गाजावाजा न करता निवडणुका लढून प्रथम विजय प्राप्त करणे व त्यानंतरच पुढील पावले टाकण्याचे विरोधी पक्षांनी ठरविले आहे हेच या निमित्ताने स्पष्ट झाले.



# राष्ट्रवादीची १० जानेवारीपासून महाराष्ट्रात परिवर्तन यात्रा



**मुंबई :** सरकारचा भ्रष्टाचार अनेक गंभीर चूका... आत्तापर्यंत झालेले घोटाळयांचे आरोप...दुष्काळ हाताळण्यात आलेले अपयश...नागरी वस्त्यांमधील नियोजनाचा अभाव... घनकचऱ्याचा प्रश्न आणि चार वर्षात पेट्रोल-डिझेलची दरवाढ करुन केलेली लूट...असे अनेक प्रश्न घेवून राष्ट्रवादी काँग्रेस राज्यातील जनतेपर्यंत 'निर्धार परिवर्तनाचा' हे ब्रीदवाक्य घेवून परिवर्तन यात्रा काढत असल्याची माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

१० जानेवारीपासून परिवर्तन यात्रा जवळपास ८ ते १० फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेवून या परिवर्तन यात्रेची सुरुवात केली जाणार आहे. तर पहिली सभा सकाळी ११ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाडच्या ऐतिहासिक चवदार तळयाच्याठिकाणी घेतली जाणार आहे. या परिवर्तन यात्रेमध्ये विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील, जेष्ठ नेते आमदार छगन भुजबळ, राष्ट्रीय सरचिटणीस सुनिल तटकरे, माजी विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसेपाटील, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे आदींसह इतर सर्व नेते सहभागी होणार आहेत. ही निर्धार परिवर्तन यात्रा राज्यातील प्रत्येक जिल्हयातील प्रत्येक गावामध्ये जाणार असून राज्यातील जनतेला सरकारच्या मनमानी कारभाराची जाणीव करुन देवून जनतेचे सहकार्य घेणार असल्याचेही आमदार जयंतराव पाटील यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेमध्ये प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी केंद्र आणि राज्यसरकारच्या कारभारावर जोरदार टिका केली. राज्यात भयंकर परिस्थिति निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री जिथे जातात तिथे म्हणजेच काल शेतकरी धर्मा पाटील यांच्या कुटुंबाला त्यांची पत्नी आणि मुलगा यांना पोलिस स्टेशनमध्ये बसवून ठेवण्याचे काम हे सरकार करत आहे. मुख्यमंत्र्यांना आंदोलनकर्त्यांची सध्या भीती वाटू लागल्याने पोलिसांचा अतिरेकी वापर करुन त्यांना पोलिस कोठडीत डांबण्याचा प्रकार केला जात आहे. सांगलीमध्ये धनगर समाजाचे नेते विष्णू माने यांना पोलिसठाण्यात बसवून ठेवण्यात आले, धुळयामध्ये शेतकरी मोर्चा काढणाऱ्या प्रतिभा शिंदे या महिला शेतकऱ्यालाही स्थानबध्द करण्यात आले. पंढरपूरला ज्यावेळी सगळेजण एकादशीला एकत्र जाणार होते त्यावेळी मुख्यमंत्र्यांना जाता आले नव्हते. त्याला जबाबदार असणाऱ्यांना छळण्याचे काम सुरु असून आणीबाणीच्या काळामध्ये जे होत नव्हते ते या महाराष्ट्रात सरकार करत असल्याचा आरोपही आमदार जयंतराव पाटील यांनी केला.

नाशिक आणि परिसरामध्ये कांदयाची अवस्था काय आहे. काल कांदयाला ५० पैसे किलो दर मिळाला. सरकारने घाईगडबडीने २ रुपये अनुदान देण्याची घोषणा केली. परंतु सरकार हे अनुदान कुणासाठी देते आहे हाच प्रश्न लोकांना पडला आहे. आधारभूत किंमतीपर्यंत पीक पोचत नसेल तर सरकारने बाजारात उतरुन कांदा चढयादराने खरेदी केला पाहिजे त्याशिवाय कांदयाचा भाव स्थिर होणार नाही अशी मागणीही आमदार जयंतराव पाटील यांनी केली. गारपीट आणि अवकाळी पाऊस पडला त्यामध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांची आकडेवारी सरकारने जीआरमध्ये जाहीर केली ही त्यांची चेष्टा करण्याचा प्रकार आहे. नाशिकमध्ये फक्त एका शेतकऱ्यावर अवकाळी पावसाचे संकट आले बाकी कुठल्याही शेतकऱ्यावर आले नाही हे सरकारने कसे शोधून काढले असा सवालही



आमदार जयंतराव पाटील यांनी सरकारला केला.

कर्जमाफीबाबतही सरकारची भूमिका स्पष्ट नाही. अक्षरश: बोजवारा उडालेला आहे. कर्जमाफीबाबत शेतकऱ्यांना सरकारकडून अपेक्षा उरलेल्या नाहीत. ९० टक्के कर्जमाफी दिल्याचे भाजपचे अध्यक्ष दानवे विधान करत आहेत. परंतु सरकारने फक्त १५ ते १६ हजार कोटी रुपयेच कर्जमाफीची रक्कम वाटली आहे. याचा अर्थ राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची इच्छा नाही. शेजारच्या राज्यामध्ये निवडणूका होवून दोन तासात कर्जमाफी देण्यातही आली आम्ही गेली साडेचार वर्ष शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मागत होतो परंतु सरकारने काय दिले आणि काय दिले नाही हे शेतकऱ्यांना कळून चुकले आहे असेही आमदार जयंतराव पाटील म्हणाले. या सगळ्या प्रश्नांचा ऊहापोह जनतेच्या मैदानात आणि दारात जावून करणार आहेच शिवाय निर्धार परिवर्तनाचा ही भूमिका मनात घेवून परिवर्तन यात्रा सुरु करत असल्याचेही आमदार जयंतराव पाटील यांनी सांगितले.

**परिवर्तन झालंच पाहिजे, हे सरकार गेलंच पाहिजे !**




## महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
# निर्धार... परिवर्तनाचा....
## संपर्क यात्रा कार्यक्रम

| क्र. | लोकसभा | दिनांक | ठिकाण | वेळ | मुक्काम |
|---|---|---|---|---|---|
| | | बुधवार ९-१-२०१९ | महाड, जि. रायगड | | मुक्काम |
| १ | रायगड | गुरुवार, १०-१-२०१९ | १ रायगड किल्ला<br>२ चवदार तळे,महाड<br>३ गुहागर | ०८.००<br>११.००<br>०६.०० | चिपळूण |
| २ | रायगड मावळ | शुक्रवार ११-१-२०१९ | १ खेड<br>२ कर्जत | ११.००<br>०६.०० | लोणावळा |
| ३ | मावळ ठाणे | शनिवार १२-०१-२०१९ | १ मावळ<br>२. नवी मुंबई<br>३ ठाणे | ११.००<br>०५.००<br>०७.०० | ठाणे |
| ४ | पालघर भिवंडी कल्याण | रविवार १३-१-२०१९ | १ विक्रमगड<br>२. मुरबाड<br>३ उल्हासनगर | ११.००<br>०३.००<br>०६.०० | |
| ५ | भिवंडी कल्याण | सोमवार, १४-१-२०१९ | १ भिवंडी ग्रामीण<br>२ कल्याण<br>३ अंबरनाथ | ११.००<br>०५.००<br>०७.०० | |
| ७ | नाशिक | बुधवार, १६-१-२०१९ | १ सिन्नर<br>२ इगतपुरी<br>३ नाशिक | ११.००<br>०२.००<br>०५.०० | नाशिक |
| ८ | दिंडोरी | गुरुवार १७-१-२०१९ | १ दिंडोरी<br>२ निफाड<br>३ नांदगाव | ११.००<br>०३.००<br>०५.०० | |

# संस्थात्मक ऱ्हासाची वाटचाल... व्यवस्थेवर संकट!

गहिनी नाथ

आपण २०१९मध्ये – नववर्षात – प्रवेश केला आहे. लोकसभेची पंचवार्षिक निवडणूक ही या नव्या वर्षातील सर्वात प्रमुख घटना असेल. जनतेला राजकीय व सरकारच्या पातळीवर 'यथास्थिती' म्हणजेच 'जैसे थे' स्थिती हवी की 'परिवर्तन', याचा निर्णय या निवडणुकीने होईल. या निमित्ताने गेल्या पावणेपाच वर्षात काय घडले, देशाची वाटचाल कोणत्या दिशेने चालू आहे याचा आढावा घेणे प्रासंगिक होईल. संसदीय लोकशाही, संघराज्य पध्दती, सर्वधर्मसमभाव, समावेशी किंवा सर्वसमावेशक नीती व धोरणे या मूलभूत तत्वांवर भारतीय गणराज्याची स्थापना झालेली आहे. राज्यघटनेच्या प्रस्तावनेत समाजवादाचाही उल्लेख आहे. २०१४ पर्यंत या तत्वांच्या आधारेच राज्यकारभार चालविण्यात आला होता. यामध्ये काँग्रेस पक्षाची सरकारे होती, काँग्रेसेतर पक्षांची सरकारे होती आणि अगदी भारतीय जनता पक्षाची सरकारेही होती ज्यामध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' सरकारचा समावेश होतो. वाजपेयी हे देखील रा.स्व.संघ व भारतीय जनसंघाच्या मुशीतून तयार झालेले नेते होते. लालकृष्ण अडवानी होते. परंतु त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत भारताच्या मूलभूत संस्थांवर आघात करण्याचा कधी प्रयत्न केला नाही. हा प्रकार २०१४ मध्ये सुरु झाला.

२०१४ मध्ये भाजपला स्वबळाचे बहुमत प्राप्त झाले. त्याच्या पार्श्वभूमीत जाण्याची आवश्यकता नाही कारण ते विषयांतर होईल. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत






भाजपला २८२ जागा मिळाल्या. हे अभूतपूर्व व ऐतिहासिक यश होते. त्याचे श्रेय नरेंद्र मोदी या नेत्याला देण्यात येते. त्यांचा उल्लेख याठिकाणी आवश्यक आहे कारण लोकशाहीत देखील सरकारी धोरणांवर नेत्याच्या व्यक्तिमत्वाची छाप अपरिहार्यपणे पडत असते. मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गोध्राकांड घडले व त्यातून गुजरातमध्ये सांप्रदायिक-धार्मिक दंगली झाल्या. अल्पसंख्यक समाज त्या दंग्यांची शिकार ठरला. मुख्यमंत्री

या नात्याने हे दंगे त्वरित शमविण्याचे प्रयत्न केले गेले नाहीत असा ठपका मोदी यांच्या नेतृत्वावर ठेवला गेला होता. त्यातून त्यांची आक्रमक हिंदुत्ववादी आणि अल्पसंख्यकविरोधी नेते म्हणून प्रतिमा तयार झाली. गुजरातसारख्या मुळातच आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी स्वतःचे यशस्वी 'मार्केटिंग' सुरु केले आणि जणू काही गुजरातची प्रगती त्यांच्या कारकिर्दीतच झाली असा आभास निर्माण करण्यात त्यांनी यश मिळविले. परिणामी पंतप्रधानपदावरील त्यांचा दावाही पक्षाला मान्य करावा लागला.

काँग्रेसचा विरोध नसानसात ठासून भरलेला नेता अशीही त्यांची प्रतिमा तयार झालेली होती. त्याचा परिचय त्यांनी 'काँग्रेस-मुक्त भारत'अशी घोषणा देऊन प्रस्थापित केला. यातून काँग्रेस पक्षाने देशासाठी केलेल्या प्रत्येक गोष्टीला समांतर असे काहीतरी करण्याचा टोकाचा अट्टाहास या नेत्याने सुरु केला. या अट्टाहासाने अतिरेकाचे स्वरुप धारण केले. परंतु २०१८मध्ये राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ या तीन राज्यांनी काँग्रेसच्या पदरात बहुमत टाकून 'काँग्रेस-मुक्त भारत' या स्वप्नाला छेद दिला.

काँग्रेसपेक्षा काहीतरी वेगळे करण्याची सुरुवात त्यांनी सत्तेत येताच योजना आयोग गुंडाळून केली. भारताचा विशाल आकार आणि संघराज्य पध्दती लक्षात घेता देशाच्या साधनसंपत्तीचे सुयोग्य नियोजन करणे आणि तिचे न्याय्य वाटप







करणे हा योजना आयोगाचा मूलभूत हेतु होता. त्याचा भाग म्हणूनच पंचवार्षिक योजनांची पध्दती भारताने स्वीकारली. त्यानुसार पाच वर्षांसाठी विशिष्ट सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे ठरवून त्याआधारे प्रगती व विकासाची प्रक्रिया चालविण्याची ही पध्दती होती. त्यात कितपत यश आले या मुद्यावर चर्चा होऊ शकते परंतु भारतासारख्या विशालकाय देशाला अशा किमान पायाभूत दिशानिर्देशांची आवश्यकता होती. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चाचपडत राज्यकारभार करण्याऐवजी विशिष्ट उद्दिष्टे आणि अग्रक्रम किंवा प्राधान्याचे मुद्दे समोर ठेवून राज्यकारभार करण्यास तत्कालीन राज्यकर्त्यांनी प्राधान्य दिले. मोदींनी पहिला आघात योजना आयोगावर केला. हा आयोग रद्द करुन त्याच्या जागी 'नीती आयोग' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेचे स्वरुप 'सरकारी अध्ययन संस्था' किंवा 'थिंक टँक' असेल असे सांगण्यात आले होते. परंतु वर्तमान सरकारी निर्णयांना अनुसरुन धोरणे तयार करणे एवढेच काम या संस्थेने केलेले आढळते. कोणतीही निश्चित दिशा नसलेली ही संस्था आहे. तसेच योजना आयोगाला नावे ठेवून व त्याची मोडतोड करुन पुन्हा या संस्थेला पुढील सात वर्षांच्या विकास कार्यक्रमांची रूपरेषा तयार करण्याची जबाबदारी वर्तमान सरकारनेच म्हणजेच महान नेतृत्वाने दिलेली आहे. म्हणजे पंचवार्षिक ऐवजी सप्तवार्षिक योजना असे त्याचे स्वरुप असेल काय असा प्रश्न उपस्थित झाल्याखेरीज रहात नाही. सरकारची दिशाहीनता आणि ठोस कामाच्या अभावी या आयोगाचे पहिले प्रमुख अरविंद पानगडिया यांनी पदत्याग केला. आता त्यांच्या जागी आलेल्या राजीवकुमार यांचे काम सरकारी निर्णयाबरहुकुम धोरणे तयार करणे असे असल्याचे दिसून येते.

भारताला नियोजनबध्द विकासाची आवश्यकता आहे ही संकल्पना सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मांडली होती. १९३८ मध्ये हरिपुरा(गुजरातमध्ये सूरत जवळ) येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात निर्वाचित अध्यक्ष या नात्याने केलेल्या भाषणात नेताजींनी ही संकल्पना मांडली. काँग्रेसच्या पातळीवर त्यांनी एक राष्ट्रीय नियोजन मंडळ स्थापनेची घोषणा करुन जवाहरलाल नेहरू यांच्याकडे त्याची जबाबदारी सोपविली होती. हा


**जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस हरिपूर काँग्रेसमध्ये.**



असलेल्या मोदींनी त्यांच्या राजवटीचा पहिलाच आघात नेताजींच्या कल्पनेतील संस्थेवर का केला याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे. परंतु त्यासाठी इतिहासाची जाण व बौध्दिक क्षमतेची आवश्यकता असते. ती या राजवटीकडून अपेक्षाच नाही.

नीती आयोगाचे काम काय ? नुसते संकल्पना दस्तावेज तयार करणे ? याबाबत स्पष्टता नाही. योजना आयोगाकडे काही निश्चित जबाबदाऱ्या होत्या. विशेषतः संघराज्य पध्दतीत जर एखाद्या राज्याने एखादा मोठा प्रकल्प किंवा योजना आखली. तर त्याचा प्रस्ताव सर्वप्रथम योजना आयोगाकडे सादर होत असे. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन योजना आयोग त्यास प्रसंगी काही बदल किंवा शिफारशीही सुचवत असे आणि त्यानंतर त्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी

**हरिपुरा काँग्रेस अधिवेशनात म. गांधी, सुभाषचंद्र बोस सरदार वल्लभभाई पटेल.**



प्रसंग विषयांतर म्हणून नाही तर देशाच्या वर्तमान राज्यकर्त्यांचा ढोंगीपणा उघड करण्यासाठी दिलेले हे उदाहरण आहे. नेताजी सुभाषचंद्रांच्या नावाने नरेंद्र मोदी सतत गळा काढत असतात. नेहरूंनी नेताजींना सावत्रपणे वागविल्याचा अपप्रचार करण्यात ते धन्यता मानतात म्हणून त्यांचे ढोंग उघडकीस आणण्यासाठी हे उदाहरण दिले. नेताजींचा पुळका







प्रस्ताव तयार केला जात असे. आता असे काहीच उरलेले नाही. राज्यांना त्यांचे प्रकल्प व योजना घेऊन थेट केंद्र सरकारकडे म्हणजेच पंतप्रधान कार्यालयाकडे यावे लागते. मागे एकदा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि इतरही विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या मुख्यमंत्र्यांनी याबाबत तक्रार केलेली होती. कारण पंतप्रधान नावाच्या एका व्यक्तीच्या हातात सर्व सत्ता केंद्रित करण्याचा हा प्रकार आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. सध्याचे पंतप्रधान किती 'निःपक्षपाती' आहेत हे दिल्लीच्या अरविंद केजरीवाल यांच्या सरकारची जी ससेहोलपट मोदी सरकारकडून केली जात असते त्यावरुन लक्षात येते. त्यामुळेच या नेत्याने सत्तेत येताक्षणी पहिला आघात देशाच्या

संघराज्य पध्दतीवरच केला. त्याची प्रातिनिधिक संस्था असलेल्या योजना आयोगाचे अस्तित्वच या महान नेत्याने संपवून टाकले. वर नेताजींचे ढोंगी गुणगान करायला ते मोकळे झाले!

हा झाला 'फ्लॅश बॅक'! हिंदी सिनेमात असतो तसा! या सरकारने म्हणण्यापेक्षा या





नेत्याने सत्तेत आल्यापासून संस्थांवर कसे आघात करण्यास सुरुवात केली याचा हा संदर्भ! नंतरच्या काळात या राजवटीने संस्थांवर आघात करण्यात राखलेले सातत्य अभूतपूर्व मानावे लागेल. संसदीय लोकशाही किंवा कोणतीही लोकशाही पध्दती किंवा व्यवस्था ही तिच्या प्रातिनिधिक संस्थांच्या

मार्फत चालत असते. त्या संस्थांमध्ये कालानुरुप बदल-सुधारणा आवश्यक असतात हे निर्विवाद सत्य आहे. परंतु त्यांचे अस्तित्वच नष्ट करणे अपेक्षित नसते. सत्ता परिवर्तन याचा अर्थ संस्थांची मोडतोड नव्हे ! वर्तमान राजवटीत या मोडतोड व उद्ध्वस्तीकरणास राजाश्रय मिळाल्याचे चित्र





दिसून येते. संसद(कायदेमंडळ), न्यायालये (न्यायमंडळ) आणि सरकार (कार्यकारी मंडळ) या तीन पायांवर लोकशाहीचा डोलारा उभा असतो. यात स्वतंत्र बाण्याच्या माध्यमजगताचा उल्लेख करावा लागेल कारण त्यास चौथा पाया किंवा स्तंभ मानले जाते. याखेरीज अनेक प्रातिनिधिक संस्था असतात. निवडणूक आयोग, माहिती आयोग, सीबीआय, सेनादले व अन्य निमलष्करी दले अशा अनेक संस्थांची नावे घेता येतील. या

संस्थांची गळचेपी न करता त्यांचे स्वातंत्र्य व स्वायत्तता अबाधित राखूनच लोकशाहीचा हा गाडा चालत असतो. दुर्दैवाने सध्या त्याच्या विपरीत गोष्टी घडताना आढळत आहेत.

२०१८ जानेवारी ! १२ जानेवारी २०१८ची दिल्लीतली कडाक्याच्या थंडीची ती सकाळ ! सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति चेलमेश्वर यांच्या निवासस्थानी पत्रकार धावत पोहोचतात. तेथे आणखी तीन न्यायमूर्ति उपस्थित असतात. तेथे काय घडते ? स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय इतिहासातला हा पहिलाच प्रसंग तेथे घडतो ! सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायमूर्तींची ही पत्रकार परिषद ! हे चारही न्यायमूर्ति सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. सरन्यायाधीशांच्या विरोधातले हे एक प्रकारचे बंडच असल्याचे मानले गेले होते. हा एक अभूतपूर्व प्रसंग होता. सरन्यायाधीशांतर्फे वरिष्ठ न्यायमूर्तींना डावलून तुलनेने कनिष्ठ न्यायमूर्तींकडे अतिमहत्वाच्या केसेस म्हणजेच प्रकरणे सोपविली जात असल्याची तक्रार या न्यायमूर्तींनी केली होती. यानंतर या मुद्यावर झालेल्या वादात माजी सरन्यायाधीशांकडून जे न्यायमूर्ती सत्तापक्षाच्या निकटवर्तुळातले मानले जातात त्यांच्याकडे या अतिमहत्वाच्या प्रकरणांची जबाबदारी सोपविण्याचे प्रकार सुरु असल्याचा आरोप करण्यात आला होता. एवढेच नव्हे तर सरकारच्या अवाजवी हस्तक्षेपाच्या मुद्याकडेही निर्देश करण्यात आलेला होता.

हा प्रसंग काय दर्शवितो ? सर्वोच्च न्यायालय ही संस्था लोकशाहीच्या प्रमुख स्तंभापैकी एक आहे आणि तिच्या विश्वसनीयतेबद्दल प्रश्नचिन्ह उत्पन्न करणारी ही घटना होती. न्यायसंस्था ही निःपक्ष मानली जाते आणि कायद्याचे अर्थ लावणे व निःपक्ष-निरपेक्ष न्यायदान हे त्यांचे मूलभूत कर्तव्य मानले गेले असताना या संस्थेवर पक्षपाताचा आरोप लावण्यात आला होता व ते लावणारे दुसरेतिसरे कुणी नसून या न्यायव्यवस्थेतीलच सक्रिय न्यायमूर्तीच होते. यापूर्वी आणीबाणीच्या काळात न्यायसंस्थेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झालेले होते. इंदिरा गांधी यांनी सेवाज्येष्ठतेचा क्रम डावलून त्यांच्या मर्जीतल्या व्यक्तीची सरन्यायाधीश म्हणून नेमणूक केल्यावर तत्कालीन तीन न्यायमूर्तींनी तत्काळ पदाचे राजीनामे देऊन राजसत्तेच्या पक्षपाती हस्तक्षेपाला चोख प्रत्युत्तर दिले होते. आता सरकारी व पक्षपाती हस्तक्षेपाचा मुद्दा असेल तर या देशात पुन्हा आणीबाणी असल्याचा निष्कर्ष काढायचा काय असाही प्रश्न विचारावा लागेल. त्याचप्रमाणे सरकारला हवेहवेसे वाटणारे न्यायमूर्ति आणि सरकारला ज्या प्रकरणांमध्ये विशिष्ट स्वरुपाचाच निर्णय हवा असेल ती प्रकरणे या न्यायमूर्तींच्या खंडपीठांकडे सोपविणे हे जे आरोप यानिमित्ताने झाले ते काय दर्शवितात ? न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य खरोखर मर्यादित केले जात आहे काय आणि तसे प्रयत्न केले जात असतील तर न्यायसंस्थेतर्फे त्याचा प्रतिकार होत आहे काय आणि त्या प्रतिकाराचे स्वरुप काय हे प्रश्न त्या पाठोपाठ निर्माण होतात.

रफाल विमान सौद्याच्या संदर्भात चौकशी केली जावी अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात सादर झाल्यानंतर न्यायालयाने दिलेला निर्णय, त्या निर्णयासाठी सरकारने सादर केलेल्या माहितीतील वस्तुनिष्ठ चुका आणि त्या चुकांकडे सर्वोच्च न्यायसंस्थेने केलेले दुर्लक्ष हा प्रकार अनाकलनीय आहे. रफाल विमान खरेदी, विमानांची किंमत, कराराच्या अटी याबाबतची माहिती सार्वजनिक करता येणार नाही कारण देशाच्या सुरक्षेशी संबंधित त्या बाबी आहेत असा पवित्रा घेऊन सरकारने या व्यवहाराबाबत गोपनीयता बाळगलेली आहे. न्यायालयाने बंद लिफाफ्यात ही माहिती सरकारकडे मागितल्या नंतर जी माहिती सादर करण्यात आली त्यात वस्तुनिष्ठ चुका होत्या. सीएजी म्हणजेच महालेखानियंत्रकाचा या व्यवहाराबाबतचा अहवाल संसदेच्या लोकलेखा समितीकडे असल्याचे या माहितीत नमूद होते जी वस्तुस्थिती नव्हती. सीएजीने अद्याप याबाबतचा अहवालच सादर केलेला नसताना तो लोकलेखा समितीकडे सादर होण्याचा प्रश्नच नव्हता. सरकारने याबाबत मागाहून खुलासा केला व चूक मान्य केली. परंतु न्यायसंस्थेने सरकारची चूक पोटात घालणे हे खरोखर अनाकलनीय होते. एखाद्या





सामान्य माणसाकडून अशी चूक घडली असती तर न्यायसंस्थेने एवढा मवाळपणा दाखविला असता का असा स्वाभाविक प्रश्न यातून निर्माण होतो. त्याचप्रमाणे सरकारने पुरविलेली माहिती याचिकाकर्त्याला न देणे हे कोणत्या नैसर्गिक न्यायाच्या तत्वात बसते हा प्रश्नही उपस्थित होतो. ही माहिती सार्वजनिक न करता देखील याचिकाकर्त्यांना न्यायमूर्तींच्या कक्षात गोपनीयतेचा भंग न होण्याच्या अटींवर दाखविणे सहज शक्य असते. संसदीय पातळीवर देखील हे करण्यात आल्याचे पूर्वीचे दाखले आहेत. परंतु न्यायालयाच्या विवेकबुध्दीला सरकारने दिलेली माहिती पटलेली असल्याचे सांगून न्यायालयाने या प्रकरणी चौकशीची मागणी फेटाळून लावली.



वरील सर्व दाखले विचारात घेतल्यावरच लोकशाही व्यवस्थेतील या मूलभूत संस्थेबाबतची सद्यःस्थिती लक्षात येऊ शकेल.

न्यायसंस्थेप्रमाणे कायदेमंडळ म्हणजेच संसदेची अवस्था काय आहे ? वर्तमान सरकारला राज्यसभेत बहुमत नव्हते आणि अद्याप नाही. यामुळे विरोधी पक्ष या सभागृहात आक्रमक भूमिकेत असणे अत्यंत स्वाभाविक आहे. त्यामुळे सरकारने जर एखादे विधेयक जोरजबरदस्तीने संमत करण्याचा घाट घातला किंवा एखाद्या विधेयकात विरोधी पक्षांना काही दुरुस्ती हवी असल्यास ते विधेयक राज्यसभेत अडविले जाणे अपेक्षितच होते. परंतु त्याचा अर्थ असा असतो की ज्या सरकारला त्यांची विधेयके संमत करुन हवी असतील तर किमान त्यावर विरोधी पक्षांना विश्वासात घेणे, राजकीयदृष्ट्या त्यांना चुचकारणे आणि चर्चा करुन मधला मार्ग काढून ती संमत करणे हा मार्ग अवलंबिला जातो. त्यासाठी विरोधी पक्षांशी संवाद आवश्यक असतो. परंतु वर्तमान राजवटीत ५६ इंची उर्मटपणा व उद्दामपणा असा भरलेला आहे की विरोधी पक्षांना कस्पटासमान लेखणे व त्यांच्याशी संवाद करणे म्हणजे कमीपणा असल्याचे मानले जाते. या राजवटीने विरोधी पक्षांशी संवाद साधण्याबाबत अत्यंत कोतेपणा दाखविल्याचेच पाच वर्षात आढळून येते. मग यातून मार्ग काढण्यात आला. हा मार्ग म्हणजे राज्यसभेला वगळून विधेयके संमत करुन घेणे. राज्यसभेला वित्तीय स्वरुपाचे अधिकार नाहीत त्यामुळे एखादे विधेयक वित्तीय स्वरुपाचे(मनी बिल) असेल तर त्याला राज्यसभेच्या संमतीची आवश्यकता नसते. लोकसभेने संमत केल्यानंतर राज्यसभेने औपचारिकदृष्ट्या त्यास मान्यता दिली नाही तरी चालते आणि ती गृहीत धरली जाते. मग काय आधार सक्ती करण्याबाबतचे विधेयक देखील या सरकारने मनी-बिल म्हणून दाखविले आणि लोकसभेतील बहुमताच्या जोरावर ते संमत करुन घेतले आणि राज्यसभेला चक्क फाट्यावर मारले. लोकसभा अध्यक्षांनी हे विधेयक वित्तीय स्वरुपाचे म्हणजेच मनी बिल असल्याचा निर्णय दिल्यानंतर त्याबाबत कुणी प्रश्न उपस्थित करु शकत नाहीत. त्या तरतुदीचा लाभ उठविण्यात आला. लोकसभा अध्यक्षांचा हा निर्णय प्रश्नचिन्हांकित ठरला. परंतु अखेर न्यायालयाच्या मार्फत या सक्तीतून लोकांना दिलासा मिळाला. परंतु सांगण्याचा मुद्दा एवढाच की या राजवटीने व राज्यकर्त्यांनी संसदेचे महत्व देखील कमी करण्याचा प्रकार केला.

सीबीआयचे उदाहरण ताजे आहे. हे उदाहरणही वर्तमान राजवटीच्या हस्तक्षेपाचेच आहे. सीबीआयची स्वायत्तता पाळण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात आलेल्या असल्या तरी प्रत्येक सरकार त्यांच्या पध्दतीने या संस्थेचा दुरुपयोग चालू ठेवत असते. काही सरकारे अत्यंत निगरगट्टपणे तो करीत असतात. वर्तमान राज्यकर्त्यांना त्यांच्या आवडीचे आणि त्यांच्या अगदी निकटचे असलेल्या अधिकाऱ्यांकडे सीबीआयची सूत्रे सोपवायची होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले पण त्यात त्यांना यश आले नाही. तरीही त्यांनी त्यांच्या निकटवर्ति अधिकाऱ्यांमार्फत असे हस्तक्षेप सुरु केले की मुख्य संचालक व हे अधिकारी यांच्यात थेट संघर्ष पेटला. तो इतका विकोपाला गेला की परस्परांविरुध्द न्यायालयात तक्रारी

करण्यापर्यंत मजल गाठण्यात आली. अखेर न्यायालयाने या प्रकरणी लक्ष घालताना संघर्ष करणाऱ्या दोन्ही अधिकाऱ्यांना वादाचा निर्णय होईपर्यंत कामावर न जाण्याचा आदेश दिला. या प्रकरणात सीबीआयचे मुख्य संचालक ए.के.वर्मा आणि विशेष संचालक राकेश अस्थाना हे दोघे गुंतलेले आहेत. अस्थाना हे राजवटीच्या आणि राज्यकर्त्यांच्या मर्जीतले मानले जातात. ते गुजरात केडरचे अधिकारी आहेत हे सांगितल्यानंतर अधिक तपशीलाची गरज नसावी. परंतु न्यायालये या वादावर मौन पाळून आहेत. याचे कारण उघड आहे. वर्मा हे जानेवारी महिन्यातच निवृत्त होत आहेत. तोपर्यंत न्यायालयात त्यांचे प्रकरण प्रलंबित ठेवणे आणि त्यांना निवृत्त होऊ देणे. मग सरकारला पाहिजे ते होणारच आहे. या एका प्रकरणातून न्यायसंस्था, सरकार आणि सीबीआय या तिन्ही संस्थांच्या कार्यपध्दतीवर चांगला प्रकाशझोत पडतो.

अशी असंख्य उदाहरणे देता येतील. रिझर्व बँकेच्या स्वायत्ततेला ग्रहण लावण्याचे प्रयत्न या राजवटीकडून सुरु आहेत. नोटबंदीच्या निर्णयाला रिझर्व बँकेकडून जोरजबरदस्तीने मंजुरी घेण्याची दादागिरी या सरकारने म्हणजेच राज्यकर्त्यांनी केली. एवढेच नव्हे तर रिझर्व बँकेकडे असलेल्या राखीव निधीवर सरकारची नजर पडल्यानंतर तो मिळविण्यासाठी रिझर्व बँकेवर दबाव आणणे, पिच्छा पुरविणे व अर्थमंत्र्यांसह अनेक नेत्यांनी रिझर्व बँकेच्या कारभारावर टीका करण्याचे प्रकार इतके टोकाला गेले की अखेर रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांनी राजीनामाच दिला.

याच मालिकेतील सर्वात गंभीर प्रकाराचा उल्लेख करणे अत्यावश्यक ठरेल. वर्तमान राजवट व त्याहीपेक्षा राजवटीच्या नेत्यांकडून देशभक्ति व राष्ट्रवादाचा मुद्दा सातत्याने गाजावाजा करुन उपस्थित केला जात असतो. सर्जिकल स्ट्राईक एकदा केल्यानंतर त्याचा भरपूर गाजावाजा करण्याचा प्रकार नेत्यांनी केला. या सर्जिकल स्ट्राइकचे नेतृत्व असलेले सेनेच्या उत्तर विभागाचे प्रमुख व आता निवृत्त झालेल्या जनरल डी.एस हुडा यांनी राज्यकर्त्यांना एका लेखाद्वारे स्पष्ट इशारा दिला की हा गाजावाजा बंद करा. त्यांच्याचप्रमाणे इतरही अनेक निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनी वर्तमान राज्यकर्त्यांकडून सेनेच्या विविध मोहिमांबाबत सार्वजनिकरीत्या गाजावाजा करण्याचे प्रकार अयोग्य असल्याचे मत व्यक्त केले. यातून सेनादलांच्या राजकीयकरणाचा धोका संभवतो याकडे या अधिकाऱ्यांनी लक्ष वेधलेले आहे.

लोकशाही व्यवस्थेत सेनादलांचे अस्तित्व मुद्दाम व जाणीवपूर्वक नागरी जीवनापासून वेगळे व अलिप्त राखण्यात येते कारण सेनादले ही राष्ट्रीय सुरक्षेबरोबरच राष्ट्रीय एकता, अखंडता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेला बांधील असतात. त्या त्यांच्या शिस्तीला बाधा येऊनये यासाठी त्यांचे स्वतंत्र अस्तित्व राखण्यात येत असते. परंतु वर्तमान राज्यकर्ते मुद्दाम या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करुन सेनादलांच्या राजकीयीकरणाचे प्रयत्न करीत असल्याचे आढळून येते. हे धोकादायक आहे. पाकिस्तानातील सरकारे लष्कराच्या ओंजळीने पाणी पीत असल्याची टीका चवीने केली जाते. सेनादलांचा वरचष्मा एकदा निर्माण झाला तर मुलकी किंवा नागरी सत्तेला म्हणजे लोकनियुक्त सरकारला देखील ते जड जाऊ शकते या धोक्याची जाणीव वर्तमान राज्यकर्त्यांना बहुधा नसल्याचे दिसून येते. सुमार बुध्दीचे नेतृत्व असले की असे धोके संभवतात कारण जेव्हा लोकशाही संस्थांचा ऱ्हास सुरु होतो तेव्हा अनागोंदी, अराजकाकडे वाटचाल होऊ लागते. हे वेळीच थांबणे महत्वाचे !

अन्यथा परिस्थिती कोणते वळण घेईल याची कल्पनाच केलेली बरी!

